# कुंभारगल्लीचे दत्त महाराज

## ते स्वामी कुंभारगल्लीचे | होते कोल्हापुरींचे ॥

## (परमपूज्य श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज-चरित्रकथा)

॥ ॐ गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णुः, ॐ गुरुर्देवो महेश्वरः |

गुरुः साक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः॥

महान पतिव्रता सती अनसुया माता आणि परमतपस्वी अत्री ऋषी यांचे आश्रमी उत्पत्तीकर्ते ब्रह्मा, पालनकर्ते-विष्णु व संहारकर्ते शंकर या तीन देवांनी त्रिगुणात्मक त्रैमूर्तीरुप 'भगवान श्रीदत्तात्रेय' रुपाने अवतार घेतला. पुढे संसारग्रस्त अज्ञानी जीवांना जनन-मरणाच्या सुखदुःखाच्या फेऱ्यातून मुक्त करुन आपल्या मूळ स्वरुप स्थितीत एकरुप करण्या करिता जनहिताच्या कळवळ्याने या भगवान् श्री दत्तात्रेय प्रभूंनी त्रिगुणातील सद्गगुरुरुपाने प्रथमः'श्रीपाद श्रीवल्लभ' 'या नावांने पीठापुरी आणि नंतर दुसऱ्यांदा श्रीनृसिंह सरस्वती' 'या नावांने करंज नगरीत अवतार घेतला. त्यांच्या परमपावन लीलासंचारामुळे कुरवपूर-कुरगड्डी, औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर यासारखी तीर्थक्षेत्रे निर्माण झाली. सुप्रसिद्ध श्रीगुरुचरित्र' 'ग्रंथामध्ये या दोन्ही अवतारांची समग्र कथा बावन अध्यायातून गुंफली गेली आहे. याच दत्त परंपरेत पुढे तिसरा श्रीमाणिकप्रभू' 'व चौथा श्री स्वामी समर्थ' 'या नांवाने कालानुसार अवतार प्रगट झाला. कर्नाटक प्रांतामध्ये बिदर गुलबर्ग्याजवळच्या हुमणाबाद येथे तिसरे दत्तावतारी श्रीमाणिकप्रभू' 'यांनी सकलमत संप्रदाय' 'स्थापन करुन पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्या प्रमाणेच जगद्गुरु' 'बनून अभूतपूर्व धर्मकार्य केले. त्यामुळे अभिनव जगद्गुरु शंकराचार्य' 'यारुपानेच जनमानसांत त्यांची प्रसिद्धी झाली. त्यांचे परमपावन वास्तव्य स्थळ श्रीक्षेत्र माणिकनगर' 'म्हणून उदयास आले. त्यांच्या तेथील गादी परंपरेमध्ये मूळे श्री माणिक प्रभूंनंतर श्री मनोहर माणिकप्रभू,श्री मार्तण्ड माणिकप्रभू, श्री शंकर माणिक प्रभू या क्रमाने सध्या श्री सिद्धराज माणिकप्रभू' 'गादीवर विराजमान असून कार्यरत आहेत. मूळ श्री माणिकप्रभूंच्या अवतार काला मध्येच चौथे दत्तावतारी श्री स्वामी समर्थ प्रगट झाले. त्यांच्या अलौकिक दैदिप्यमान चरित्रकार्यामुळे त्यांचे प्रमुख लीलास्थळ श्रीक्षेत्र अक्कलकोट' 'म्हणून सर्व जगपरिचित झाले आहे. आज त्यांचे नांव माहीत नसलेला कोणी असूच शकणार नाही, इतके त्यांचे सर्वत्र अगदी भक्ती भावाने दुमदुमत आहे. या मूळ श्रीक्षेत्र अक्कलकोटच्या श्री स्वामीसमर्थ रुपी वटवृक्षाच्या शिष्य-प्रशिष्यरुपी शाखा पारंब्याप्रमाणेच त्यांचेच अनेकानेक अंश-अवतारी-दत्तावतारी सत्पुरुष वेगवेगळ्या प्रांती पुढे अवतीर्ण होत गेले, श्रीक्षेत्र दक्षिणकाशी' 'म्हणून संबोधल्या जाणाऱ्या करवीर तीर्थक्षेत्री सुप्रसिद्ध कोल्हापूर शहरी कुंभारगल्लीचे स्वामी या नांवे प्रसिद्धी पावलेल्या परमपूज्य श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज' 'या दत्तावतारी सत्पुरुषांची मूळ गुरु परंपराही याच श्रीक्षेत्र अक्कलकोट निवांसी श्री स्वामी समर्था' 'पासून चालत आली आहे. आता त्या दिनदयाळू श्री स्वामी समर्थांच्या' ' चरणी विनर्मभावे साष्टांग दंडवत प्रणामकरुन त्यांच्याच परमकृपेने केवळ त्यांचेच साक्षात् स्वरुप असणाऱ्या दत्त महाराजांचे परमपवित्र जीवनकार्य समाजावून देणारी अमृतधुर चरित्र कथा यथामती सादर वर्णन करुया.

तुमचे चरित्र गंगानदी | ती मध्यें मी घेईन उडी |
पाप होईल देशोधडी | ऐशी घडी पुनःन ये ॥
चरित्र हेचि भागीरथी | यमुना तेथ संतसंगती |
श्रवणानंद सरस्वती | प्रयागसंगमहा दुजा ॥
तेथ स्नानासी मी जाईन | शीतळ सर्वांगे होईन |
नवल सद्गुरुचे महिमान | पूर्व पुण्य फळ आले ॥
'हे श्रीकृष्ण' मन्मनोविभव | रक्षणकर्ता ऊर्जितसत्व |
तुज ऐसा असतां सदैव | भीतीस ठाव मग कैसा ॥
आतां आरंभीन चरित्र | भवभय छेदक जें पवित्र |

# दत्तावतारी श्रींचा जन्म

कोल्हापूरजवळच्या श्रीक्षेत्र नृसिंहवाडी परिसरा नजिकच शिरोळ तालुक्यामध्ये नांदणी नांवाचे एक छोटेसे खेडेगांव आहे. यागांवी भारद्वाज गोत्री ब्राह्मण कुटुंबामध्ये श्री. अप्पाभटजी जोशी आपल्या परम सात्विक सौ. अन्नपूर्णाबाईंस आनंदाने वास्तव्य करीत होते. आपली परंपरागत भिक्षुकी करुन जे प्रभुकृपेने मिळेल त्यांत समाधान मानून दोघे पती-पत्नी शांत चित्ताने संसार गाडा चालवित होते. नांदणी पासून जवळच असलेल्या कृष्णा-पंचगंगा संगमावरील श्रीक्षेत्र नृसिंहवाडी तीर्थक्षेत्री परमपवित्र औदुंबर वृक्षाखाली आपल्या परम पावन दिर्घ वास्तव्यानंतर परमपूज्य श्रीनृसिंह सरस्वती दत्त महाराजांनी प्रसाद रुपाने दिलेल्या 'मनोहरी पादुका' अनेकानेक संसारीजनांना भवनदीतून पार करीत आहेत. याची पुरेपुर जाणीव असलेल्या श्री.अप्पाभटजी व सौ. अन्नपूर्णाबाई या दांपत्याने पण याच सदहेतूने दर पौर्णिमेस व दर शनिवारी येथे श्रद्धाभक्तीने जाऊन तेथील भजन-पूजनामध्ये सहभागी होण्याच नित्यक्रम बरेच वर्षे चालविला होता. या भाग्यवान दांपत्यास लग्नानंतर बरेच वर्षे होऊनही मूलबाळ नव्हते. त्यामुळे एकदा सौ. अन्नपूर्णाबाईंनी श्री भगवान् दत्तप्रभूचरणी या विषयी प्रार्थना करण्यास श्री. अप्पाभटजींना सांगितले. श्रीदत्त चरणी असे काही मागावे अशी नसूनही एके प्रसंगी श्रीक्षेत्र नृसिंहवाडीस गेल्यानंतर श्रीदत्तचरणी दर्शन घेताना श्री. अप्पा भटजींच्या मनांत पत्नीचे हे विचार घोळू लागले. अर्थातच याविषयी 'जे योग्य असेल ते करा' अशी मूक प्रार्थना करुन ते शांत राहीले. त्या रात्री तेथेच मुक्काम करुन झोपी गेल्यावर यतीवेषधारी रुपांमध्ये साक्षात् श्रीदत्तप्रभूंनी त्यांना दृष्टांत देऊन सांगितले, "अरे काळजी काय करतोस, मीच तुझ्या घरी पुत्र रुपाने येईन." श्री दत्त प्रभूंचा हा शुभदायी दृष्टांत पाहून श्री. अप्पाभटजी आनंद-आश्चर्याने थकित होऊन गेले. आपल्या प्रिय पत्नीस हा सर्व वृत्तांत सांगता तीही आनंदून गेली. पुढे यथा समय गर्भधारणेची सुचिन्हे दिसू लागली सौ. अन्नपूर्णाबाईंना आजूबाजूच्या शेजारणी काय हवे-नको ते विचारू लागल्या. पण त्यांचे डोहाळे अजबच होते. खाण्यापिण्याचे भान तर नव्हतेच. नित्य मारुतीच्या मंदिरी बसून रहावे असे वाटे. संसार संकटात सापडलेल्या त्रस्त जीवांना मदत करण्याची तीव्र तळमळ शांत बसू देईना. उंच सिंहासनावर, पालखीमध्ये बसण्यीच ओढ त्यांच्या मनात सतत येत असे. श्री. अप्पाभटजी पण आपल्या पत्नीचे विचित्र डोहाळे पाहून श्री दत्तप्रभूंचे स्मरण करीत मन शांत ठेवित होते. नवमास पूर्ण होताच शके सत्राशे सत्तावन्न माघ वद्य पंचमी रविवारी हस्त नक्षत्रावर प्रातःकाळी सुर्योदय समयी ७.०७ वाजता दिनांक ७ फेब्रुवारी १८३६ रोजी सौ. अन्नपूर्णामातेच्या पोटी साक्षात् दत्तावतारी सुपूत्र जन्मास आला.

# अदभूत बालपण

त्यावेळच्या प्रथेनुसार पित्याने नूतन बालकाच्या जन्मवेळेनुसार परीसरातल्या जाणत्या ज्योतिष्याकडून त्या बाळाची जन्मपत्रिका मांडून घेतली. एकंदरीत पंचांग ग्रहयोगाची पाहणी करुन उपाध्यायांनी सांगितले,"हा बालक सामन्य जनांमध्ये मूढपणे वागेल. त्यांची बाह्य वागणूक न पाहता, अंतरंग पाहू गेल्यास थोर अवधुत योग्याची लक्षणे भाग्यवान जिज्ञासूंना दिसून येतील, हा ब्रह्मचारी राहील, येथे राहणार नाही, फिरत राहून लोकोद्धाराचे कार्य करुन दुसरे ठिकाणी वास्तव्य करील. नित्य ब्रह्मानंदी निजानंदी निमग्न राहील. कोणाच्या निंदा-स्तुतीला भाळणार नाहि. आपल्या वास्तव्यस्थळीच्या कार्याने प्रसिद्धी पावून आनेकांना भगवदभजनी लावील. मुक्तीचा मार्ग देईल." आपल्या बालकाचे हे भविष्य जाणून श्रीदत्त प्रभूंच्या दृष्टातांची श्री. अप्पाभटजींना जणू प्रचितीच मिळाली. मोठ्या थाटाने बारसे करुन बालकाचे नांव 'श्रीकृष्ण' ठेवले गेले. हा अदभूत बालक जन्मापासून रडला नाही. नित्य आनंदात खेळत राही. मातेचे दुग्धपानही करीत नसे. माता त्यामुळे काळजी करीत बसे. स्नेहाने-तीव्र वात्सल्याने तिचा कंठ दाटून येई. उरी पान्हा पाझरत राही. पण बालक स्तनपान न करताच निजानंदी निमग्न राही. वेड्या प्रेमाने या अवतारी बालकासाठी माता - पिता कुलस्वामी खंडेरायाला विनवित राहून कुलदिपकासाठी नित्य प्रार्थना करीत राहत. पुढे वर्षानंतर श्रीक्षेत्र नृसिंहवाडीस श्री दत्तचरणी अणि मंगसुळीक्षेत्री कुलस्वामी श्रीखंडेराया पायी त्यांनी बालकास घातले. मुखी दुधभात भरवून उष्टावन समारंभ योजिला, पण बालक घासही मुखी घालून घेईना. बळेच दिला तर थुंकून टाकी. बालकाचे तेज निजानंदी वृत्ती पाहून श्रीदत्तप्रभूच याचे पालनपोषण करतील, हा भरवंसा ठेवून माता-पिता शांत मनाने त्यांस शक्य ती त्याची सेवाशुश्रुषा संगोपन करीत राहीले. बालपणी बरीच वर्षे हा बोलतही नसे. केवळ मुकेपणेच हावभाव करीत राही. मातापिता 'हा मुका तर नसेल ना? ' या काळजीने चिंता करीत. आजूबाजूंच्या लोक समजुतीप्रमाणे तो बोलावा म्हणून देवधर्म व उपाययोजना करीत रहात. पुढे पांच वर्षानंतर हा बालक थोडे फार बोलू लागला. पण त्याचे बोलणे मोजकेच-इतरांना अगम्य वाटावे असेच असे. एखाद्या उंच दगडाचे सिंहासन बनवून त्यावर बसून मोठ्या ऐटीने हा आपल्या बालसवंगड्यांना जवळ बोलवीत राही. 'तुमची तळमळ मी दूर करतो' म्हणे. एकंदरीत बाह्मकृती पाहून कोणासही हा वेडाच वाटत असे. आठव्या वर्षी याचे मौजीबंधन केल्यावर हा सूज्ञ बनून राहील या हेतूने मुंज लावली गेली. पण गायत्री मंत्राऐवजी 'ओ भुर्र,ओ भुर्र,'असेच तो म्हणत हा हसत राहील. अनेकांनी नावे ठेवून'हा काही सूज्ञ दिसत नही'असाच तर्क लढविला. आपल्याच मस्तीत मस्त राहून हा बालक आजूबाजूच्यांना बोलावून म्हणे, "अरे माझ्या पाया पडा. तुमची पापातून मुक्ती करीन. हा घ्या मी देतो तो अंगारा, यामुळे तुमचा भवरोग नाहीसा हाईल" त्याची वागणूक-बोलणे सर्व सामन्यजन हसण्यावारी नेत असत. माता-पिता श्रीदत्तप्रभूंच्या दृष्टांतानुसार भान ठेवून आपले मन अविचल ठेवण्याचा प्रयत्न करीत रहात.

# श्रीक्षेत्र मंगसुळीची ओढ

पुढे काही काळ गेल्यावर मंगसुळीला कुलस्वामी श्री खंडेरायाला भेटण्यासाठी मी जातो, असा हट्ट हा बालक धरु लागला. परत परत त्याचे बोलणे ऐकून श्री. अप्पाभटजींनी सौ. अन्नपूर्णामातेस बालकाची काळजी न करता त्यास एकटे जाऊ देण्याविषयी सुचविले. बालकास प्रेमाने शिदोरी बांधून देऊन मोठ्या जड अंतःकरणाने मातेने त्यांस निरोप दिला. बालक एकटाच मोठ्या आनंदात नांदणीतून मंगसुळीक्षेत्रास चालत जाऊ लागला. फिरत फिरत बेडग गांवी एका विहिरीजवळ येऊन पोहोचल्यावर बालकाने येथेच्छ जलक्रीडा केली. त्यावेळी एक भाग्यवान स्त्री पाण्यासाठी आली असताना सहज लीला कौतुकाने या बालकाने तिचा हात धरुन, ''माई, मला दहीभात भरवून दे'' म्हणून तिचा पदर धरला, या बालकाचे आगळे तेज पाहून ती स्त्री त्यांस घरी घेऊन आली. हा नटखट बालक घरी मातेने कितीही आग्रह केला तरी मुखी घास न गिळणारा येथे मात्र प्रेमाने तिच्या हातच्या दहीभाताचे दोन-चार घास आनंदाने खाऊ लागला. थोडा वेळ जाताच मला आता पुढे गेले पाहिजे म्हणून निघू लागला. ती स्त्री पती येईपर्यंत तरी थांबावे म्हणून बालकाला विनवू लागला. पण तिचे न ऐकता तिने देऊ केलेल्या फराळपैकी काहीसे पदार्थ सोबत घेऊन 'पुत्रवती भव' असा आशिर्वाद देऊन तेथून पुढचा रस्ता धरला. पुढे त्या स्त्रीला या दैवी बालकाचाच नित्य छंद लागून त्याच्या नित्य स्मरणातच तिचा काळ जाऊ लागला आणि पुढे खरोखरीच त्या निपुत्रिक स्त्रीला पुत्रप्राप्तीही झाली. तिही अखेरपर्यंत या दैवी बालकाचे स्मरण करीत आनंदी रहिली.

चालत-चालत श्रीक्षेत्र मंगसुळीला खंडेरायाच्या मंदिरी हा बालक येऊन पोहोचला. शिवशंकराच्या या मल्हारीमार्तंड रुपाचे स्तवन करीत हा बालक निवांत बसला.'प्रत्यक्ष दर्शन भेट झाल्याविना हलणार नाही,' असा निर्धार होता. त्याच निर्धार पाहून कैपीनधारी ब्राह्मणरुपात शिवशंकर प्रभू प्रगटून म्हणू लागले. "अरे, या काळी समक्ष दर्शन कसे घडेल? " तेव्हा बालकाने त्या ब्राह्मणाचे रुप जाणून,"प्रत्यक्ष दर्शनविना तुम्हांस सोडणार नाही," असे म्हणताच शिवशंकरांनी नंदीवर बसून पार्वतीमातेसह त्यांस दर्शन दिले. शिवशंकर म्हणाले,"अरे तू तर माझाच अंश आहेस. आता अक्कलकोटास जाऊन 'नृसिंहभान' यांस भेट. " देवादिक अवतारापासून चालत आलेल्या अनादी गुरुपरंपरेचे रक्षण करण्यासाठीच हि आज्ञा होती. त्यानुसार तृप्त मनाने बालक काही दिवसांत नांदणी गांवी परतला. बालकच्या मुखावरील अपार तेज पाहून सौ. अन्नपूर्णा माता चकित झाली.'याच्या पोटी अमृतच असावे,' असे म्हणत, इतके दिवसांच्या त्यांच्या काळजीतून ती मूक्त झाली.

# "जांभळी" गांवी आजीस पंढरीचा प्रसाद

जांभळी या गांवी श्री आबाजीपंत या यजमानांच्या बोलण्यानुसार श्री. अप्पाभटजी बालक, 'श्रीकृष्ण' सह तेथील मंगल कार्यासाठी एके प्रसंगी गेले होते. तेथील निमंत्रणामुळे आजूबाजूची बरीच नातेवाईक मंडळी भोजनासाठी जमली होती. त्याप्रसंगी त्या श्री. अबाजीपंताची कोणी एक नातेवाईक वयोवृद्ध म्हातार आजी सहज बोलताना म्हणू लागली. "उद्या एकादशी आहे. कित्येक भाग्यवंत पंढरीला जाऊन विठूरायाचे दर्शन करतील. पण मी अभागी मला कसली पंढरी." तिचे बोल ऐकून श्री. अबाजीपंत त्या आजीस म्हणाले, "अहो तुमची इच्छा असेल तर या आषाढी एकादशीस तुम्हाला नेऊ. नाहीतर कोण्या वारक-याकडून पंढरीचा प्रसाद पोहचवू." त्यावेळी शेजारीच उभे असलेल्या बालक श्रीकृष्णाने त्या आजीची तळमळ पाहून म्हटले,"हा देव व ता विठ्ठल काही वेगळा नाही. घ्या दर्शन" त्याचे बोलणे ऐकून श्री. आबाजीपंत म्हणू लागले,'खरोखरीच हा बालक मूढ असावा. काहीतरीच बोलत आहे' त्या दरम्यान बालक श्रीकृष्ण स्वतःशीच पुटपुटू लागला, "ही म्हातारी बिचारी गर्दीत पंढरीत कसे जाणार? आजी हा घ्या प्रसाद, पंढरीनाथ तुम्हांस प्रसन्न झाला. कशाला वारकरी पाहिजे?" असे म्हणत घरात दरवाजाबाहेरुन परत येत त्या आजीच्या हाती बालक श्रीकृष्णाने दोन पुड्या ठेवल्या. सर्वजण हसत हसत त्या म्हातारीस म्हणू लागले, "पाहा तरी त्या पुड्यांत काय आहे ते." आजीने पुड्या उघडून पाहाताच, तिच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. कारण, त्या पुडीपैकी एकीमध्ये होते 'पंढरीचा बुक्का' तर दुसरीत होते 'लाह्या-फुटाणे'. त्याप्रसंगी हे नवल पाहून सर्वजणच चकित झाले.

# सद्‍गुरु भेटीसाठी ‘श्री अक्कलकोटी’ प्रयाण

त्यानंतर त्याच गांवी आपल्या मातापित्यांना हे दैवी बालक ‘श्रीकृष्ण’ मोठ्या धीराने सांगू लागले, “आता तुमची भेटी संपली. मला खंडेरायाच्या आज्ञेनुसार अक्कलकोटी नृसिंहभान स्वामींच्या दर्शनासाठी गुरुभेटीला जावे लागेल तुम्ही चिंता करुन नका, श्रीदत्तप्रभूंचे स्मरण करुन आनंदात रहा. योग्यवेळी तुम्हांस मी जरुर भेटेन.” श्री अप्पाभटजीनी सौ. अन्नपूर्णा मातेस तिच्या पोटी जन्मलेल्या दत्तावतारी अंशाची आठवण कायम ठेवून त्यांच्या पुढील कार्यास त्यांना आनंदाने जाऊ देण्यासाठी सांत्वन केले. दोघांनीही मोठ्या विरहाने श्री दत्तप्रभूंचे स्मरण करीत या बालकास गुरुभेटीस जाण्यासाठी परवानगी दिली.

बालक‘श्रीकृष्ण’ मातापित्यांचा निरोप घेऊन त्वरीत गतीने श्रीक्षेत्र अक्कलकोटचा रस्ता चालू लागले. श्रीगुरुभेटीच्या आर्त ओढीने अवघ्या तीन दिवसात दिवसरात्र मार्गक्रमण करुन ते थेट अक्कलकोटी जाऊन पोहोचले. त्याच दिनी अगती सकाळपासूनच श्री स्वामी समर्थांची स्वारी मोठ्या आनंदाने “कृष्णा येणार, माझा कृष्णा येणार ” म्हणत आपल्या सत्शिष्य अंशावताराच्या भेटीसाठी व्याकुळ झालेली होती. अक्कलकोटी बालक ‘श्रीकृष्ण’ पोहोचून श्री स्वामी समर्थासमोर उभे राहताच मोठ्या लगबगीने त्यांस आपल्या पोटी कवटाळून श्रीस्वामी समर्थासमोर उभे रहाताच मोठ्या लगबगीने त्यांस आपल्या पोटी कवटाळून श्रीस्वामी समर्थ त्यांचे प्रेमभराने मुके घेऊ लागले. आजूबाजूचे लोक आश्चर्याने हे पाहून, “हा मुलगा निश्चित कोणी मोठा भाग्यवंत असेल” असे म्हणू लागले, श्रीस्वामी समर्थांनी बालक श्रीकृष्णास आपल्या हाती पकडून जनसंपर्कापासून दूर एकांती नेले. श्रीस्वामी समर्थासमोर लोटांगण घालून बालक ‘श्रीकृष्ण’ म्हणू लागले, “गाणगापूरी श्रीनृसिंह सरस्वती नामे कार्य करुन सध्या दत्तात्रेया-सद्‍गुरुस्वरुपा-माझेवर पूर्णकृपा कर.” बालक श्रीकृष्णाचे हे तू व मी एकच आहोत. तू माझाच अंश आहेस. अनादी श्री गुरुपरंपरा जतन करण्यासाठी तू मला शरण आला असलास तरी आपण दोघे एकरुप आहोत. आता काही दिवस येथे राहून पुढील कार्यासाठी तू करवीरक्षेत्री जा. तेथे ‘बालोन्मत्तपिशाच्चवत्’ अवधूत रुपे वास्तव्य करुन जागदोद्धार करीत रहा.”

# श्रीस्वामी समर्थांकडून “श्रीकृष्ण सरस्वती” नामाभिधान

बालक श्रीकृष्णाचा माथा कुरवाळून आपला वरदहस्त त्याचे मस्तकी ठेवीत श्री स्वामी समर्थ म्हणाले, “बाळा, आजापासून ‘श्रीकृष्ण सरस्वती’ असे आम्ही तुझे नामकरण केले आहे. यापुढे याच नावांने भाविक तुला ओळखतील.” दोघेही काही काळ मग ब्रह्मानंदाच्या मस्तीत समाधीअवस्थेत एकत्र राहीले. पुढे श्रीस्वामी समर्थांनी आपल्या सर्व भक्तजनांना सांगून मोठ्या समारंभाने गोडधोड पक्वान्ने बनवून, सडारांगोळ्या घालून अतिशय प्रेमाने या नूतन बाल यतीश्वर “श्रीकृष्णसरस्वतीस्वामी” ना आपल्या शेजारी बसवून जेऊ खाऊ घातले. एखाद्या सणासुदीप्रमाणे तो दिवस अक्कलकोटीच्या मठीत संपन्न झाला. काही दिवस श्री स्वामी समर्थांच्या सहवासात ते राहिले. एके दिवशी एक कृष्ठरोगी ब्राह्मण श्रीक्षेत्र गाणगापूरहून तेथील श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेनुसार अक्कलकोटी आला. श्री. स्वामी समर्थांच्या चरणी गडबडा लोळून आपलो कुष्ठ बरे करण्यासाठी प्रार्थना करु लागला. तेव्हा शेजारी उभे असलेल्या ‘श्रीकृष्णसरस्वतीस्वामी’ कडे बोट दाखवून श्री स्वामी समर्थ त्या ब्राह्मणास म्हणू लागले. “अरे आता तू या श्रीकृष्ण गुरुसमवेत करवीरी जाऊन त्यांची सेवा कर. तुझे कुष्ठ नाहीसे होईल.” तो ब्राह्मण बरेच दिवस मोठे कष्ट सोसून गाणगापूरी सेवा करुन तेथील आज्ञेनुसार मोठ्या आशेने श्रीस्वामी समर्थांकडे आला होता. त्याला होणारी शारिरीक पीडा ही असह्य होत होती. त्यामुळे पुढे करवीरी जाण्यास त्याचे मन होईना. तेव्हा श्रीस्वामी समर्थांनी स्वमुखे त्यांस ‘श्रीकृष्णसरस्वतीस्वामी’ यांचा थोर महिमा समजावून सांगून बळेच त्यास त्यांचेसोबत जाण्यास तयार केले. आता श्रीदत्तप्रभूंच्या संकेतानुसार ‘श्रीकृष्ण सरस्वतीस्वामी’ यांचा ‘दत्त महाराज’ रुपाने करवीर क्षेत्राच्या कार्यास प्रारंभ होणार असल्याने श्री स्वामी समर्थांनी पण श्रीकृष्णसरस्वीस्वामींना त्या ब्राह्मणसह करवीरी जाण्यास आज्ञा केली.

# श्री स्वामीसमर्थ आज्ञेने करवीरनगरीकडे

श्रीस्वामी समर्थांच्या इच्छेनुरुप त्या ब्राह्मणासह श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज अक्कलकोट सोडून करवीरकडे चालू लागले. वाटेत एका खेडेगावी रात्रीच्यावेळी ते एका मंदिरामध्ये थांबले. मध्यरात्री त्या ब्राह्मणाची परिक्षा पहाण्यासाठी त्यांनी त्यास गांवातून दूध मागून आणण्यास सांगितले. इतक्या रात्री अपरिचित खेडेगांवी दूध कोठून मागावे? हा विचार करीत तो ब्राह्मण गांवात शोध करु लागला. तेव्हा एका घरी दिव्याचा उजेड व थोडी गडबड ऐकू आली. तो तिथे गेल्यावर समजले त्याघरी एक स्त्री गेले तीन दिवस प्रसूति वेदनेने तळमळत आहे. त्या ब्राह्मणाला तिची दया आली. त्याने मंदिरी येऊन आपल्या श्रीगुरु महाराजांना प्रार्थना करण्यास त्या घर मालकास सुचविले. तेव्हा "इतक्या रात्री आपण येथे कसे आलात?" असा प्रश्न विचारताच त्याने श्रीगुरु महाराजांनी दूधाचे निमित्त करुन पाठविल्याचे सांगितले. त्याचे बोलणे ऐकून घरमालक दूध घेऊन मंदिरी आला. तेव्हा अंधारातूनच त्या घरमालकाचे तोंड न पहाताही, श्रीकृष्ण सरस्वती महाराज म्हणू लागले. "अरे, गोविंदा, लवकर घरी जा, तुझे काम झाले," तेव्हा तो चकितच झाला. दर्शनासाठी श्रीमहाराजांच्या पायी वाकताच त्याच्या डोक्याचा रुमाल काढून घेऊन काही वेळ हाती ठेवून परत त्यास देत म्हणाले, "चला आता इथले काम झाले," श्री गोविंदपंत दर्शन घेऊन घरी येऊन पहातात तो इकडे पत्नी सुखरुप प्रसूत होऊन मुलगा झाला होता. सोबतचा कृष्ठीब्राह्मण ही लीला पाहून चकित झाला. त्याचे मन आनंदाने भरुन गेले.

# श्री महालक्ष्मी अंबाबाई मंदिर परिसरामध्ये

थोड्याच दिवसांत करवीर नगरीमध्ये 'श्रीकृष्ण सरस्वती' दत्त महाराज त्या ब्राह्मणासह येऊन पोहोचले. सुप्रसिद्ध श्री महालक्ष्मी अंबाबाई मंदिराच्या परिसरातील श्रीराममंदिराच्या ओवरीमध्ये त्यांनी आपला पहिला मुक्काम ठोकला. श्रीराममंदिरी श्रीमहाराज प्रसन्नमुद्रेने त्या ब्राह्मणासह बसले असताना एक स्त्री श्री अंबाबाईचे दर्शन करुन श्रीराममंदिरी आली. अगदी सहजच तिची नजर तिथे बसलेल्या श्रीमहाराजांकडे गेली. नजरानजर होताच त्या स्त्रीच्या अंगात पिशाच्च संचारले. बरेच दिवस त्या स्त्रीला एका पिशाच्च समंधाची बाधा होती. ती वेडेवाकडे हातवारे करीत भलते सलते शब्द बोलू लागली. तेव्हा श्री महाराज आपल्या आसनावरून उठून त्या स्त्रीला मारून पिशाच्चाला तिच्या शरीरातून दूर होण्यास ताकीद देऊ लागले. ती स्त्री गडाबडा लोळू लागली. स्त्री सूलभ लज्जारक्षणार्थ पदर सांभाळण्याचे भानही तेव्हा तिला नव्हते . श्री महाराजांचा मार खाऊन त्यांच्या सामर्थ्यशाली हस्तस्पर्शाने त्या पिशाच्चाने त्या स्त्रीला बाधेतून मुक्त केले. पुढे भांनावर येताच सोबतच्या बायांकडून हे ऐकून ती स्त्री ही श्रीमहाराजाचे हर्षभराने दर्शन घेऊन घरी गेली. घरच्या मंडळींना हा सर्व वृतांत ऐकून बरीच दिवसांची तिची बाधा नाहीशी झाल्याने फारच समाधान झाले. त्या स्त्रीचा पती श्री महाराजांच्या दर्शनासाठी येऊन आपल्या घरी येण्यासाठी श्री महाराजांना विनवू लागला. पण श्री महाराज त्याचे घरी गेले नाहीत. त्यांस आशिवार्द देऊन परत पाठविले. श्रीराममंदिरी मुक्काम असताना सोबतचा ब्राम्हण माधुकरी भिक्षा मागून आणि व महाराजांना समर्पून प्रसाद सेवन करुन यथाशक्य सेवा करीत असे. श्री. अंबाबाईच्या मंदिरी दर्शनासाठी येणा-यांना सहजच श्री महाराजांचे दर्शन घडू लागले. नुकतीच बारा वर्ष पिशाच्चबाधित असणारी स्त्री मुक्त झाल्याचे पाहून व त्या सोबतच्या ब्राम्हणाकडून श्रीमहाराजांचा महिमा ऐकून त्यांचा अनेकांना परिचय घडू लागला. श्री फडवणीस नावांचे एक सज्जन भाविक गृहस्थ हे सर्व पाहून श्रीमहाराजांकडे फारच आकृष्ट होऊ लागले. ते नित्य दर्शनास येऊन श्रीमहाराजांना आपल्या घरी येऊन रहाण्याची विनंती वारंवार करीत असत. एके दिवशी श्री महाराजांनी सोबतच्या ब्राम्हणास प्रेमाने जवळ बोलवून, त्याच्या सेवाभावनेने संतुष्ट होऊन आशिवार्द देत सांगितले,"तू पंचगंगेवर जाऊन स्नान करुन ये म्हणजे तुझा कुष्ठ पूर्णपणे नष्ट होईल." श्रीमहाराजांची वाणी ऐकून त्या आज्ञेनुरुप तो ब्राम्हण पंचगंगानदी किनारी गेला. तेथे मोठ्या श्रद्धेने श्रीमहाराजांचे स्मरण करीत त्यांच्या आज्ञेनुसार स्नान करुन काठावर आला व आपले अंग पुसू लागताच पाहू

लागला की, इतके दिवसाचे कुष्ठ शरिरावर किंचितही दिसेना. त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. लगबगीने वस्त्रे नेसून तो श्रीमहाराजांच्या दर्शनासाठी श्री महालक्ष्मी मंदिरामध्ये आला. नेहमीच्या ठिकाणी श्रीमहाराज दिसेनात, त्याने आजूबाजूलाही खूप शोधून पाहिले. पण श्रीमहाराज सापडेनात. थकून श्रीराममंदिरी विश्रांतीसाठी तो थोडावेळ ओवरीमध्ये आडवा झाला. तेव्हा त्याचा डोळा लागून त्यांचे स्वप्नी श्रीमहाराज येऊन म्हणू लागले. “तुझी सेवा पूणर् झाली. आता तू घरी जाऊन सुखाने तुझा उर्वरीत संसार पूरा कर.” श्रीमहाराजांचा हा स्वप्नदृष्टांत पाहून तो ब्राम्हण खडबडीने जागा झाला. श्रीमहाराजांचा विरह सहन होईना पण आज्ञेनुसार जाणे क्रमप्राप्त आहे हे जाणून श्रीमहाराजांचे स्मरण करीत तो सुखाने आपल्या घरी परत गेला.

# सदभक्त श्री फडणवीसांच्या घरी

इकडे त्या ब्राम्हणास पंचगंगा नदीवर पाठविल्यावर जेव्हा नित्याप्रमाणे श्रीराममंदिरी श्री. फडणवीस श्रीमहाराजांच्या दर्शनासाठी आले असताना, श्रीमहाराजांनी त्यांचा हात धरून त्यांच्याबरोबर घरी जाण्याची गडबड केली. जाता जाता वाटेत ते म्हणू लागले, “आम्ही येतो खरे पण मनोभंग करुन दुःखी होऊ नका,”श्री फडणवीस मोठ्या आनंदाने श्रीमहाराजांना घरी घेऊन आले . घरात पत्नी त्यांच्या लहानग्या बाळास खेळवत होती. श्रीमहाराजांचे वागणेही बालसदृश्यच असे. त्यांचे खाणे-पिणे-कपडे-लत्ते-आंघोळ-पांघोळ अगदी लहान मुलाप्रमाणेच करावे लागे. तसेच श्रीमहाराजांचे बोलणेही साधारण जनांस अगम्य वाटणारे होते. श्री फडणवीसांप्रमाणे श्रीमराहाजांना त्रास देई. तिला वाटे नव-याने कोणती ही पीडा घरात आणून ठेवली आहे. काही कळत नाही. आधीच आपल्या बाळाचे सर्व काही मुलाप्रमाणेच करावे लागते. त्यातच या श्रीमहाराजांचे पण खाणे-पिणे-हगणे-मुतणे अगदी मुलाप्रमाणेच करावे लागते. कोण जाणे आपला नवरा या वेड्याच्या नाद कसा लागला कळत नाही. ती नव-यासही ‘श्रीमहाराजांना घरी ठेवून घेऊ नका’ म्हणत असे. पण श्री फडणवीस एकनिष्ठ श्रद्धेने सेवा करीत पत्नीला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत. एके दिवशी श्रीमहाराज म्हणू लागले, “अशुभ वेळ आली रे, कातर वेळ आली.” त्या दरम्यान त्यांचे लहानमूल अकस्मात मृत्यू पावले. तेव्हा तर पत्नीने हंबरडा फोडून नव-याला नको ते बोलू लागली, “तुमच्या या श्रीमहाराजांच्या पायगुणामुळेच माझे मूल मेले.” नव-याने शांत चित्ताने सर्व ऐकून घेऊन दुःख पचविले. परंतु श्रीमहारांच्या चरणावरील त्यांची श्रद्धा तीळभरही कमी झाली नाही. त्यांची सेवा त्याने पूर्ववत् सुरुच ठेवली. पतीपत्नीचा नित्याचा वाद, संताप ऐकून एकदा श्रीमहाराज म्हणाले, “अरे आता सुलक्षणी मुले होतील. काळजी करु नका” श्री फडणवीसांना हाताशी धरुन जवळच्याच एका घरी श्रीमहाराजांनी नेले. अवचित श्रीमहाराज आपणहून घरी आलेले पाहून त्या घरच्या माऊलीला फार आनंदा झाला. तिने श्री. फडणवीसांना सांगितले काही दिवसांपूर्वी माझा मूलगा ज्वरतापाने फणफणला. औषधाचा उपयोग होईना, तेव्हा मी मनोमन श्रीमहाराजांना प्रार्थना करुन नवस बोलले होते. पुढे खरोखरीच केवळ श्रीमहाराजांच्या कृपेनेच मुलगा खणखणीत बरा झाला. पण बोललेला नवस मी पुरा केला नव्हता. आज स्वतःच

श्रीमहाराज कृपाळूपणे घरे आलेत. तेव्हा थोडा वेळ थांबा. त्यांची पूजा करुन मी माझा नवस फेडून घेते. तिने मुलाला गडबडीने नविन पितांबर खरेदी करुन येण्यास सांगितले आणि श्रद्धेने पूजा करुन श्रीमहाराजांना तो पितांबर तेथेच काढून टाकून श्री फडणवीसांना श्रीमहाराज म्हणाले "आता पुढील कार्यासाठी मला बाहेर जावे लागेल, तू काही दुःखी होऊ नकोस. तुला जवळच माझे दर्शन-सहवास मिळेल." श्री फडणवीस परत परत घरीच राहण्याचा आग्रह करु लागले पण श्री महाराजांनी त्यांचे समाधान करुन त्यांना प्रेमपूर्वक आशिर्वाद देऊन तेथून गमन केले. कालंतराने श्री फडणवीसांना सुलक्षणी मुले लाभली, पत्नीलाही श्रीमहारांजांचा महिमा समजला.

# सदभक्त श्री. म्हैसाळकर यांचे गांवी

'श्रीकृष्णसरस्वती' दत्त महाराजांचा महिमा ऐकून श्री. फडणवीसांचे घरी नेहमीच नवनवीन भाविक भक्त दर्शनासाठी गर्दी करीत असत पाच सहा महिने त्यांचे वास्तव्यही झाले. त्याचवेळी श्री. म्हैसाळकर नावांचे एक सधन-इनामदार गृहस्थ अतिशय भाविकपणे नेहमी दर्शनासाठी येत असत. त्यांचेही मनी ही श्रीगुरुमुर्ती आपल्या घरी यावी अशी नित्य ओढ होती. पण श्री. फडणवीसांना वाईट वाटेल म्हणून ते बोलू शकत नव्हते.'श्रीकृष्णसरस्वतीस्वामी' हे अंतर्यामी असल्याने ते ही तळमळ जाणून होतेच. श्री. फडणवीसांच्या घरील कार्यभाग संपताच त्यांनी दर्शनास आलेल्या श्री. म्हैसाळकर यांचा हात धरुन त्यांना सोबत घेऊन चालविले ही संधी पाहून ते आपल्या घरी येण्यास विनवू लागले तेव्ही श्री महाराज म्हणाले, "करवीरातील एक काम करुन तुझे घरी जाऊ." हे ऐकुन ते ही आनंदाने श्री महाराजांसोबत जाऊ लागले. श्री महाराजांनी त्यांना थेट कुंभार गल्लीमध्ये नेले. तेथील श्रीताराबाई शिर्के या भाग्यवान स्त्रीच्या दारी उभे राहून श्रीमहाराज म्हणून लागले, "आई, मी आलो. आई, मला जेवालया वाढ." आवाज ऐकुन श्री ताराबाई दारामध्ये आल्या. तो समोर एक तेजस्वी बालमूर्ती हट्टाने परत परत जेवायला मागू लागल्याने पाहून त्या फारच अचंबित झाल्या. पण त्या बालमूर्तीचे तेज पाहून आपल्या सारख्या सामन्य स्त्रीच्या हातचे शिजलेले अन्न त्यांना कसे द्यावे, या विचाराने त्या म्हणू लागल्या. "मी स्वयंपाकासाठी कोरडा शिधा-धान्य देते. तुम्ही स्वतः करुन खा." असे म्हणत म्हणत त्या शिधा आणण्यासाठी घरामध्ये गेल्या तोच श्रीमहाराजांनी सोबतच्या श्री. म्हैसाळकरांना खूण करुन जलदगतीने तेथून पूढे चालण्यास सांगितले. मग अगदी निवांतपणे ते त्यांचे सोबत श्री. म्हैसाळकरांच्या गांवी 'म्हैसाळ' येथे आले. बरेच दिवसांची आपली तळमळ पूर्ण झाल्याचे पाहून श्री. म्हैसाळकरही आनंदाने वेडे झाले. त्यांनी आपल्या सर्व परिवारासह श्रीमहाराजांची यथासांग षोडशोपचारे पूजा-अर्चा करुन नैवेद्य समर्पण केला. पुढे काही दिवस श्रीमहाराज त्यांचे घरीच मुक्कामी राहून त्यांचे सामाधान करुन त्यांची सेवा आवडीने

स्विकारत राहिले.

# सदभक्त श्रीताराबाई शिर्केना श्रीदत्तप्रभूंची आज्ञा

इकडे कोल्हापूरातील कुंभारगल्लीमध्ये श्रीताराबाई ज्या घरात शिधा आणण्यासाठी आत गेल्या होत्या त्या शिधा घेऊन बाहेर येताच, त्यांना समोर कोणीच दिसेना. बरेच आजूबाजूसही पाहिले पण त्या बालमूर्तीचा थांग लागेना. अखेरीस मनात हूरहूर करीत त्या घरी येऊन स्वस्थ बसल्या या श्रीताराबाई शिर्के म्हणजे विषयी लोकांच्या दृष्टीने एक वेश्या तर सूज्ञ भाविकांच्या दृष्टीने एक परमदत्त भक्त होत्या. पूर्वी श्री शिवशंकर भक्त 'महानंदा' झाली, श्री पंढरीनाथ भक्त 'कान्होपात्रा' झाली तशीच त्यावेळी श्रीदत्तप्रभूंच्या भक्तीत रमलेली ही 'ताराबाई' होती. दर पोर्णिमेस न चुकता श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला जाऊन श्रीदत्तप्रभूंचे दर्शन घेण्याचा तिचा नियम चुकत. तेथे श्रद्धेने पूजन-भजन करुन यथाशक्य ते अन्नदान करण्याचा तिचा बरेच दिवसांपासूनचा नियम होता. तिच्या या नियमामध्ये तिला पोटशूळाची भयंकर वेदना असताना पण कधीच खंड पडला नाही. दारी येऊन गेलेल्या बालमूर्तीच्या विरहामध्ये काही दिवस जाताच आलेल्या पौर्णिमेस नित्य नियमाप्रमाणे ताराबाई वाडीक्षेत्री दर्शनास निघाल्या. पोटशूळाची व्यथा तर अगदीच असह्य होऊन बसली होती. कशीबशी ती वाडीस पोहोचली. कृष्णेमध्ये स्नान करुन नेहमीप्रमाणे दर्शन पूजन केले. श्रीदत्तप्रभूंसमोर आपल्या असह्य दुखण्यामुळे यापुढे वाडीस येण्याच नियम चालविणे अवघड असल्याने सांगून डोळ्यांत आसवे आणून श्रीदत्तप्रभूंच्या कृपेसाठी प्रार्थना करु लागली. नित्याप्रमाणे यथाशक्य अन्नदान केले. तो दिवस श्रीदत्तप्रभूंच्या चरणी पूर्णपणे तळमळत व्यतीत करुन रात्री अस्वस्थचित्ताने ताराबाई विश्रांतीसाठी झोपल्या. त्यावेळी तिचे लाडके उपास्य दैवत'श्रीदत्तप्रभू-श्रीपादयती' तिच्या स्वप्नी आले. तिची असह्य वेदना व आजवरची तिची श्रध्दा निष्ठा पाहून श्रीदत्तप्रभू तिला स्वप्नामध्ये सांगू लागले. "अग मीच तुझ्या दारी बालमूर्तीच्या रुपाने

आलो होतो. पण तू मला औळखले नाहीस. मला जेवायला घातले नाहीस. उगाचच संशय धरुन कोरडा शिधा देण्याची खटपट केलीस. बरे असो. आता आम्हास घेण्यास ‘म्हैसाळ’ला ये. यापुढे तुझी व्याधी पूर्णपणे नाहीशी होईल. घरी राहून आमची सेवा करीत जा, वाडीस येण्याची आता जरुरी नाही. ” घरी इतका सुंदर सुखद स्वप्नदृष्टांत पाहून ताराबाईंची सर्व तळमळ नाहीशी झाली. ती वाडीतून श्रीदत्त प्रभूंच्या आदेशाप्रमाणेच तेथील दर्शन-पूजा यथासांग करुन अगदी उतावीळपणे ‘म्हैसाळ’ येथे आली.

# कोल्हापूरी कुंभारगल्लीत ‘तारासदनी’ वास्तव्य

श्री. म्हैसाळकरांच्या वाड्यात ‘श्रीकृष्ण सरस्वती ’ दत्त महाराजांची ती तेजस्वी बालमूर्ती हसतच सामोरी बसलेली दिसली. ताराबाईने श्री महाराजांच्या पाया लोटांगण घालून, “आपण घरी येऊन जेवायला मागितले तेव्हा आपणांस न ओळखून, मी जेऊ घातले नाही. त्याबद्दल मला क्षमा करा.” अशी प्रार्थना केली. श्रीमहाराजांनी पण तिची शुद्ध प्रीती पाहून, “आई-आई मी आता तुझ्या घरी येतो,” असे सांगितले श्री. म्हैसाळकरांना वाईट वाटले. श्रीमहाराजांचा सहवास आता दूरावणार म्हणून ते दुःखित होताच श्रीमहाराजांनी त्यांची समजूत काढून, “तुम्ही कोल्हापूरला माझे भेटीसाठी नेहमी यावे. मी कोठे लांब जात नाही.” असे सांगून समाधान केले. ताराबाईने तेथून मोठ्या आदराने श्रीमहाराजांना आपल्या घरी कुंभारगल्लीमध्ये वास्तव्यासाठी आणले. तिच्या घरी तिची म्हातारी आई भीमाबाई व मुलगा दत्तोबा होता.

श्री महाराज म्हणजे साक्षात् श्रीदत्त प्रभूच ही खूणगांठ पटल्याने ताराबाई मोठ्या प्रेमादराने त्यांची सर्व सेवा करीत असे. ‘श्रीकृष्ण सरस्वती’ दत्त महाराज व ‘श्रीनृसिंह सरस्वती स्वामी’ एकच असल्याने ‘स्वामी’ नांवानेच ती त्यांना संबोधू लागली. त्यांच्यासाठी बसण्यास-निजण्यास स्वतंत्र सुंदर आसन मांडून सर्व काही व्यवस्थित सन्मानपूर्वक करण्यासाठी ती प्रयत्नशील असे. सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंत एखाद्या लहानग्या निष्पाप मुलाप्रमाणे आंघोळ-पांघोळ, जेवण-खाणं वगैरे इतकेच काय त्यांचे नित्य तोंड धुण्यापासून-शौचापर्यंत सर्व काही

तिलाच करावे लागे. श्रीमहाराज नित्य दिगंबर-अवधूत स्थितीत देहाचे कोणतेच भान न ठेवता नित्य आपल्याच ब्रह्मानंद मस्तीत वावरत असत. वरवर पहाणा-यास त्यांचे बोलणे-वागणे विसंगत-वेडसरपणासारखेच भासत असे. काही काही भाग्यवान श्रद्धाळूजनांना त्यांचा थोर अधिकार कळल्यामुळे ते नेहमीच ताराबाईच्या घरी त्यांच्या दर्शन-सहवासासाठी येत-जात असत.

# भिमाबाईंचा उद्धार

ताराबाईच्या आई भीमाबाईंना आपल्या लेकीने वाडीचे दत्तदर्शन सोडून श्रीमहाराजांच्या भजनी लागलेले मुळीच आवडेना. तिला श्रीमहाराजांचा अधिकार कळला नव्हता. त्यांची बाह्य वागणूक पाहून ती त्यांना वेडसरच समजे. ताराबाई व इतरही भाविक भक्तांची ती टिंगल करी. ताराबाईंने त्यांचा नाद सोडून द्यावा. म्हणून ती नेहमीच प्रयत्न करी. अगदी स्पष्टपणे श्रीमहाराजांची निंदा करी. ताराबाईला आपल्या आईचे अज्ञान पाहून दुःख होई. एकदा श्रीमहाराजांच्या दर्शनासाठी आलेल्या भक्ताचे सोन्याचेकडे चोरीस गेले. तेव्हा तो चोरीचा आळ भीमाबाईवर आला. ती घाबरून गेली. पोलीस चौकशी करु लागले. भीमाबाई भीतीने व्याकुळ झाली. श्रीमहाराजांची निंदा करण्याचे पातक म्हणूनच हा आळ आपल्यावर आल्याचे तिला समजले. ती मनोमन श्रीमहाराजांना शरण गेली. श्री. महाराजांनी हसत तिच्याकडे पाहीले. पुढे झडती अंती खरा चोर सापडला व भीमाबाईंवरील आरोप नाहीसा झाला. तेव्हा पासून ती थोडेफार श्रीमहाराजांना बिचकून वागू लागली. एकदा असेच भीमाबाई काही शेजारणीसोबत सारीपाट सोंगट्याचा खेळ खेळत बसली होती. श्रीमहाराज तेथे येऊन त्यांनी काही सोंगट्या हलवून भीमाबाईस काहीसे सूचक शब्द वापरले. तेव्हा चिडून जाऊन भीमाबाईने श्रीमहाराजांना शयनगृहात नेवून निजविले व बाहेरुन दाराची कडी लावून घेतली. परत सोबतीणींसोबत खेळामध्ये रंगून गेली. थोड्या वेळाने श्रीमहाराज कुठे आहेत म्हणत ताराबाई तिथे आली. तेव्हा “अग

घाबरतेस काय, मी त्यांना निजवले आहे," असू सांगून भीमाबाई शयनगृहाची कडी काढून ताराबाईला आत नेऊ लागल्या. आतमध्ये पहातात तो श्री महाराजांचा पत्ता नाही. ताराबाई तळमळीने कासांवीस झाल्याचे पाहून भीमाबाई घाबरली. त्यावेळी ताराबाईच्या घरी असलेल्या औदुंबराच्या झाडावर बसून महाराज पाने तोडून टाकून खेळ करीत बसल्याचे शोधानंतर समजले. निजलेल्या खोलीतून बंद केलेल्या दरवाजा शिवाय बाहेर येणास दुसरा मार्ग नसताना बाहेरुन कडी लावून आपणच समोरच बसले असताना ती कडी तशी बदंच राहून श्रीमहाराज मात्र थेट औदुंबरावर जाऊन बसले याचे नवल भीमाबाईला कळवळीने सांगितले. श्रीमहाराजांना पण तिथे प्रार्थना करुन आपल्या आईच्या उद्धार करावा अशी करुणायुक्त श्रमाप्रार्थना केली. तेव्हा श्रीमहाराज हसत हसत उंच फांदीवरुन टुणकन् उडी मारुन खाली आले. भीमाबाईने त्यांचे पाय धरुन क्षमा मागितली. पुढे भीमाबाई ताराबाईला विरोध न करता श्रीमहाराजांच्या सेवेत मदत करु लागली. ताराबाईचा मुलगा दत्तोबा पण आईसोबत श्रीमहाराजांची सेवा करीत असे. कालंतराने वृध्द भीमाबाई सुशील पत्नी सौ. लक्ष्मीबाईसह ते श्रीमहाराजांची सेवा-भक्ती करण्यामध्ये आपल्या 'आई ताराबाई' सोबत रंगून गेले. श्री महाराजांची ठेंगणीृ-सुबक-सांवळीमूर्ती व त्यांची विदेही स्थिती भक्तांना आनंददायी वाटे. पण बाह्य वर्तनावरून ज्यांना त्यांची उच्च अवस्था कळाली नव्हती, ते अज्ञानी कुटाळ लोक मुद्दाम त्यांची टिंगल करीत, त्रास देण्याचा प्रयत्न करीत असत.

# सदभक्त श्री. कृष्णा लाड यांना बाबुजमालचा दृष्टांत

कोल्हापूरच्या उत्तरेस श्री उत्तरेश्वराचे प्राचीन शिवमंदीर आहे. त्या परिसरामध्ये श्री. कृष्ण लाड नांवाचा एक सज्जन रहात होता. तो कोल्हापूरातील प्रसिद्ध 'बाबुजमाल दर्गा' येथे नित्य जात असे. त्या दर्ग्याजवळच पूर्वीचे 'प्रल्हाद सरोवर' होते. श्री कृष्ण लाड दररोज त्या प्रल्हाद सरोवर तळ्यावर स्नान करुन मोठ्या श्रद्धाभावनेने बाबूजमाल दर्ग्यातील पीरस्थानाची सेवा करीत असे. तेथे झाड-लोट-पूजा-अर्चा करुन ध्यानाला बसे. शेजारच्या तालमीमध्ये व्यायाम करी. बरेच दिवस त्याचा हा नियम चालू होता. नेहमीप्रमाणे पूजा करुन तो दर्ग्यातील तुरबती जवळ बसला असताना त्याला त्यामधून प्रत्यक्ष बाबूजमाल पीर साहेब प्रगट होऊन दर्शन देत सांगू लागले. "कृष्णा, हम तुमसे खुश है । तुम्हारी सेवासे संतुष्ट है । अभी तुम हमारे भैया'श्रीकृष्णसरस्वती स्वामीजी' से मिलो । वह ओर हम एकही है । तुमने अभी तक उनको पहँचाना नहीं । अभी जल्दी उनके पॉव पकडो । इधर आनेकी जरुरी नहीं।" श्री.कृष्णा लाड या अतर्क्य दर्शन-संभाषणाने थकीत झाला. तसे श्रीराममंदिरा पासूनच श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजां बद्दल त्यांना माहिती होती. मध्यंतरी श्री. फडणवीसांच्या घरी व नंतर इतरत्र श्रीमहाराज फिरत राहीले. त्याने पण परत त्यांचा शोध करुन त्यांचेकडे जाण्याची तितकीशी तळमळ न बाळगता आपला बरेच दिवसां पासूनचा

बाबूजमाल दर्गा येथील नियमच चालू ठेवला होता. या दृष्टांता नंतरही त्याने त्याकडे मनःपूर्वक लक्ष न देता तो पूर्ववत् बाबूजमाल दर्गा येथेच नियमा प्रमाणे येत राहीला. पण दोन-चार दिवसामध्ये तो ज्वराने अचानक फणफणून गेला. त्याची शक्ती चालेना, तो बाबूजमाल दर्ग्यात बसला असताना पीरसाहेबांचा दृष्टांत त्यास परत परत तीव्रतेने जाणवू लागला. तेव्हा मात्र तो कुंभारगल्लीत ताराबाईंचे सदन शोधून श्रीमहाराजांच्या दर्शनासाठी तळमळत आला. त्याला पाहाताच श्रीमहाराज अगदी हसतच सहजपणे म्हणू लागले, “अरे, तू माझ्या बाबूचे ऐकले नाहीस ना त्याचाच हा ज्वर होता. अरे बाबू व मी दोघे प्यारे दोस्तच आहोत. बरे झाले तू त्याचे ऐकून येथे आलास. आता तुझा ताप पळाला बघ.” श्रीमहाराजांच्या मुखातून निघालेले हे उदगार ऐकून श्री. कृष्णा लाड स्तंभितच झाला. समोरचे ‘श्रीकृष्णसरस्वती स्वामी व बाबूजमाल पीरसाहेब सर्वथा एकच आहेत’ अशी त्याची खात्री पटली. मग तोही आता यापुढे या चालत्या बोलत्या बाबूजमाल रुपी स्वामींची सेवा निष्ठाभावनेने करु लागला. साक्षात् स्वामींनी आपल्या सारख्या सामान्यास, ‘आपला म्हणवून पायी ठांव दिला आहे.’ तर ‘आता यापुढे नश्वर संसारामध्ये गुंतून रहाणे बरे नाही.’ अगदी ठामपणे हा निश्चय करुन श्री.कृष्ण लाड आता श्रीस्वामींच्या सेवेतच दिवस रात्र रंगून गेला.

# सदभक्त श्री. वासुदेव दळवींची शेंडी घेतली

श्री. वासुदेव दळवी हा एक राजकर्मचारी ताराबाई सदनाजवळच रहात असे. हा पण भक्तीमार्गी साधक होता. दररोज प्रातः स्नानसंध्या देवदेवतार्चन करुन राजदरबारी प्रामाणिकपणे नोकरी करी. नित्य भागवत-गीता वगैरे धर्मग्रंथाचे पारायण अध्ययन करी. सायंकाळी श्रीमहाराजांच्या दरबारी येऊन काही काळ सत्संग-सेवा साधण्याचा प्रयत्न करीत असे. श्री स्वामींची सेवा करताना “संसारातून मुक्त करुन खरे ज्ञान द्या,” म्हणून विनवित असे. श्रीस्वामी त्यांची विनवणी ऐकून म्हणत असत, “शेंडी द्यावी लागेल.” श्री. दळवींचा स्वभाव फारच क्रोधी होता. नेहमीच पत्नीशी भांडण तर असेच पण इतरत्रही वादविवाद करताना लहान मोठा न बघता क्रोधायमान होण्याचा त्याच दुर्गुण मोठा होता. घरी भांडून श्रीस्वामींकडे आल्यावर दर्शनास येताच ते त्यास त्याबद्दल समज देऊन सावध करीत असत. इतरही कोणते विचार, प्रश्न मनात घोळत असले तर त्यावेळी ही श्रीस्वामी बिनचूक पणे ओळखून त्यास समजेल असे भाषण करती असत. त्यामुळे तो चकित होऊन जात असे. एकदा असेच कोणते तरी काम पत्नीस सांगूनही घरच्या व्यापात तिला जमले नाही. कामावरून घरी येताच ते काम केले नाही म्हणून तो चिडला.

पत्नीने चूक कबूल करीत समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी पण त्यादिवशी त्याचा रागाचा पारा इतका चढला की आता यापुढे संसारच नको, श्रीगुरुमहाराज स्वामींचीच सेवा करत राहाणेच योग्य असे ठरवून, रागा रागाने त्याने घर सोडले. ताराबाई सदनी श्रीस्वामी चरणी येऊन त्याने दंडवत घालताच श्रीस्वामी म्हणू लागले, "अरे आता तरी आम्हांस शेंडी देशील काय?" हे ऐकताच शेंडी देणे म्हणजेच संन्यास घेणे हा अर्थ दृढ करुन श्री दळवींनी ताबडतोब नापितास बोलावून आपली शेंडी काढून श्रीस्वामींच्या चरणी अर्पण केली. श्रीस्वामींनी पण योग्य वेळ जाणून त्यास व पूर्वीच सेवेत येऊन राहिलेल्या श्री. कृष्णा लाड यांस दोघांसही भगवेस्त्र दिले. आता दोघेही श्रीस्वामींचे संन्यासी शिष्य बनले. श्री.दळवींची पत्नी काही काळाने तेथे येताच नव-याने संन्यास घेतल्याचे पाहून प्रथमतः ती व्यथित झाली. आंता यापुढे मुलाबाळांचे संगोपन करण्याची जबाबदारी सर्वस्वी तिच्यावर पडली. कारण श्री. दळवींचा निश्चय ठाम होता. त्यांनी घरी जाण्याचे सर्वस्वी नाकारले. पत्नीस माता म्हणून प्रणामही केला. 'श्रीस्वामीच तुमचे रक्षण करतील' असे सांगून ते तिला निरोप देऊ लागले. तीपण धीरगंभीर वृत्तीने श्रीस्वामी चरणी वंदन करुन आपल्या पतीकडून यापुढे क्रोधरहीत राहून श्रीस्वामी सेवा घडावी म्हणून प्रार्थना करीत घरी परतली. श्रीस्वामींचे कृपेनेच संसारासाठी योग्य व्यवस्था लागून इकडे श्री. दळवी पण शांत चित्ताने श्रीस्वामींची सेवा करीत राहीले.

# सदभक्त रामदासबुवा ब्रम्हचारींना गाणगापुरी आदेश

श्री क्षेत्र गाणगापूर हे श्रीनृसिंह सरस्वती स्वामींचे परमपवित्र तीर्थक्षेत्र दत्तपरंपरेत सुप्रसिद्ध आहे. भीमा-अमरजा संगमक्षेत्री श्रींचा प्रासादिक औदुंबर, भस्माचा डोंगर, श्रींच्या निर्गुणपादुका वगैरे स्थानमहात्म्य दर्शनीय आहे. श्रीरामदास बुवा नांवाचा तरुण साधक विरक्तवृत्तीने या क्षेत्री येऊन राहीला. नित्य श्रीगुरुचरित्राचे पारायण करुन श्रींच्या पूजन-अर्चनामध्ये तो दिवसरात्र रंगून गेला. तीन वर्षे केवळ नींबपाल भक्षण करुन कडकडीत तपाचरणही त्याने चालविले होते. श्रीगुरंच्या कृपेने आत्मसाक्षात्कार लाभावा, हीच त्याची दृढ मनिषा होती. त्याची ही निर्मळसेवा पाहून श्रीदत्तप्रभूंचा त्यास दृष्टांत झाला, "अरे सध्या मी करवीर नगरीमध्ये श्रीकृष्ण सरस्वती स्वामी म्हणून वास्तव्य करीत आहे सोबत सेवेसाठी दोन संन्यासी आहेत. तू पण त्यांचे चरणी जा. तुझ्या तपाने शरीर क्षीण झाले आहे तरी तुला वाटखर्चासाठी सोबत काही पैसे देतो ते घेऊन बैलगाडीने कोल्हापूरी जा." श्रीरामदासबुवा श्रींचा हा दृष्टांत पाहून आजूबाजूस पाहू लागताच शेजारीच त्यांना पाच रुपये पडलेले दिसले. तेव्हा श्रीदत्तप्रभूंचीच ही लीला

जाणून तेथील श्रीदर्शन-पूजन करुन बैलगाडीने, मिळालेल्या पैशाचा विनियोग करुन त्यांनी कोल्हापूर गांठले. करवीर नगरीमध्ये कुंभारगल्लीतील श्रीकृष्ण सरस्वती स्वामींना

श्री. लाड व श्री. दळवी या दोन संन्यासी शिष्यांसह पाहून श्रीरामदासबुवा आनंदीत झाले. त्यांनी विनम्रभावे साष्टांग दंडवत घालून श्रीस्वामींच्या चरणी आपल्यासही ठेवून घ्यावे म्हणून प्रार्थना केली. श्रीस्वामींनी पण त्यांस होकार दिला. तेव्हा लग्न करुन संसारचक्रात न पडता ब्रह्मचारी राहूनच श्रीस्वामींची सेवा करीत जीवन कृतार्थ करुन घेण्याचा श्रीरामदासबुवांनी ठाम निर्धार केला.

# स्वामींचे पुजारी सदभक्त श्री. रामजीभाऊ फारीक

श्री. रामभाऊ फारीक हे सारस्वत ब्राम्हण व्यापार करुन उदरनिर्वाह करीत. त्यांचा स्वभाव देवधर्माचा होता. संत भक्तांची चरित्रे आवडीने वाचत. बोधपर धार्मिक ग्रंथही त्यांच्या वाचनात असत. श्रीदत्तगुरुंची भक्ती ते मनोभावे करीत. एकदा त्यांच्या घरी सोन्याच्या दागिन्याची चोरी झाली. त्यांनी चोरीचा खूप तपास केला. दागिने परत मिळावे म्हणून काही दैवी उपायही केले. त्याच दरम्यान कुंभारगल्लीतील पूज्यश्री श्रीकृष्ण सरस्वतींचा महिमाही त्यांच्या कानी असल्याने ते या निमित्ताने कुंभारगल्लीत येऊ लागले. "माझा पुजारी माझा शोध करीत येत आहे." श्री रामभाऊ ताराबाई सदनी पोहचून श्रीस्वामी चरणी लागताच श्रीस्वामी म्हणू लागले, "रामजी आला-पुजारी आला." त्याचे हे बोल ऐकून श्री. रामभाऊंना समाधान झाले. चोरीचा दागिना मिळेल तेव्हा मिळो. या स्वामींची पूजा नित्य करण्याचा त्याने निश्चय केला. त्याच दरम्यान एका सदभक्ताने श्रीस्वामींकरिता एक सुंदर नक्षीदार सिंहासन तयार

करवून दिले. ताराबाईंच्या सदनी या सुंदर सिंहासनी बसलेल्या पूज्य श्री स्वामींची नित्य त्रिकाळ पूजा आरती केली जाऊ लागली. श्री रामभाऊ नियमितपणे पूजा करु लागले. प्रथम भेटीत श्रीस्वामींनी त्यांना पुजारी म्हणून संबोधिले होते. एकदा अशीच सर्व सेवा केल्यावर प्रसन्नपणे श्रीस्वामी श्री. रामभाऊंना म्हणाले, “आज रात्री घरी गेल्यावर झोपू नकोस व पहा काय होते ते.” रात्रीची भोजने उरकून श्रीस्वामींना शयनगृही निजवून श्री. रामभाऊ घरी परतले. पूज्य श्री स्वामींच्या आदेशानुसार रात्री झोपी न जाता ते बसून राहून श्रीस्वामींचे चिंतन करीत राहिले. त्यावेळी मध्यरात्री अचानकपणे दरवाजा बाहेरुन त्यांचे चोरीस गेलेले दागिने जसेच्याजसे परत आत टाकले गेले. आवाज ऐकून श्री. रामभाऊनी पाहिले तर आपले गेलेले दागिने परत घरी येऊन पडल्याचे त्यांना दिसले. कोणी नेले व कोणी टाकले काहीच कळेना. रात्र संपून सकाळी केव्हा एकदा श्रीस्वामींच्या चरणी दर्शनास जातो यांची वाट बघत नामस्मरणामध्ये काळ घालवून उजाडताच ते तारासदनी श्रीस्वामी पायी हजर झाले. श्री स्वामींची हसरी मुर्ती पाहून गहीवरुन कंठ दाटलेल्या अवस्थेत ते पुनःपुन्हा त्यांचे चरणी नमन करु लागले. ‘संसारातील व्यापातून मन निघून अशा श्रीस्वामी गुरुंच्या पायी चित्तदृढ रहावे,’ हीच प्रार्थना त्यांचे मुखातून प्रगट होऊ लागली.

# सदभक्त श्री. म्हादबा पटकर यांना ‘सदगुरुप्राप्ती’

कुंभारगल्लीतील तारासदनी सुंदर सिंहासनी विराजमान झालेले शुभ्र अंगरखा, हिरवी मखमलीची टोपी, गळ्यात मोत्यांच्या, सुवासिक फुलांच्या माळा, हाताशी भगवे वस्त्र, कपाळी चंदनाचा सुंदर तिलक अशाप्रकारे भक्तगणांची इच्छापूर्ती करणारे श्रीकृष्ण सरस्वती स्वामी सर्व उपचार-केवळ भक्तांच्या समाधनासाठी करवून घेत असत. पण बहुधा स्वच्छंदी-दिगंबर अवधूतपणे निर्मळ निरासक्तपणे कोणत्याही बाहय उपधीत न अडकताच ते मुक्तपणे वावरत असत. त्यांच्या किर्तीसुगंधामुळे लांब-लांबून भाविकभक्तांचे थवे दर्शनासाठी नित्य येतच असत. श्री म्हादबा पटकर हे कोल्हापूरातील एक सात्विक पुरुष हातमागावर सूत विणून वस्त्रे बनिवण्याचा व्यवसाय करीत.

पंचगंगा परिसरातील द्विमुखी मारुती चरणी यांची मोठी निष्ठा होती. संसारकामातून वेळ मिळताच या मारुती मंदिरी भजन पूजनामध्ये त्यांचा काळ व्यतीत होत असे. एकदा मंदिरी किर्तनातून 'श्रीसदगुरुभेटी शिवाय खरा परमार्थ साधणार नाही.' हे त्या किर्तनकाराने असे काही पटवून दिले की, श्री. म्हादबा पटकर यांना आता श्रीसदगुरु भेटी शिवाय आपले जीवन व्यर्थ चालल्याची तीव्र तळमळ लागून राहिली. श्रीसदगुरु भेटीच्या ओढीने फिरत असतानाच त्यांच्या कानी कुंभारगल्ली मधील थोर सत्पुरुष श्रीकृष्ण सरस्वतींचा महिमा ऐकू येऊ लागला. श्री. म्हादबा पटकर शुद्ध भावनेने तारासदनी श्रीस्वामींनी दर्शनासाठी येताच, "अरे, आता तू येथेच सेवा करीत रहा." अशी श्रीस्वामींनी त्यांची तळमळ जाणून प्रथमदर्शनीच आज्ञा केली. श्री. म्हादबांना इतके दिवस केलेल्या हनुमंत भक्तीचे फळ म्हणूनच श्रीस्वामीं सारखा सदगुरु लाभल्याने समाधान मिळाले. अगदी एकनिष्ठा सेवा करण्यासाठी संसाराचा व्याप सोडून श्री. म्हादबा पटकरही इतर शिष्यांप्रमाणेच श्रीस्वामींच्या सहवासात दिवसरात्र राहू लागले. निष्काम भक्तीने स्वतःचे जीवन धन्य करण्याची संधी त्यांनी श्रीस्वामी चरणी राहून स्वामीकृपेनेच पूर्ण करुन घेतली.

# सदभक्त चि. बाळकृष्ण रशिवडेकर यांचे मृत्युभय दूर

तारासदनी असताना सोबत भक्तगणांना घेऊन दररोज पंचगंगेच्या तीरी मनसोक्त फिरत राहाण्याचा श्रीमहारांजाच परिपाठ असे. येता-जाता अवचितच कोणा भाग्यवंता घरी श्रीमहाराजांचे जाणे घडे. श्रीमहाराजांच्या पदस्पर्शाने-सहवासाने वा त्यांच्या अतर्क्य बोलण्यातून समोरच्या अपरिचित व्यक्तीस काहींना काही आनंददायी अनुभव मिळत राही. श्रीमहाराजांच्या अशा सहज लीला सर्वदा सुरुच असत. बाळकृष्ण राशिवडेकर नांवाचा एक तरुण बालपणापासूनच भाविक-सरळमार्गी जीवन जगत असे. सहजच एकदा ज्योतिषांकडे पत्रिका पहाता त्यास बावीस वर्षे वयानंतर गडांतरयोग असल्याचे समजले. मन काळजीने कातर होऊन, माता-पित्यासह तोही दुःखी असे. तारासदनी

वास्तव्य करणार्या श्रीमहाराजांची ख्याती ऐकून बाळकृष्ण ते घर शोधीत तेथे येऊन पोहोचला. श्रीमहाराजांचे दर्शनासाठी पायावर मस्तक टेकविताच ते बोलले, "भ्याला रे भ्याला," बाळकृष्णाला आपली भीती श्रीमहाराजांना समजली म्हणून मोठा आधार वाटला. तो नेहमी दर्शनास येऊ लागला. श्रीमहाराज त्यास देहाच्या नश्वरतेबाबत सूचक ज्ञान देऊन भयापासून मुक्त करु लागले. त्याचे नित्य श्रीमहाराजांचे कडे जाणे-येणे घरच्यांना आणि इतर परिचितांना पटेना, तो उगाचच कोणाच्या तरी नादी लागला आहे तसेच त्यांना वाटे. एके दिवशी स्वतः श्रीमहाराजच बाळकृष्णाला मी तुझ्या घरी येतो म्हणाले. नेहमीप्रमाणे पंचगंगेतीरी फिरावयास जाण्यानुसार श्री.कृष्ण लाड, वासुदेव दळवी, रामजी फारीक वगैरे भक्तगणांना सोबत घेऊन श्रीमहाराज अचानकपणे बाळकृष्णासह त्याच्या घरी गेले. घरामध्ये त्याचे वृद्ध माता-पिता होतेच. ध्यानी-मनी नसताना श्रीमहाराज घरी आलेले पाहून प्रथमतः ती चकितच झाली. श्रीमहाराजांच्या अपूर्व दर्शनाने मातेच्या मनातील पूर्व संशय निघून जाऊन नम्रतेने ती चरण वंदू लागली. पश्चाताप व्यक्त करुन आपण उगीचच निंदा केल्याचे दुःख वाटून ती श्रीमहाराजांच्या चरणी "मुलाचा उद्धार व्हावा" म्हणून प्रार्थना करु लागली. श्री महाराज म्हणाले, "हा माझा बाळकू आता काही सेवा करुन परत येईल." माता त्यांना जेवण्यासाठी विचारु लागली, तेव्हा जे केले असेल ते जसेच्या तसे वाढण्याची श्री महाराजांनी घाई केली. इकडे तारासदनी ती बिचारी परत परत आर्जवे करुन भोजनासाठी प्रयत्न करी तरी पण बहुधा ते नकारच देत रहात. इथे मात्र जसे असेल तसेच खाऊ घालण्याची गडबड करुन म्हणू लागले, "आई, मला फार भूक लागली, जे असेल ते वाढ." तिने प्रेमाने घास भरवून श्रीमहाराजांना तृप्त केले. त्यांनतर रोजच श्रीमहाराजांची फेरी त्यांचे घरी होऊ लागली. इतरत्र फिरणे कमी करुन त्यांचे घरीच जात राहत. सायंकाळी परत तारासदनी येत. मोठ्या आनंदाने भक्तगण जमून गजरामधेय आरती भजनाचा थाट घडत असे. दर्शनसमयी ज्याच्या त्याच्या भाग्यानुसार श्रीमहाराज अगदी सहजपणेच ज्याचे त्यालच समजेल असे बोलून सर्वांचे समाधान करीत असत.

# चि. बाळकू सोबत 'ज्योतिबा' भेट

एकदा श्रीमहाराज म्हणाले, "बाळकू, मला एक सुंदर घोडा बसावयास पाहिजे. आपण ज्योतिबाला जाऊया." हे बोलणे ऐकून बाळकृष्णाला फार आनंद झाला. तो प्रेमाने म्हणाला, "महाराज माझ्याच खांद्यावर बसा ना मी तुम्हाल हळूवार ज्योतिबाल घेऊन जाईन." श्रीमहाराजांनी होकार दिला. ताराबाई म्हणाल्या, "स्वामी सोबत इतरही भक्तांना न्या आणि लवकर परत या. मी वाट पहात आहे." श्रीमहाराज आनंदाने बाळकृष्णाच्या खांद्यावर बसले. त्यानेही

स्वतःस धन्य मानून इतर भक्तगणांसह ज्योतिबाकडे जाण्यास सुरवात केली. श्री. रामजी फारीक यांस वाटले इतक्या लांब जायचे तर घरुन थोडेसे लाडू वगैरे घेऊन जाऊया. पण श्री महाराजांनी त्यास नकार देत म्हटले, "वाटेत आम्हीच लाडू देतो, तुम्ही चला," सर्वजन खुशीने श्रीमहाराजांच्या पावन सान्निध्यात चालू लागले. बाळकृष्ण मोठ्या ऐटीने प्रेमभराने श्रीमहाराजांना घेऊन चालला. तेव्हा त्याचे कौतुक करीत, मध्येच उन्हाचा त्रास सोसत, श्री. वासुदेव दळवींना बोध करीत सर्व भक्तांसह श्रीमहाराज पुढे पुढे चालले होते. 'वडणगे' गावाजवळ येताच सर्वांची तहानलेली अवस्था पाहून श्रीमहाराज म्हणाले, "मला तहान लागली, बाबांनो," तेव्हा थोडावेळ सावलीमध्ये सर्वजण थांबले. जवळच्या विहीरीचा शोध घेऊन पाणी आणण्यासाठी श्री. रामजी फारीक गेले. जवळच विहीर पाहून पाणी घेऊन येऊ लागले. तेव्हा त्या विहीरीवर एक ब्राम्हण स्नान संध्या करुन नुकताच भोजनाला बसण्याच्या तयारीत होता. त्याने श्री. रामजींची चौकशी केली व आप्लाय शिदोरीमधील बरेचशे लाडू श्रीमहाराजांना व भक्तांना खाण्यासाठी घेऊन जा म्हणून आग्रह करु लागला. श्री. रामजींना ते बरे वाटेना पण त्याने स्पष्ट शब्दांमध्ये आपण सोबत जास्त लाडू आणल्याचे सांगून ते नेण्यासाठी फारच आग्रह धरला. तेव्हा ते घेऊन श्री. रामजी परत महाराजांकडे येताच, त्यांचे मुखावरील हास्य पाहून श्री. रामजींना ही सर्व त्यांचीच लीला असल्याचे पटकन ध्यानी आले. सर्वांनी लाडू खाऊन पाणी पिले आणि परत पुढील श्रीमहाराजांना खांद्यावर घेऊन सहजपणे पाऊले टाकीत होता. असेच बरेच अंतर चालून गेल्यावर पुढे परत सर्वांना भूकेने थकवा येऊ लागला. तेव्हा एके ठिकाणी श्रीमहाराजांनी खूण करुन सर्वांना येथेच्छ पोटभर पेरु खाऊ घातले. पुढे हसत-खेळत सर्वजण श्री ज्योतिबा डोंगरावर येऊन पोहोचले. श्री महाराजांनी प्रेमपूर्ण दृष्टीने श्री ज्योतिबादेवांकडे पाहिले. सर्वांनी श्रद्धेने नमस्कार केला. दिवसभर चालून सायंकाळी येथे सर्व पोहोचले होते. पण दर्शन घेताच श्रीमहाराजांच्या सर्वांना लगबगीने परत कोल्हापूरात चलण्याची घाई केली. श्रीमहाराजांच्या आदेशानुसार रातोरात परत सर्वजण माघारी फिरले. रात्री ब-याच उशीरा कुंभारगल्लीत आले. इकडे ताराबाई उपाशी पोटीच श्रीमहाराजांची वाट पाहत बसून होती. तिलाही फार आनंद झाली मग सर्वांनी भोजने केली. "बाळकृष्णाला आता लवकर मोबदला देऊ," असे श्रीमहाराज बोलले, त्यांची श्रद्धा, भक्ती, सेवा पाहून ते संतुष्ट झाले.

# चि. बाळकूच्या भक्तीचा मोबदला

असे पुढे अनंत चतुर्दशीच्या दिवशी अगदी लवकर सकाळीच श्रीमहाराज बाळकृष्णा घरी गेले. त्याच्या मातेस अतिशय आनंद झाला. साक्षात् 'अनंत' भगवानच यारुपाने आलेत म्हणून श्रद्धेने त्यांनी पूजन केले. जेवायला थांबण्याचा आग्रह

केला. पण मी परत येतो असे सांगून श्रीमहाराज बाहेर पडले. तारासदनी अनंत चतुर्दशी निमित्त्य मोठ्या थाटाने पूजा झाली. सर्व भक्तांसह श्रीमहाराजांना वाढण्यासाठी ताराबाईंने विविध पक्वान्ने केली होती. श्रीमहाराजांना पुनःपुन्हा आग्रह करुनही ते काही खाईनात, तेव्हा त्यांचे आज्ञेनुसारच इतर सर्वांना प्रसाद दिला गेला. त्यानंतर परत थोड्या उशीराने श्रीमहाराजांनी बाळकृष्णाचे घर गाठले. त्याच्या मातेकडे पहात म्हणू लागले, “आई, मला फार भूक लागली. लवकर जेवायला घाल.” ते ऐकून ती फार खूष झाली. इतका वेळापर्यंत ती ही न खाता-पिता केवळ महाराजांचीच वाट पहात बसली होती. प्रेमाने तिने भरवलेले घास घेत श्रीमहाराजांनी समाधान व्यक्त केले. पूर्वीच्या श्रीमहाराजांच्या शब्दाप्रमाणे बाळकृष्णाने एक सुंदर घोड्याचे तट्टू आणून त्यावर गादी-गालीचा घालून श्रीमहाराजांना त्यावरुन फिरवले. त्यानंतरही पुढे नेहमीच त्या घोड्यावरुन फिरणे श्रीमहाराजांना आवडत असे. श्रीगुरु सेवेत असा काही काळ गेल्यानंतर बाळकृष्णाला ज्वर येऊ लागला. त्यामुळे अशक्तपणा येऊन हिंडण्या-फिरण्याची शक्ती कमी होऊ लागली. श्रीमहाराजांची सेवा पूर्वीप्रमाणे हातून घडेनाशी झाली हे पाहून तो मनात म्हणे, “श्रीमहाराज आता मला तुमच्या सेवेशिवाय उगाच जिवंत का ठेवता?” त्याची अंतरीक तळमळ जाणून श्रीमहाराज श्री.कृष्णा लाडच्या खांद्यावर बसून त्याच्या घरी पोहोचले. त्याला मनसोक्त दर्शन दिले. त्यानंतर तेथून परत फिरले आणि बाळकृष्ण श्रीगुरु श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराजांचे चिंतना मध्येच आपली देहाची खोळ टाकून आजारातून मुक्त झाला. त्याचा अल्पायुषी पण सुंदर गुरुसेवाभावी विनम्र वागण्याने त्याच्या स्मृती केवळ मात-पित्यांनाच नव्हे तर सर्वच परिचित भक्तांना पण वेड लावून गेल्या.

# ऐतवड्याच्या देवगोंडाची कुष्ठरोगातून मुक्ती

कोल्हापूर जवळील 'ऐतवडे' गांवी देवगोंडा नांवाचा एक सधन शेतकरी राहत होता. पूर्व पुण्याईने शेतीवाडी पिकून मुबलक पैसा हाती होता. कार्यात यश मिळून सुखी होता. सुंदर पत्नी-मुले-बाळे होती. सोबत धाकटा बंधू पण रहात असे. सुखाने असे काही दिवस गेले. असताना पूर्वप्राक्तानानुसार श्री. देवगोंडा कुष्ठरोगाने पिडीत झाला. बरेच औषधोपचार केले पण गुण काही येईना. दिवसेंदिवस रोग वाढत चालला. त्याच्या पत्नीने व बंधूने त्याला घरात ठेवण्याऐवजी शेताजवळ एखादी छोटीसी झोपडी बांधून त्यामध्ये ठेवण्याचा विचार केला. आपले आजपर्यंतचे इतके धन, घर, जमीनजुमला, वाडा, संपत्ती, तस सोडाच पण जवळचे पत्नी, बंधुही आपणांस दूर लोटत आहेत. या दुःखाने तो व्याकुळ झाला. शेता जवळच्या झोपडीत योग्य होईल या विचाराने त्याने वाडीक्षेत्री सोडण्यास सांगितले. घरच्यांनी त्यांस तेथे नेऊन सोडले. आपले शारीरिक दुःख भोगत श्रीदत्तगुरुंचे मनोमन स्मरण करीत दोन-तीन वर्षे त्यांनी वाडीमध्ये घालवली. एके दिवशी अचानक त्याचा पाहुणा श्री. अण्णाप्पा कोल्हापूरहून वाडीक्षेत्री काही कामानिमित्त आला असताना भेटाल. त्याची ही स्थिती पाहून श्री अण्णाप्पास फार वाईट वाटले तो म्हणाला, "अरे कोल्हापुरात कुंभारगल्लीत एक थोर सत्पुरुष रहात आहेत. तू माझ्यासमवेत चल, त्यांचे दर्शन घे, मी तुझी सेवी करीन. तू बिलकूल चिंता करु नकोस" त्याचे प्रेमाचे बोलणे ऐकून श्री देवगोंडा त्याच्यासोबतच कोल्हापूरी आला. कुंभारगल्लीमध्ये त्या थोर सत्पुरुषाच्या दर्शनासाठी गेला. त्याची कुष्ठरोगी काया पाहून सर्वजण त्यास महारोगी म्हणून बाजूस हाकलू लागले, पण श्री महाराजांनी स्वतः त्याचेजवळ जाऊन त्याच्या पाठीवर हात फिरवून म्हणाले, "तू येथेच रहा." श्रीमहाराजांचे शब्द ऐकून तो श्री. अण्णाप्पाकडेच राहून दर्शनास येत असे. श्रीमहाराजांच्या सहवासात तीन-चार महिन्यामध्येच त्याच्या रोगाचे निर्मुलन होऊन शरीर पूर्ववत होत गेले. तो अगदी ठणठणीत बरा झाला. ही बातमी घरच्यांना कळली. पत्नी-बंधू श्री. अण्णाप्पांकडे येऊन परत ऐतवड्यास चला म्हणू लागले. तेव्हा श्री. अण्णाप्पा त्यांना फार बोलला, मग सर्वजण मिळून श्रीमहाराजांचे कडे आले. श्रीमहाराजांनी त्याच्या बंधूकडे पाहून म्हटले, "या झाडाला फळे लागतील पण वेळ लागेल" अखेरीस श्रीमहाराजांच्या आज्ञेनुसार श्री. देवगोंडा परत गावा जाऊन श्रीमहाराजांचे स्मरण चिंतनामध्ये संसार पूर्ण करु लागला. श्रीमहाराजांच्या शब्दा प्रमाणेच त्यांच्या बंधूला पण लग्नानंतर ऊशीरा मुले-बाळे झाली. सर्वचजण श्रीमहाराजांचे भक्तीत जीवन जगू लागले.

# राजगुरु श्री सिद्धेश्वर समाधी स्थानी भेट व तामिळी ब्राह्मणावर कृपा

श्रीकृष्ण सरस्वती स्वामी दत्त महाराजांचे वास्तव्य तारासदनी कुंभारगल्लीत घडल्यापासून ते घर मंदिरच बनले होते. श्रीमहाराजांच्या तेथील लीलांनी अनेकाचे चित्त संसार व्याधीतून मुक्त होऊन विवेकी बनून वैराग्यशाली होऊ लागले होते. श्रीमहाराजत पण या घरात 'वैराग्यमठी' म्हणूनच संबोधून इतरांस पण त्याच नांवाने हे ठिकाण संबोधावे म्हणून सांगत असत. आता कुंभारगल्लीमधील तारासदन श्रीकृष्ण सरस्वती स्वामींची "वैराग्यमठी" म्हणूनच सर्वजण कोल्हापूरात ओळखू लागले. श्रीमहाराज नेहमीच पंचगंगातीरी फिरण्यासाठी जात असत. पंचगेगेवरील श्रीसिद्धेश्वर महाराज समाधीस्थानी ते नेहमीच येत असत. कोल्हापूर संस्थानचे राजे छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांनी या थोर सत्पुरुष श्रीसिद्धेश्वरबुवा पंडित यांना गुरुस्थानी मानून आपल्या सिंहासनी बसवून "गुरुमहाराज" ही पदवी संपर्पून पूजा केली होती. त्यामुळेच करवीरचे राजगुरु म्हणूनच "श्रीगुरुमहाराज उर्फ सिद्धेश्वर महाराज" याची सर्वत्र प्रसिद्धी होती. पंचगंगेकाठी त्याची परमपावन समाधी आहे. श्रीमहाराज नदीकाठच्या घाटावरील मंदिरामध्ये फिरत येथेही नेहमीच येत असतं. या दोघा सत्पुरुषांचे अंतर्गत गूढ संभाषण सामान्यास कसे समजाणार? श्री.कृष्णा लाड, वासुदेव दळवी, रामजीभाऊ, रामदासबुबा वगैरे भक्त मंडळीसमेवत श्रीमहाराज तेथील परिसरात फिरत होते. त्यावेळी एक तामिळी ब्राह्मण आपल्या पत्नीसह काशीस जाताना करवीरी मुक्कामी आला होता. त्याने पंचगंगेवर स्नान करुन धर्मशाळेकडे परत जाताना श्रीमहाराजांना पाहिले. त्यांचे अदभूत तेज पाहून तो आकर्षित झाला. स्नान करुन तो मुखाने नित्याप्रमाणे वेदपाठ करीत चालला असताना श्रीमहाराजांच्यरुपाने भूलून त्याचा वेदपाठ थांबला व शेजारच्या भक्तांना हाताने खुणा करुन " हे कोण आहेत?" म्हणून विचारू लागला. त्या तमिळी ब्राह्मणास "हे श्रीकृष्णसरस्वती नामे विदेही सत्पुरुष असल्याचे" सोबतचे भक्त सांगू लागले. त्यांचे नाव ऐकून व हावभावावरुन हे कोणी थोर महात्मे आहेत तर त्यांचे पायावर मस्तक ठेवून दर्शन घेऊया आणि परत स्नान करु या. या विचाराने त्या ब्राह्मणाने श्रीस्वामींच्या पायी डोके ठेवताच ते म्हणाले, "इंद्रो बुंद-इंद्रो बुंदं" त्यांच्या वाणीमधून आपला अर्धवट राहिलेला वेदपाठ ऐकून तो ब्राह्मण चकितच झाला. 'हे स्वामी साक्षात् परब्रह्म स्वरुपच आहेत' याची खात्री पटून सोवळे-ओवळे मानणार्या त्या कर्मठ ब्राह्मणांस श्रीमहाराज कृपेने यथार्थ बोध घडला. तो तामिळीमध्ये श्रीस्वामींची मनोभावे स्तुती करुन आशिर्वाद मागू लागला. श्रीस्वामींनी त्यास आशिर्वाद देऊन "पो पो" म्हणत तामीळीभाषेतच जाण्यास आज्ञा केली.

# सदभक्त वेणीमाधव यांना श्रीज्योतिबांची आज्ञा

पंचगंगेतीरी तामिळी ब्राह्मण सोबत चाललेली लीला सोबतच्या भक्तगंणा समवेतच अजून एक नवीनच सज्जन पहात उभा होता. त्याचे नांव होते 'वेणीमाधव' हा श्रीक्षेत्र वाडी रत्नागिरीहून श्री ज्योतिबाच्या आज्ञेवरुन करवीरी नुकताच येऊ लागला होता. मूळ 'वेणीमाधव' ही श्रीक्षेत्र वाडी रत्नागिरीहून श्री ज्योतिबाच्या आज्ञेवरुन करवीरी नुकताच येऊ लागला होता. मूळ 'वेणी' गांवा रहात असलेल्या ब्राह्मणाची संतती वाचत नसे. तेव्हा त्याने कुलस्वामी केदारलिंग तथा ज्योतिबास नवस केला. त्यानंतर त्यांस सुपूत्र झाला पण मोहाने तो देवापायी अर्पण न करता तसाच जवळ ठेवला. तेव्हा पित्याला ज्वराने बेजार होताच पूर्व नवसाची आठवण होऊन त्याने त्या सुपुत्रास ज्योतिबा चरणी आणून ठेवले तोच हा 'वेणीमाधव' ब्राह्मण प्रथम माधुकरी मानून नंतर पंचांग पाहून आपला उदरनिर्वाह चालवित श्री ज्योतिबांच्या भक्तीत काळ क्रमीत होता. बरेच दिवस असे चालू असताना त्यांस श्री. ज्योतिबाराचांचा दृष्टांत झाला. 'करवीर जा. तुला सदगुरु भेटेल' त्यानुसार नुकताच तो करवीरी पंचगंगेतीरी तेऊन उभा होता आणि श्रीमहाराजांची तामिळी ब्राह्मणाची ही लीला पाहून तो ही वंदन करु लागला. त्याने नमस्कार करताच श्रीमहाराज म्हणाले, "भटजीबुवा सदगुरु कोठे पहाता?" त्यांची वाणी ऐकूण वेणीमाधवाने हेच आपले 'सदगुरु' जाणून त्यांचे पाय घट्ट धरले. पुढे काही काळ श्री अंबाबाई मंदिरामध्ये राहून तो नित्य श्रीमहाराजांचे दर्शन-सहवासाच्या लाभ घेऊ लागले. श्रीमहाराज त्यांस 'विणकर भटजी' किंवा 'आवडती वेणी' म्हणून संबोधित असत. एके दिवशी दर्शनानंतर श्रीमहाराजांनी त्यांस, 'ज्योतिबा तुम्हाल बोलवित आहे.' असे सांगून तिकडे पाठविले. काही दिवस श्री ज्योतिबाक्षेत्री राहिल्यावर परत श्री ज्योतिबांचा त्यांना श्रीमहाराजांकडे जाण्यासाठी आदेश झाला. तेव्हा 'देव सांगतो गुरुकडे जा व गुरु सांगतो देवाकडे जा' अशा विचाराने भ्रांत बनून वेणीमाधव हट्टाने म्हसारईच्या पठारावंर एकांती निघून गेला. तेथे निर्जनस्थानी 'श्रीदेवीचे' स्थानी तो बसून राहिला. सोबत काहीच आणले नव्हते. त्याप्रसंगी त्या देवीच्या मंदिरी जेवणासाठी आवश्यक ते सर्व शिधा साहित्य त्यांना ठेवलेले मिळाले. आनंदाने त्यांनी स्वयंपाक करुन खालाल आणि निवांत झोपले अशा प्रकारे ७-८ दिवस कोणाच जनसंपर्क नसताना त्यांना शिधासाहित्य मिळत राहीले. शेवटी एकदा त्यांचे मनी आले येथे मला शिधासाहित्य मिळत राहीले. शेवटी एकदा त्यांचे मनी आले येथे मला शिधासाहित्य मिळते त्याऐवजी तयार जेवण मिळाले तर बरे झाले असते. त्यादिवशी खरोखरच तूप पोळीचे तयार जेवणाचे ताट त्यांना देवीचे मंदिरी प्राप्त झाले. तेव्हा त्यांचे चित्त पालटले व हा सर्व श्रीसदगुरू माऊलींचाच खेळ आहे हे उमजून त्यांनी त्वरेने कोल्हापूरची वाट धरली. परमपूज्य श्रीसदगुरु स्वामींच्या पायी सदगदीत कंठाने नमस्कार करुन, क्षमा प्रार्थना केली. श्रीस्वामींनी पण सूचक बोल ऐकवून त्याचे समाधान केले. पुढे एकांत स्थानी नेऊन त्याचे कानी 'गुरुमंत्र' सांगून त्यांस कृतार्थ केले. मस्तकी हात ठेवून पुढील साधनामार्ग सांगितला.

# ‘समर्थ रामदास स्वामी व आम्ही एकच’ हे पटवून दिले

श्रीक्षेत्र ‘सज्जनगड’ हे श्रीसमर्थ रामदास स्वामींचे परम पवित्र समाधीस्थळ. अनेक विरक्त साधक श्रीरामभक्ती मध्ये तल्लीन होऊन तेथे श्रीसमर्थांची उपासना करीत असतात. त्यापैकीच एक रामदासी भक्त काही कामानिमित्त्य कोल्हापूरी आला. त्याची येथील पाहुण्याशी गांठ पडताच त्याने कुंभार गल्लीमध्ये असणा-या श्रीकृष्ण सरस्वती स्वामीविषयी त्यांना माहिती सांगितली. आग्रह करुन तो त्या रामदासी भक्तांस बळेच तिकडे नेऊ लागला. खरे पहाता, त्या रामदासी भक्ताची निष्ठा फक्त श्रीसमर्थ रामदासस्वामीच्या ठिकाणीच दृढ होती. इतरत्र जाणे त्यांना तितके आवडत नसे. पण येथील पाहुण्याच्या आग्रहाने सोबत एक नारळ घेऊन हे रामदासी कुंभारगल्लीमध्ये आले. वैराग्यमठीत श्रीस्वामी आपल्या आसनावर विराजमान झाले होते. सोबतच्या पाहुण्या सोबतच या रामदासी बुवांनी पण श्रीस्वामींच्या पायी नारळ ठेवीत नमस्कार केला. तेव्हा त्यांचेकडे पहात श्रीस्वामी म्हणाले, “अहो आम्ही तर तुमच्या सारखेच साधे. आम्ही काय रामदास स्वामी नाही. हे नारळ आम्हांस कशाला देता?” श्री स्वामींचे हे अंतर्ज्ञानी बोल ऐकून रामदासी बुवा मनोमन खाजिल झाले. त्यांना परमपूज्य श्री स्वामींचा अधिकार समजून आला. त्यावेळी ते मनःपूर्वक शरणागत होऊन श्रीस्वामींचे पाय श्रद्धेने धरु लागले. श्रीस्वामींनी पण त्यास अभय देऊन परमार्थिक बोध केला. श्रीस्वामी म्हणाले, “अहो, रामदास स्वामी म्हणजे साक्षात् हनुमंताचाच अवतार आम्ही व स्वामी तरी वेगळे आहोत का? हे आमचे पुच्छ जरा हात लावून पहा तरी.” असे बोलत बोलत श्रीस्वामींनी हनुमंतराय सारखीच आपल्याला असलेली शेपटी श्रीरामदासी बुवांच्या हातास स्पर्श करुन दाखविली. आजवरच्या साधनेचे फळ मिळाले असेच समजून श्रीरामदासीबुवा हनुमंतावतार श्रीसमर्थ रामदासस्वामी व श्रीकृष्ण सरस्वती स्वामी अंतर्यामी एकच आहेत याची खात्री पटून निःशंक मनाने परत परत श्रीस्वामी चरणी दंडवत करु लागले. पुढे आपल्या पाहुण्याविषयी कृतज्ञता करुन आनंदाने ते सज्जनगडी परतले.

# रमाबाईची पिशाच्चबाधा दूर

कोल्हापूरातीलच रहिवासी रमाबाई अगदी तरुणपणीच विधवा झाल्या. घरची संपत्ती भरपूर होती, पण बरेच दिवसापासून पिशाच्चबाधेमुळे त्रासुन जाऊन अगती शुष्क झाल्या होत्या. बरेच उपाय करुन पाहिले पण बाधा दून होईना. दैवी कृपेने अखेरीस कुंभारगल्लीतील श्रीस्वामींचे महात्म्य समजून त्या वैराग्यमठीत आल्या. श्रीस्वामी चरणी लागताच ते म्हणू लागले, “बाई पाचशे रुपये खर्च आहे. अतीथी-अभ्यागत-हीन-दीन-लुळे-पांगळे-स्त्री-शुद्र-ब्राह्मण-गरीबांना येथेच्छ अन्नदान करा.” तेव्हा सोबत उभ्या असलेल्या ताराबाईजवळ पंचवीस रुपये देऊन लवकरात लवकर बाधामुक्तीची प्रार्थना त्या करुन लागल्या. ताराबाई मध्यस्थी करुन विनवणी करताच, “तू जमीन भरणार का?” असा सवाल श्रीस्वामींनी केला. तेव्हा ताराबाईने होकार देताच श्रीस्वामींनी नजर टाकताच त्या स्त्रीच्या अंगातील पिशाच्चाचा संचार होऊन श्रीस्वामी दर्शनाने मुक्ती मिळाल्याचे सांगत त्याने स्त्रीचे शरीर सोडले. रमाबाई बाधेतून मुक्त झाल्या. पण पैशाचा खर्च करणे जीववर येई म्हणून परत मठात येण्याचेच तिने सोडून दिले. श्रीस्वामींनी त्याबाबत इकडे ताराबाईच्या मागे पिच्छा पुरवला. मग तिने काही रुपये पुढे ठेवून वनभोजनाचा बेत ठरविला.

# लक्षतीर्थावर वनभोजन व लाडांना बुडताना वाचविले

वनभोजनासाठी लक्षतीर्थावर जाण्याचे ठरले तेव्हा पुढे जाऊन जागा साफसूफ करण्यासाठी श्री. लाड श्रीस्वामींना सांगून निघाले. तेव्हा श्रीस्वामी हळूच बोलले, “थोडा अवधी आहे बरं, जपून” श्री लाड लक्षतीर्थावर येऊन पोहचले, योग्य जागा पाहून साफसूफ करण्यात गुंतले. मग तेथील तीर्थामध्ये स्नान करावे म्हणून सहजच पाण्यात उतरले. पण स्नान करताना तेथील शेवाळामध्ये पाय घसरुन अडकले व गोते खात खात पाण्याच्या तळाशी जाऊ लागले. तेव्ही श्री. लाडांना श्रीस्वामींचे निघतानाचे शब्द आठवले. ‘आता काय ते सर्वस्वी श्रीस्वामीच पहातील’ म्हणून ते त्यांचेच तळमळीने स्मरण करुन लागले. अचानक पणे हुबेहुब श्रीस्वामीप्रमाणेच आकृती प्रगटून त्या पाण्यातून लोटून श्री. लाडांना काठांवर ढकलले गेल्याचे जाणवले. थोडा वेळातच ते पूर्ण सावध होऊन झाल्या घटनेचा विचार करु लागले. तोपर्यंत इतर भक्तमंडळी सोबत श्रीस्वामींची स्वारी लक्षतीर्थावर येऊन पोहोचली. श्री. लाडांनी सर्वांना झाली घटना सांगितली. पण एका श्री. वासुदेव दळवी वांचून इतरांनी त्याची चेष्टा केली. त्यांना ते खरेच वाटेना श्रीस्वामींना सर्व भक्तांनी तेथील तीर्थामध्ये स्नान घालण्याचे ठरविले. ताराबाईचा जीव कासावीस झाला. जवळच पाण्यात डुबकी मारुन आणा म्हणून तिने सांगितले. श्रीस्वामी भक्तांसह पाण्यात उतरले आणि भक्तांच्या हातातून निसटून खोल पाण्यात बुडी मारली. सर्वत्र शेवाळे पसरले असल्याने कोठेच थांग लागेना. मग मात्र शोधूनही त्यांचा पत्ता लागेना तेव्हा सर्वजण घाबरले. ताराबाईने तर आकांतच मांडला. कोठून येथे वनभोजनाला येण्याची दुर्बुध्दी सुचली असे तिला वाटू लागले. श्री. लाड आपला नुकताच घडलेला अनुभव सांगून म्हणू लागले, “मी सांगितले तेव्हा तुम्हास खरे वाटेना” त्यांचे बोलणे ऐकून खरोखरीच आपण त्यांस खोटे ठरवून हसलो याचा इतरांना पश्चाताप झाला. ताराबाईने त्याविषयी श्रीस्वामींची माफी मागत प्रगट होण्याची प्रार्थना केली. तेव्हा पैलतीरावरुन पोहत श्रीस्वामी त्यांचे पुढे येऊन उभे ठाकले. सर्वांनी त्यांस स्वच्छ पुसून, सुंदर वस्त्रे घातली, मस्तकी चंदनी टिळा-गळ्यात पुष्पहार, हातात सुवासिक गजरे घालून सोबत आणलेल्या गाद्या गिर्द्या अंथरुन सुशोभित आसनावर बसविले मोठ्या भक्तीयुक्त अंतःकरणाने जल्लोषात आरती-नामगजर केला. लवकर स्वामींना भोजन तयार करुन प्रेमाने भरविले व सर्वांनी प्रसाद ग्रहण केला. श्री स्वामी आनंदात वृक्षाखाली गादीवर मजेत पहुडले असताना दोन ब्राह्मण त्यांचा शोध करीत तेथे आले. श्रीस्वामींच्या दर्शनाचे समाधान दोघांच्याही नजरेत स्पष्ट दिसत होते. त्या दोघांनीही आपापली कहानी मगल तेथील भक्तांना सांगणे सुरु केले.

# वाडीक्षेत्रातून आलेल्या भक्ताचा पोटशूळ बरा

त्यापैकी एक ब्राह्मण सांगू लागला, "मी वतनदार कुलकर्णी. घरदार मुलेबाळे सर्व सुखात आहे. पण गेली सात वर्षे पोटदुखीमुळे हैराण झालो होतो. अनेक उपायानंतर शेवडी वाडीक्षेत्री येऊन उपोषण करुन श्रीगुरुचरित्र पारायण सुरु केले. त्यावेळी रात्री स्वप्नामध्ये शुभ्र अंगरखा, हाती भगवे वस्त्र, शिरी हिरवी टोपी घातलेली वामनमुर्ती येऊन सांगू लांगली की, 'उद्या प्रत्यक्ष भेट होईल व आठ दिवसांत सेवा करताच रोग बरा होईल.' सकाळी उठून स्नान-देवतार्चन करुन-पोटातील वेदना त्यावेळी असह्य होत असतानाच श्रीगुरुचरित्र वाचनासाठी बसलो. त्याच समयी स्वप्नातील ती वामनमूर्ती शेजारी त्याच रुपामध्ये येऊन बसल्याचे दिसले वाढण्यास सांगितले. मी ही मुक्कामी येऊन गडबडीने भात शिजवून त्यांना खाऊ घातला. त्यांनी दिलेला प्रसाद सेवन केला. अशा प्रकारे आठ दिवस दिवसरात्र त्यांच्या संगतीत गेले. काल सकाळी उठल्यापासून त्यांचा कोठे पत्ता लागेना. मन दुःखाने तळमळू लागले. कसा तरी दिवस पार पडला आणि रात्री स्वप्नांत पुन्हा दर्शन देत, मी, 'मी कोल्हापूरातील कुंभारगल्लीमधील वैराग्यमठात रहाणारा श्रीकृष्ण सरस्वती स्वामी होय.' असे सांगितले. त्यानुसार शोधत कुंभारगल्लीत आलो तर श्रीस्वामी भक्तांसह लक्षतीर्थावर गेल्याचे समजले. आता समोर प्रत्यक्षच दर्शन घडून आनंद झाला. पण तुम्ही इतके भक्तजन सोबत असताना श्रीस्वामींना वाडीत एकटेच कसे सोडलेत व काल ते एकटेच परतले. हे काही बरे नाही." त्या ब्राह्मणाचे हे सर्व बोलणे ऐकूण भक्तजन त्यांना सांगू लागले, "अहो, तुम्ही जरी आठ दिवस स्वामींना वाडीत पाहिले म्हणत असला तरीही आम्ही नित्यच त्यांच्या सेवेत आहोत. गेले आठवडाभर ते इथेच आहेत." ते ऐकून तो ब्राह्मणही ठामपणे सांगू लागला की, "अहो, पण मी तरी खोटे कशाला बोलू, श्रीस्वामी खरोखरच माझ्यासोबत वाडीलाच रहात होते." त्यांचे संभाषण ऐकुन स्वामी गादीवर उठून बसून,"मी वाडीचा दत्तच सध्या येथे राहतो. तुझा रोग आता पूर्णपणे बरा झाला. काळजी करु नकोस. श्रीगुरुदत्ताचे नाम जपत आनंदात रहा." असे म्हणाले. दोघा ब्राह्मणांना तेथील महाप्रसाद देवून सर्वजण सायंकाळी कुंभारगल्लीमध्ये वैराग्यमठीत पोहोचले. सायंकाळच्या दररोजच्या नियमाप्रमाणे श्रीस्वामींच्या आरतीसाठी भक्तजन जमल. सुंदर आरती संपन्न झाली. त्यावेळी एक स्त्री रडत रडत श्रीमहाराजांना सांगू लागली, "स्वामी- मी रमाबाई. काल रात्री घरात चोर शिरुन माझे हजार रुपये चोरून नेले. पूर्वी तुम्ही पाचशे रुपये खर्च करण्यास सांगितले तेव्हा मी टाळाटाळ केली. त्याची मला अद्दल घडली." श्रीस्वामी म्हणाले, "सहस्त्र गेले बरे झाले" तेवढ्यात ताराबाईही तिथे आली आणि रामाबईस पाहून रागे भरू लागली. तेव्हा श्रीस्वामींनी तिला शांत राहणेस सांगितले.

# श्री. स्वामी समर्थ आज्ञेने महादेव भट अक्कलकोटहून आले

लक्षतीर्थावर आलेल्या दोन ब्राह्मणापैकी दुसर्या ब्राह्मणाने आपली कहाणी सांगितली ती अशी की, “मी अक्कलकोटी रहाणारा महादेवभट. पूर्वी मी शिक्षक होतो. अक्कलकोटी प्रगटलेले श्रीस्वामी समर्थ मला भाग्याने भेटले. त्यांच्या सवेत-भजनात मी रंगून गेलो. त्यांनीच मला संसारातून मुक्त केले. माझी बायको व मुले वारली. मी माधुकरी भिक्षा मागून श्री स्वामी समर्थ सेवेत काळ घालवू लागलो. चौदा वर्षे त्यांचा सहवास घडला. पुढे नुकतीच स्वामींनी समाधी घेतली. त्यांच्या विरहामुळे कोठेच मन रमेना. तसेच तेथील मठामध्ये आध्यात्म रामायण वाचन करीत काळ कढू लागलो. परंतु मनाचे समाधान होईना. महिनाभर कसातरी पार पडला शेवटी श्रीस्वामीसमर्थांनी स्वप्न दृष्टांत देऊन सांगितले, ‘करवीरी श्रीकृष्ण सरस्वती स्वामी रुपे दत्तच नांदत आहे. त्यांचेकडे जा म्हणजे तुमचे समाधान होईल. आता हे स्था सोडा.’श्री स्वामी समर्थांच्या त्या आज्ञेनुसार मी सध्या येथो आलो आहे.” असे त्याने सांगितले. श्री.स्वामी पण त्याकडे प्रेमाने पाहून म्हणू लागले. “अरे, याच्यामुळे आम्हास आमच्या तात्यासाहेबांची आठवण होत आहे.” श्री स्वामीसमर्थांचा उल्लेख श्रीकृष्णसरस्वती स्वामी महाराज ‘तात्यासाहेब’ या नांवाने करीत असत. श्री महादेव भट श्रीस्वामीसमवेत राहून उर्वरीत वेळेत आध्यात्म रामायण वाचन करीत वैराग्यमठीत थांबले. श्रीस्वामी समर्थांच्या दीर्घ सहवासामुळे त्यांच्या दैवी लीला अनुभवत त्यांचेच चरणी श्रद्धा एकवटून फार दिवस केवळ त्यांच्याच सगुणरुपाची सेवा घडल्यामुळे कितीही प्रयत्न केला तरीही ते अक्कलकोटीचे स्वरुप डोळ्यासमोर न दिसल्याने त्यांचे मन मधूनमधून फारच बैचेन होऊन जाई. त्यांची ही तळमळ स्वामी जाणून होतेच. एके दिवशी असेच त्यांचे वाचन सुरु असतानाच श्रीस्वामींनी त्यांना आपल्या शेजघरात बोलावून घेतले. श्रीस्वामींच्या पायी वंदन करुन मुखाकडे महादेवभट जेव्हा पाहू लागले तेव्हा श्रीकृष्ण सरस्वती स्वामींच्या ऐवजी चक्क अक्कलकोटीचे प्राणप्रिय श्री स्वामी समर्थच मंचकावर बसलेले त्यांना दिसू आले. ते तेजस्वी रुपडे पाहून त्यांचे मन हरखून गेले. काही सुस्तीस्तोत्र - प्रार्थनाही धडपणे त्यांना म्हणता येईना. डोळ्यात ते रुप आता सहन होईना त्यावेळी गयावया करीत पुनरपि श्रीकृष्ण सरस्वती स्वामी रुपातच प्रगटावे अशी त्यांनी मनोमन इच्छा व्यक्त केली. त्यांची इच्छा जाणून

हसत स्वामी म्हणाले, “मी व ते एकच. पन पुनः पुन्हा असे दर्शन घडणार नाही. डोळेभर भरुन पाहा. आता भितोस कशाल?” थोड्या वेळात पुनरपि आपल्या श्रीकृष्ण सरस्वती स्वामी रुपात मंचकावर हसत हसत पहुडलेले मूळ स्वरुप पाहून श्री. महादेवभट स्तिमित झाले. आता मात्र दोघांच्या एकरुपतेची परिपूर्ण खात्री पटल्याने अगदी निःशंक मनाने शांत चित्ताने ते स्वामींच्या संगतीत रमून गेले.

# स्वामींची विदेही अवस्था व माणिकप्रभूंशी तादात्म्य

विदेही वृत्तीमध्ये बाल-उन्मत्त-पिशाच्चवत् संचार करणार्या श्रीकृष्ण सरस्वती स्वामींचे वर्तन केव्हा-कसे असेल, ते काय बोलतील वगैरे समजणे सामान्यांच्या बुध्दीपलीकडे असे. एकेकवेळा हनुमंतप्रभू प्रमाणेच भुभुःकार करी कुंभार गल्लीतील घरांच्या कौलारु छपरांवरुन मनसोक्त उड्या मारीत रहात तर कधी एखाद्या पुतळ्याप्रमाणे आपल्या आसनी अगती शांत निश्चल बसून रहात. खाण्यापिण्याचे तर बिलकुल वेडच नसे. बळेबळेच दोन-चोर घास मुखात अक्षरशः कोंबावे लागत. तेव्हा कुठे गिळले तर ठीक नाहीतर बरेच वेळो थुंकून टाकीत. लहान मुलांसारखे परत परत अंगरखा टोपी इतरांनाच घालून द्यावी लागे अन्यथा ते आपले दत्तदिगंबर अवस्थेतच खुशाल मुक्त फिरत राहत. स्नानाचीही तीच गत. अंघोळीला बसले तर पाण्यातून बाहेर निघायचे नांव नाही. तांब्यावर तांबे पाणी ओततच रहायचे. एकदा अशीच बराच वेळ अंघोळ करुन ताराबाईच्या प्रेमळ धाकाने नुकतेच ते बाहेर आले. भक्तांनी अंग कोरडे करुन वस्त्रे नेसविली. ताराबाईने बळेच दोन घास भरविले. भक्तांशी प्रेमळ संवाद साधत बसलेले असताना अकस्मात पुन्हा, “अंघोळ घाला, अंघोळ घाला” म्हणू लागले, भक्तांनी समजून सांगायचा प्रयत्न केला तर म्हणाले, “माणिक गेले, अंघोळ घाला.” त्यांच्या मर्जीप्रमाणेच पुन्हा अंघोळ घातली गेली. पुढे नंतर कळाले की हुमणाबादचे गादीवरील दत्तावतारी सत्पुरुष श्रीमाणिकप्रभू त्यासमयीच समाधिस्त झाले होते. दोन अवतारी पुरुषांच्या अंतर्गत तादात्म्याचा त्यामुळे सर्वांनाच परिचय घडून आला.

# सदभक्त नामदेवासोबत कानडीभाषेत बोलणे

पंढरपूरच्या श्रीविठोबाचा परमभक्त श्रीनामदेव जसा झाला अगदी तसाच कुंभारगल्लीच्या या श्रीकृष्णगुरुचा परमभक्त नामदेव होऊन गेला. कर्नाटक धारवाडचा मूळ रहिवासी नामदेव लहानपणीच मातृसुखाला पारखा झाला. पित्याने काही काळ सांभाळले. पुढे आत्याने कोल्हापुरी आणून पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम दिले. योग्य समयी लग्नही करुन दिले. नामदेव लहानपणा पासूनच दत्तभक्तीत रंगलेला होता. परम भाग्याने महान दत्तावतारी सत्पुरुष मुरगोडचे श्रीचिदंबर दिक्षीत यांचे अधिकारी सत्शिष्य पूज्यश्री राजाराम महाराज (मदियाळ) यांचे दर्शन व प्रासादिक 'दत्तमूर्ती' नामदेवाल मिळाली होती. हुबळीचे शिवावतारी सत्पुरुष श्रीसिद्धारुढ यांची भेट घडली होती. दूर कलादगी जंगलाच्या एकांती नागसापांच्या सान्निध्यात पहुडलेले उन्मनी अवलिया संत श्रीनागिलंगप्पास्वामींनी तर दर्शन देताना फार पूर्वीच सांगून ठेवले होते की, "तुला साक्षात् दत्तच भेटणार आहे, बर!"खरोखरीच संतदर्शन व आशिर्वाद योग्य वेळी फळतात. त्यानुसार आत्याबाईने एके दिवशी नामदेवाला कुंभारगल्लीतील दत्तावतारी श्रीकृष्णगुरुंच्या दर्शनासाठी जाण्यास सांगितले. नामदेव कुंभारगल्लीतील वैराग्यमठीत येऊन प्रथमच श्रीकृष्णगुरुंचे दर्शन घेऊ लागले. त्याप्रसंगी श्रीस्वामी प्रसन्नतेने "नामा बर्री, नाळी निम्मनिगे हेग बेकरी" याचा भावार्थ असा की, 'तू उद्या माझ्या घरी जा,' तेव्हा नामदेव म्हणाले, "महाराज, तुम्ही काय म्हणता ते मी समजलो नाही." तेव्हा श्रीमहाराजांनी, "मी साक्षात् दत्तच. माझे घर नृसिंहवाडी." असे त्यांना सुचविले.

# स्वामींचे वाडीक्षेत्री व करवीरी एकाच वेळी समान वास्तव्य

श्रीकृष्ण गुरुंच्या आज्ञेनुसार पत्नीसह नामदेव त्वरीत वाडीक्षेत्री गेले. तेथे एक पुजा-याकडे मुक्काम करुन यथासांग श्रीदत्तपूजन केले. तेथील तिन्ही त्रिकाळच्या भजन-पूजनामध्ये ते शांत चित्ताने रंगून गेले. त्यावेळी त्यांना त्यांचा एक मित्र भेटून त्याने त्यांची चौकशी केली. तेव्हा कुंभारगल्लीच्या श्रीकृष्णगुरुंच्या आज्ञेनुसार इथे आल्याचे त्याने सांगितले. तेव्हा तो मित्र सांगू लागला. "अरे ते श्रीकृष्णसरस्वती स्वामी महाराज तर गेले महिनाभर त्यांचे दोन संन्यासीशिष्य श्री. लाड व श्री. दळवी तसेच श्री. रामदासबुवा ब्रम्हाचारी, महादेवभट्ट, म्हादबा पटकर वगैरे सदभक्तांसह वाडीक्षेत्रीच श्रींच्यामंदिरामागील ओवरीमध्ये मुक्कामास होते." नामदेवाला ते मुळीच खरे वाटेना तो म्हणाला, "अहो, महाराज तर बरेच दिवस कोल्हापूरातच आहेत." तेव्हा ते मित्र सांगू लागला, "तुला मी श्रीविठ्ठलभट कोडणेकरांची भेट घालून देतो. मग तूच ठरव मी खोटे सांगतो का खरे आहे." समोरच लगेच त्यांनी विठ्ठलभट कोडणेकर या वाडीक्षेत्रीच्या सदगृहस्थाची भेट घालून दिली. त्यांनी सांगितले, "अहो, धन्य आहे त्या श्रीकृष्णसरस्वती स्वामींची, केवळ जणू माझ्यासाठीच वाडीक्षेत्री त्यांचा मुक्काम झाला असावा असे वाटते. आधीच माझा लहान मुलाग वारला होता. त्यातच पत्नीला समंधबाधेने त्रस्त करुन सोडले होते. केवळ श्रीकृष्णगुरुंच्या कृपेमुळेच आम्ही दुःखमुक्त झालो. पत्नीची समंधबाधा त्यांनीच क्षणात नाहीशी करुन तिला जीवदान दिले. गेले महिनाभर अनेक सदभक्तांचा उद्धार त्यांच्या येथील वाडीमुक्कामामुळेच झाला." हे सर्व ऐकून नामदेव चकीतच झाले.

एकदा वाडीक्षेत्री श्रीदत्तप्रभूंसाठी नामदेवांनी फुटाणे डाळ. खडीसाखर, लवंग यांचे चूर्ण नैवेद्यासाठी तयार केले. श्रीदत्तप्रभूंच्या पादुकांची पूजा झाल्यावर त्यांचा नैवेद्य अर्पण करण्यास त्याने तेथील पुजा-यास सांगितले. पण कट्टर सोवळे-ओवळे मानणारे पुजारी असला फुटाण्याचा डाळीचा नैवेद्य येथे चालत नाही म्हणाले. त्यामुळे दुःखी मनाने नामदेव तेथे उभे असताना एक आठ वर्षांचा गोड बालक सोवळ्यामध्ये श्रींच्या मंदिरी जाताना त्यांकडे पाहू लागला. तेव्हा नामदेवांनी ती फुटाण्याच्या डाळीचे चुर्ण केलेली नैवेद्याची वाटी दिली. त्याने ती वाटी श्रींसमोर नेवून

ठेवली. आरतीची वेळ झाल्याने पुजारी पंचारती ओवाळू लागले तेव्हा अगदी सहजच आरतीचा धक्का लागून त्या वाटीतील फुटाण्याच्या डाळीचे चुर्ण अलगदपणे श्रींच्या पादुंकावर अर्पण झाले. पूर्वी पंढरीमध्ये नामदेवासाठी विठ्ठल दूध पिला होता तर येथे या नामदेवासाठी श्रीदत्त प्रभूंनी फुटाण्याची डाळ प्रेमपूर्वक स्विकारली होती. खोट्या, कोरड्या कर्मकांडापेक्षा खर्या भक्तीप्रेमाच्या ओलाव्यामुळेच प्रभूस्वामी प्रसन्न होतो. नामदेवांचे डोळेही श्रीकृष्णगुरुंच्या यालीलेमुळे भरुन आले. त्यांनी मनःपूर्वक स्तुती केली. आता येथील बरेच दिवसांच्या वास्तव्यानंतर कुंभारगल्लीच्या त्या सगुणरुपातील दत्तगुरुंच्या दर्शनासाठी त्यांचे मन अधीर झाले. येथील निरोप घेऊन ते थेट कोल्हापूर वैराग्यमठीत आले. पूजश्री श्रीकृष्णगुरुंच्या पायी मिठी घातली. श्रीस्वामींनी त्यांना संकेताचे संभाषण करुन सुखविले. नामदेवांनी मग महिनाभर वाडीक्षेत्री भक्तगणांसह श्रीस्वामींचा मुक्काम कसा झाला होता, त्यावेळचे चमत्कार सर्वांना सांगताच सर्वांचीच मती गुंग होऊन गेली. श्रीगुरुचरित्रामध्ये श्रीनृसिंह सरस्वती स्वामी दिपावळी प्रसंगी आठ वेगवेगळ्या भक्तांघरी प्रगटले असल्याची नोंद आहे. पण येथे तर श्रीकृष्ण सरस्वती स्वामी आपल्या सदभक्तांसह कोल्हापूर बरोबरच वाडीक्षेत्रीही चक्क महिनाभर मुक्काम करुन लीला करीत राहीले. हे खरोखरीच किती अगम्य आहे, बरे !

# स्वामी सेवेने दैन्य पळाले.

एकदा श्रीस्वामी बाहेर फिरावयास गेले असताना कोणी एक संकटग्रस्त व्यक्ती त्यांचे पाय धरुन, “महाराज, मला आपल्याजवळ आसरा द्या.” म्हणू लागली. हा माणूस संकटामुळे घरुन निघून वाडीक्षेत्री जाऊन कोल्हापूरी आला होता. येथे येताच श्रीअंबाबाईच्या मंदिरामध्ये गेल्यावर त्याला पूज्यश्री स्वामींची माहिती मिळाली. ती ऐकूनच तो आला होता. श्री.स्वामींनी त्यांस अभय देऊन दररोज पंचगंगेतून घागरभर पाणी आणण्याची सेवा देऊन मठात ठेवून घेतले. श्रीस्वामींच्या सेवेत असे पाच-सहा महिने गेल्यावर एके दिवशी अचानक त्याचा भाऊ शोध करीत करीत तेथे आला. आपल्या बंधूस पाहून त्याला फार आनंद झाला व तो त्यास गांवी परत चलण्याचा आग्रह करु लागला. तो सांगू लागला, “दाद, मी चुकलो. गांवातील सावकाराने खोटे कागद करुन तुला फसविले. तू कर्जबाजारी झालास समजून मी ही तुझी वाटणी नाकारुन तुला घराबाहेर काढले. पुढे तू निघून गेल्यावर त्या सावकाराची पत्नी वारली. त्यामुळे त्यांस तुला फसविल्याचा पश्चाताप झाला. तुला परत शोधून आणून तुझी संपत्ती परत केल्याशिवाय मला चैन पडणार नाही. असे सांगून त्यानेच मला इकडे पाठविले आहे. याआधीपण आम्ही तुझा खूप शोध केला. अखेरीस आज येथे तू भेटलास तेव्हा कृपा कुन आमचा राग न धरता परत घरी चल.” त्याचे बोलणे ऐकूनही त्या व्यक्तिला घरी परत जाण्याची इच्छाच होईना. इतके दिवस श्रीस्वामींच्या दैवी सहवासामुळे त्याचे चित्त संसारातून मुक्त झाले होते. पण आलेल्या भावाने श्रीस्वामीसमोर प्रार्थना करताच श्रीस्वामींनी त्यास परत गांवी जाऊन सुखने काम-धंदा

करीत उर्वरीत संसार श्रीप्रभू नामस्मरणा मध्ये घालवण्याची आज्ञा केली. त्यामुळे इच्छा नसूनही त्यास गावी परतणे भाग पडले.

# जेथे भक्त तेथे स्वामी

अक्कलकोटचे श्री महादेवभट्ट श्रीस्वामींसमोर मठीत नित्य नियमाप्रमाणे आधात्म रामायण वाचन करीत असत. काही दिवसांनी ताराबाईंच्या मुलाने त्याबाबत तक्रार केली. तेव्हा श्रीस्वामींनी त्यांस, “तू अंबाबाईच्या देवळामध्ये यापुढे वाचन करीत जा.” म्हणून आज्ञा केली. त्यानुसार नित्य माधुकरी आणून श्रीस्वामींना अर्पण करुन मंदिरामध्येच वाचन करीत श्री. महादेवभट राहू लागले. पण श्रीस्वामींसमोर वाचनाचे सुख इतरत्र वाचन करताना मिळणार नाही असे समजून त्याने श्रीस्वामींना तसे सांगितले होते. तेव्हा हसत श्रीस्वामी म्हाणाले होते. “महादेवा-तू जिथे बसून वाचन करशील तेथे येऊन मी ऐकत राहीन.” श्रीस्वामींचे हे वचन श्रीमहादेवभट्टांचे मनी दृढ होते. तरी पण एकदा वाचन करीत असताना त्यांच्या मनात याविषयी विचार घोळू लागला तेव्हा वाचन सुरु असतानाच त्यांचे डोळे सहजच मिटले गेले व डोळ्यांसमोर साक्षात् श्रीस्वामी उभे राहिले. क्षणात्च डोळे उघडले गेले तर समोरील पोथीवर हळद-कूंकू अर्पण झालेले दिसले. श्रीस्वामींच्या या तात्काल प्रचीतीमुळे श्री. महादेव भट्ट आनंदाने पुढील वाचनामध्ये गढून गेले. मंदिरामध्ये राहूनच वैराग्यवृत्तीने त्रिकाळ श्रीस्वामींच्या दर्शनास कुंभारगल्लीत जाऊन ते आनंदाने जीवन क्रमू लागले.

# सदभक्त श्री. कृष्ण स्वार गोसावी बनले

श्रीकृष्ण सरस्वती स्वामींच्या सहवासामध्ये वैराग्यमठीत श्रीरामदासबुवा ब्रह्मचारी व्रताने सेवा करीत राहीले. दररोज भिक्षा मागून आणून प्रथम श्रीस्वामींसमोर ठेवून ते जितकी परत प्रसाद म्हणून देतील तितकीच खाऊन ते राहत असत. ते आदर्श कडकडीत वैराग्याचा जणू पुतळाचा होते. संसार सोडून संन्यास घेऊन श्रीस्वामी पायी रंगलेले श्री. लाड व श्री. दळवी भक्तीत तल्लीन होते. वेणीमाधव-विणकर भटजी, म्हादबा पटकर, रामजी पुजारी, विष्णूपंत असे अनेकजण नित्य मठीत येऊन श्रीस्वामी सेवा करीत असत. ताराबाईने दररोज पहाटे श्रीस्वामी उठताच काकड आरती, त्यानंतर श्रीस्वामींना दोन-चार मास फराळ भरविणेचा नियम भक्तीभावपूर्वक चालविला होता. कोल्हापूरातील श्री. विष्णूपंत नांवाचा एक चांगला सधन, घरी पत्नी, मुलेबाळे असलेला सज्जन गृहस्थ संसारातील आसक्ती टाकून वारंवार श्रीगुरुभजनांच्या छंदात मठीत येत असे. श्रीकृष्ण स्वार नांवाच एक गृहस्थ आपल्या आईसह राहून सुंदर पत्नीसोबत संसार करीत होते. कोल्हापूरच्या राजदरबारी काही कामकाज करुन पोटापुरते मिळवून सुखाने कालक्रमणा करीत होते. पण संचितानुसार अपस्मार (फेफरे) रोगाने त्याला पिडीत केले. बरेच औषधोपचार केले पण कोठेच फायदा मिळेना अखेरीस कुंभार गल्लीची वाट धरुन श्रद्धा-भक्तीने श्रीस्वामींच्या चरणाजवळ आले. त्यांचे संचित जाणून श्रीस्वामी म्हणाले, “कृष्णा, तू भगवे स्विकारुन गोसावी हो,” काही काळ सेवा करुन पुढे श्रीस्वामींच्या

शब्दाप्रमाणेच श्रीकृष्णा स्वार यांनी संसार सोडून दिला व वैराग्यमठीत श्रीगुरु सेवाकरीत राहीले व खरोखरीच भगवे स्विकारुन ते गोसावी बनले.

# श्रीक्षेत्र गाणगापूरहून आलेले सदभक्त धारवाडकर बंधु

श्री. विष्णुपंत धारवाडकर व त्यांचा लहानभाऊ दत्ता हे दोघेही पूर्वभाग्याने विरक्त होऊन श्रीक्षेत्र गाणगापुरी जाऊन श्रीदत्तप्रभूंच्या सेवेत आपले जीवन कालक्रमण करीत होते. गेली तीन वर्षे ते दोघेजण येथे राहून श्रीदत्त उपासनेत मग्न झाले होते. एके दिवशी अचानक श्री. विष्णूपंतांच्या स्वप्नामध्ये श्रीदत्तगुरुंच्या दृष्टांत झाला. भगवी वस्त्रे ल्यालेल, हाती दंड कमंडलू, कपाळी सुंदर भस्म धारण केलेली यतीमूर्ती त्यांचे दृष्टांती येऊन सांगू लागली. "सध्या आम्ही करवीरनगरीमध्ये वास करीत आहोत. आम्हाला पर्णक्रीडा फार आवडते. तुम्हीही करवीरी या." श्रीदत्तगुरुंचा असा स्पष्ट संदेश ऐकून श्री. विष्णूपंतांनी आपल्या बंधुसह त्वरेने करवीरनगरी गाठली. द्विमुखी मारुती मंदिरी प्रथम थांबून ते बंधूसह आपल्या संदेशातील श्रीदत्तगुरुंचा शोध घेऊ लागले. आठ दिवस झाले तरीपण पत्ता लागेना. पण त्यादिवशी भाग्य उदयास आले आणि श्री. विष्णूपंत पंचगंगेतीरी स्नान करुन येऊ लागले होते. इकडे त्यादिवशी सकाळीच कुंभारगल्लीत श्रीस्वामी महाराज अगदी उठल्यापासून म्हणू लागले, "अरे, लौकर चला रे, ते विष्णू दत्ता आठदिवसांपासून वाट पहाताहेत." श्री. रामजीभाऊ श्रीस्वामींना गादीवरुन उठवून बसवू लागले, तर त्यांचे

लक्ष श्रीस्वामींच्या पायाकडे गेले. सर्व पाय व अंथरुन मातीने लाला लाल झाले होते. श्री. रामजींनी श्रीस्वामींना विचारले, “मीच तुम्हाल रात्री हात-पाय स्वच्छ धुवून झोपी घातले असताना आपल्या पायास ही लाल माती कशी लागली?” तेव्हा हसत श्रीस्वामी म्हणाले, “अरे, घरी जाऊन आलो.” त्याचा अर्थ श्रीस्वामींच्या नित्य लीलेने सर्वांना कळला की, श्रीस्वामी वाडीक्षेत्री संचार करुन आले आहेत. त्या वाडीक्षेत्राचीच ही लाल मातीची धूळ आहे. लगेचच श्रीस्वामींना स्नान घालून पूजा अर्चा फराळ करवून त्यांच्या गडबडीमुळे भक्तगण त्यांना घेऊन पंचगंगेतीरी फिरायला आले. तेथे काठावर एका झाडावर श्री. रामजीभाऊंना श्रीस्वामीनी चढावयास सांगून त्यांच्याबरोबर पर्णक्रीडा सुरु करुन, हे पान दे, ते पान दे.’ असे करीत पानांचा खेळ सुरु केला. त्याचवेळी स्नान करुन श्री. विष्णुपंतही बंधू दत्तासह तेथूनच चालले होते. श्रीस्वामींचा हा खेळ पाहून ते या विषयी विचारु लागताच श्रीस्वामी म्हणाले. “आम्हाला पर्णक्रीड फार आवडते.” श्रीस्वामींचे हे वाक्य ऐकून श्री. विष्णूपंत मोठया अधीरतेने त्यांच्या चरणी लोळू लागले. श्री. दत्ताला पण खूप पटून त्यानेही प्रेमाने दर्शन घेतले. तेव्हा श्री. रामजीभाऊंशी पानाचा खेळ करीत असलेले श्रीस्वामी म्हणाले, “रामजी, आता खाली उतर. माझी मला दोन जुनी पाने मिळाली. तुम्हाला नवीन वाटली तरी ती माझ्यासाठी जुनीच आहेत.” श्री विष्णू द्ताभाऊंचा जुना श्रीदत्तभक्तीचा संदर्भ श्रीस्वामींनी हे बोलणे केले. श्रीस्वामींच्या संगतीत. त्यांच्या सेवेतच राहण्याची त्यांची दृढ भावना पाहून ताराबाईचे सुपुत्र श्री दतोबांनी इतर अनेक सदभक्तांसह त्यानाही आपल्या वैराग्यमठीत रहाण्याची सोय करुन दिली. श्री. विष्णूपंत नित्य कोरडी भिक्षा करुन मठीत राहत. मठीची झाडलोट करुन नित्य साफसूफ ठेवण्याची त्यांना आवड होती. मुखाने नित्य नामस्मरण करुन श्रीगुरुसंगतीत रहावे म्हणून ते इतरांसही ‘मठीत आल्यावर व्यर्थ गप्पा मारु नका’ म्हणून आर्वजून सांगत असत. त्यांचा भाऊ दत्तापण श्रीगुरुभजनी रमून सेवेत दंग राही. संसारीक गोष्टींचा त्यांना बिलकूल छंद नसल्याने केवळ श्रीगुरुसेवेतच त्या दोघांची मने पूर्णपणे रंगून गेली होती. इतरांनी पण असेच आपल्या जीवनाचे सार्थक करावे, हीच त्यांची ओढ असे.

# कागलचे श्री, हरिपंत शिंदनेर्लीकरांना अदभूत प्रचीती

‘कागल’ गावीचे श्री हरिपंत शिंदनेर्लीकर घरचे खाऊन पिऊन सुखी होते. राजदरबारी काही कामकाज करुन पुढे त्यांना चांगले धनही प्राप्त झाले. एकदा काही कामानिमित्त ते कोल्हापुरी आले. त्यांना कुंभारगल्लीत कोणी एक सत्पुरुष रहात असून, लोक त्यांना साक्षात् श्री दत्तगुरुच मानतात असे समजले. कामकाज संपवून सायंकाळी ते कुंभारगल्लीमध्ये दर्शनास आले. श्रीकृष्ण सरस्वती स्वामींचे दर्शन घेताच त्यांचे मन मोहून गेले. पुढे त्यांनी ‘कागल’ सोडून ‘कोल्हापूर’ मध्येच राहून नित्य श्रीगुरुदर्शनाचा नियम चालविला यथाक्रम राजदरबारची नौकरी सोडून देऊन ते वैराग्यमठीतच दिवसरात्र श्रीस्वामींच्या संगतीतच राहू लागले. दररोज सकाळी स्नान करुन खोल खंडोबाच्या मंदिरामध्ये जाऊन एकांतामध्ये पूजनअर्चन करावे व नित्य ठराविक मंत्राचे अनुष्ठान करुन परत मठीत येऊन श्रीस्वामी सेवेते रहाण्याचा त्यांचा नियम होतो. ते ज्या श्रीखंडोबाच्या देवळामध्ये नित्य अनुष्ठान करीत त्या देवळामध्ये गाभा-यात उजेड येण्यासाठी एक खिडकी होती. श्री हरिपंत रोड मंत्रपठना साठी पुस्तक काढून वाचू

लागताच एक मांजर नेमके त्याचवेळी त्या खिडकीत येऊन बसत असे. त्यामुळे नेमकेच त्यांच्या त्या मंत्रपठनाच्या पुस्तकावर त्या मांजराची सावली पडत असे. दोन-चार दिवस हे पाहून एकदा रागाने त्यांनी त्या मांजरास थापड मारली. पुढील अनुष्ठात संपवून नियमाप्रमाणे ते मठीत आले. श्रीस्वामींच्या दर्शनासाठी येताच इतके वेळ झोपलेले श्रीस्वामी आपला लालबुंद होऊन सुजलेला गाल सर्वांना दाखवित म्हणाले. "या हरीचे मंत्रपठन ऐकण्याकरीता मी रोज जात असे पण आज याने चक्क मला थोबाडीत मारले." श्रीस्वामींचे हे बोलणू ऐकून व त्यांचा गाल पाहून श्री हरिपंतांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. श्रीगुरुस्वामींना आपण ओळखू शकलो नाही याचे त्यांना फार वाईट वाटले. तसेच श्रीगुरुस्वामींना फक्त त्यांच्या आपण समजतो तितक्या देहापुरतेच मर्यादित नसून सर्व चराचर सृष्टीत विविध रुपांत तेच नांदत आहेत याचा प्रत्ययही त्यांना आला. आता सर्वत्र गुरुरुपानेच पाहाण्याची दृष्टी त्यांना लाभली.

# नामदेवांना कळली सर्वत्र स्वामीसत्ता

सदभक्त श्री. नामदेव यांच्या बाबतीतही एकदा असाच प्रसंग घडला होता. नामदेवांचा स्वभाव प्रथम फार करारी असताना एके काळी रागाने त्यांनी ऊसानेच आपला शांत सुशील धर्मपत्नी सौ. गंगूबाईंना दोन-चार तडाखे ठेवून दिले. त्यानंतर नित्याप्रमाणे कुंभारगल्लीमध्ये वैराग्यमठीत श्रीस्वामींच्या दर्शनास आले. त्यावेळी श्रीस्वामी अंथरुणावरुन उठून आपली पाठ दाखवित नामदेवांना म्हणाले, "अरे नाम्या, किती जोराने मला मारलेस रे!" श्रीस्वामींच्या पाठीवर दोन-चार वळ स्पष्ट दिसत होते. क्षणार्धातून नामदेवांना काही वेळापूर्वी आपण रागाने आपल्या पत्नीस जोराने मारल्याचे आठवले. त्यांना पूर्ण पश्चाताप होऊन त्यांची वृत्तीच पालटून गेली व सर्वत्र श्रीगुरुस्वामी महाराज भरुन उरलेत याचा ठाम भरवंसा निर्माण झाला.

# आदर्श स्वामीभक्त म्हैसाळच्या शिऊबाई

श्रीस्वामींच्या सेवेत आलेल्या म्हैसाळच्या श्री शिऊबाईंची कहाणी पण फार वेगळीच आहे. 'म्हैसाळ' गांवी रहाणार्या शिऊबाई मातापित्याच्या लाडक्या होत्या. उपवर होताच त्यांचे लग्न केले गेले. सासरी सुखाने नांदत असतानाच त्यांचे मातापिता स्वर्गवासी झाले. पुढे त्यांचा पतीही अकस्मात् मृत्यू पावला. दुःखी शिऊबाई आपल्या पोटी जन्मलेल्या कन्येचे संगोपन करीत कशीबशी जगू लागली. कर्तासवरता पती निधन पावल्यामुळे तिच्यावर गावात भिक्षा मागून जगण्याची वेळ आली. पुढे कर्मधर्मसंयोगाने ती कोल्हापूरात आली. श्रीकृष्णगुरुंची ख्याती ऐकून त्यांची सेवा करुन आपल्या जीवनाचे सोने करता येईल तर बरे होईल, या विचाराने ती कुंभारगल्लीत वैराग्यमठात

येऊन पोहोचली. तिच्याकडे पहात दिनदयाळू भक्तवत्सल श्रीस्वामी महाराज म्हणाले, "शिऊबाई तू येथेच राहशील काय?" म्हणून आनंदून जाऊन लगेचच 'हो' म्हणाला. सकाळ पासून रात्रीपर्यंत मठीतील पडेल ते काम तत्परतेने करुन त्या श्रीस्वामी संगतीस जीवन जगू लागल्या. अयाचितवृत्तीने फक्त चण्याची डाळ खाऊन रहाण्याची आज्ञा तिला श्रीस्वामींनी केली. श्री. रामजीभाऊं सारखे सदभक्त तिला डाळ देऊ लागले. काही दिवसांनी तिला एकांती पंचगंगे तीरी स्मशानी वास करुन रहाण्याची आज्ञा झाली. तरुण शिऊबाई या आज्ञेने घाबरली पण श्रीस्वामींनी तिला सांगितले, "शिऊबाई तू बिलकूल घाबरू नकोस. तुझ्या सोबत माझी 'कुसारी' तुझी पाठराखण करीत राहील." श्रीस्वामींचे हे बोलणे ऐकताच शिऊबाईला मोठा धीर आला. 'कुसारी' ही स्वामींच्या मठीतील एक लाडकी कुत्री होती. तिची कहाणी ही मोठी गोड आहे. ऐका तर त्या 'कुसारी' ची ही पूर्वकथा.

# 'कुसारी' रुपामध्ये लाडांच्या आईचा उद्धार

श्रीस्वामी कृपेने संन्यासी बनलेले श्री.कृष्णा लाड यांची मातापूर्वी फार विचित्र वृत्तीची होती. धर्माचरणी-गुरुसेवक मुलगा लाभूनही ही मात्र संसारी आसक्त सामान्य स्त्रीच होती. तिचा स्वभाव पाहून श्रीकृष्णा लाड यांस मनोमन वाईट वाटे. आपल्या आईच्या मूळ स्वभावात बदल होऊन तिनेही श्रीस्वामींची भक्ती करावी अशीच त्यांची नित्य तळमळ असे. श्रीस्वामींच्या चरणी स्पष्ट शब्दांत तो अशी नेहमीच विनवणी करीत असे. श्रीस्वामींनाही त्याची

तळमळ पाहून दया आली. ते म्हणाले, “कृष्णा, ही पूर्वीचीच पापी असल्यामुळे तिची इकडे सदभक्ती नाही. पण तुझ्याकरिता मी तिला सरळ करेन. त्या पोरगीला या पायी आणून मग पूढे तिचा उद्धार करीन.” श्रीस्वामींचे वचन ऐकून कृष्णाला आनंद झाला. वयानुसार थकल्यामुळे ती पुढे मृत्युपंथाला लागली. त्यावेळी अंथरुणावर पडल्यावर तिला काळेकभिन्न विचित्र क्रूर पुरुष धावत येताना दिसत. ती घाबरुन आपल्या मुलास त्यांना दूर घालवायला सांगे. कृष्णालाही समजले की हे क्रुर पुरुष म्हणजे केवळ तिचेच पूर्वपाप आहे. कृष्णा लाड नेहमी आपल्या गळ्या श्रीकृष्ण सरस्वती स्वामींच्या पादुका श्रध्देने धारण करीत असे. आईचा शेवट पाहून त्यांने स्वामींच्या पादुका तिच्या गळ्यात घालून दिल्या. आश्चर्य म्हणजे त्या पादुका तिच्या गळ्यात पडताच तिला त्या क्रूर पुरुषांऐवजी सात्विक ब्रह्मवृंद तिच्याकडे येताना दिसू लागले. आईने मोठ्या शांतचित्ताने कृष्णाला सांगितले, “बाळा, मी पूर्ण समाधानी आहे. मला काहीही त्रास नाही. तू नित्य श्रीस्वामी महाराजांची सेवा करीत रहा. आता मी येते.” असे बोलत-बोलत त्यामातेने सुखाने प्राण सोडला. कृष्णाला आईचा विरह जाणवून दुःख झाले. तो रडू लागला पण त्यासमयी त्याचाय डोळ्यासमोर श्रीस्वामींची मूर्ती प्रगटून त्याचे दुःखहरण झाले. श्रीस्वामींनी त्याचे सांत्वन करुन धीर दिला. पुढे श्रीस्वामींच्या वैराग्यमठीत एक कुत्री व्याली. त्यावेळी श्रीस्वामी कृष्णा लाड यांस म्हणू लागले, “अरे, पोरगी आली बघ.” आपली आईच श्रीस्वामीकृपेने त्या कुत्रीच्या पोटी आल्याचे त्यास समजले. श्रीस्वामींनी त्या नविन कुत्रीच्या पिल्लास ‘कुसारी’ नांव दिले. ही कुसारी श्रीस्वामींची फार लाडकी होती. कोणी कोणतेही मिष्टान्न दिले तरी श्रीस्वामी आज्ञेविना ती त्यास तोंड लावित नसे. कोणी हटकले. रागावले तर ती थेट श्रीस्वामींच्या पायी येवून बसे मग तेही प्रेमाने तिला कुरवाळून पेढे भरवीत असत. असो. अशी आहे त्या भाग्यवान कुसारीची पूर्वकथा.

# पंचगंगेतीरी स्माशानी शिऊबाईंची साधना

श्रीस्वामींनी शिऊबाईंला स्मशानी पंचगंगेकाठी एकांतामध्ये रहाण्याची आज्ञा केली आणि सोबत ‘कुसारी’ ला पण पाठविले. शिऊबाई त्यानुसार कुसारीसह स्मशानी निर्भयपणे राहू लागल्या. अयाचितपणे मिळालेली डाळ खाऊन कुसारीसाठी त्या डाळीचाच आहार देऊ लागल्या. ती पण इतरत्र काही न खाता त्या डाळीवरच भूक भागवून दिवसरात्र शिऊबाईंची पाठराखण करीत असे. तीन वेळा स्नान करुन दिवसरात्र श्रीगुरुंचे नामचिंतन करीत वैराग्यवृत्तीने शिऊबाईचा काळ तेथे जाऊ लागला. एकदा असेच स्नान करुन त्या ध्यानाला बसल्या असताना सोबतच्या कुसारीचा स्पर्श होईल म्हणून त्या रागाने तिला मारण्याचा धाक दाखवित ओरडू लागल्या. तेवढे निमित्त होताच कुसारी तेथून निघून थेट कुंभारगल्लीत वैराग्यमठीत श्रीस्वामींच्या पायी येऊन बसली. शिऊबाईंने बरीच वाट पाहूनही कुसारी परत न आल्यामुळे तीही श्रीस्वामींकडे आली. तिथे कुसारीला पाहून तिने श्रीस्वामींना सर्व सांगून परत आपल्यासोबत कुसारीला पाठविण्याची विनंती केली. परंतु श्रीस्वामी म्हणाले, “शिऊबाई, आता काही माझी कुसारी तुझ्यासोबत येणार नाही. तू एकटीच आता रहा जा.” श्रीस्वामींचे हे शब्द मान्य करुन शिऊबाई मग त्यांचेच मनःपूर्वक ध्यान करीत निर्धाराने पंचगंगेकाठी स्मशानी एकट्याच परतल्या. एकट्या शिऊबाईंना पाहून तेथील गुरे चारणारे गुराखी त्यांना सांगू लागले. “बाई, आमची गुरे मोठी अवखळ आहेत. तुम्ही एकट्या इकडे राहू नका. कदाचित गुरे उधळून तुमच्या अंगावरही येतील.” तेव्हा पंचगंगेकाठी असलेल्या श्री राजगुरु महाराज श्री सिद्धेश्वर बुवांच्या समाधीस्थानाशेजारी निवांत जागा पाहून त्या काही दिवस तेथे साधनेत गढून गेल्या. तीन वेळा स्नान करुन श्रीस्वामींचे नामचिंतन करीत ध्यान धारणेत काळ घालवू लागल्या. मधून कुंभारगल्लीत येऊन श्रीस्वामींचे दर्शन घेऊनही त्या परत जात असत. काही काळाने त्यांची एकांतीची साधन पूर्ण होताच श्रीस्वामींच्या आज्ञेने त्या पुनरपि त्यांच्यासोबतच वैराग्यमठीत राहू लागल्या. त्यांचेही आता स्वामींच्या सगुण संगतीशिवाय इतरत्र कोठेही बिलकूल मन लागत नसे.

# तीन जन्मांच्या तपामुळेच तारासदनी स्वामींचा वास

श्री हरिपंत शिदनर्लीकर यांचे मनात श्रीस्वामींचे हे दिव्य चरित्र पाहून वारंवार असे यऊ लागले की ताराबाईसारख्या स्त्रीच्या घरापेक्षा श्रीस्वामींच्या निवास इतरत्र झाला तर फार बरे होईल. त्याने त्यादृष्टीने श्रीरामदासबुवा ब्रह्मचारी, श्रीवेणीमाधव या ब्राह्मणाचे मन वळवून एखादे अनुष्ठान करुन श्रीस्वामींचा निवास इतरत्र हलवावा म्हणून प्रयत्न सुरु केले. श्रीस्वामींना त्यांनी याविषयी विचारताच त्यांनी मोठ्या खुबीने त्यांस अनुष्ठानास बसण्यास होकार दिला. दोन आठवडे उपासतापास करुन त्या तिघांनी काहीसे अनुष्ठान मांडले. एके दिवशी वेणीमाधवास एकांती भेटीत श्रीस्वामी म्हणू लागले, “विणकरभटजी, पंढरीच्या विठ्ठलास एक आणा कर्ज झाले आहे. त्यापैकी अर्धे फिटले-अर्धे अजून फिटायचे आहे. तुमच्या या उपासतापासांचे कष्ट व्यर्थ आहेत. त्यामुळे काही तो पंढरीचा विठ्ठल कर्जमुक्त होणार नाही.” इतके ऐकूनही त्याचा बोध वेणीमाधवांना झाला नाही. त्या रात्री श्री. हरिपंत व श्रीरामदासीबुवा यांना एकाच वेळी एकच स्वप्न पाहायला मिळाले. दोघांच्याही स्वप्नांत एक बलाढ्य असा हनुमंतासारखा वानरपुरुष ताराबाईने एका स्तंभाला घट्ट बांधून ठेवून ती त्यांस सांगू लागल्याचे दिसले की, “मी तीन जन्म कष्ट केले. अगाध तप केले. त्याचेच फळ म्हणून हा हनुमंत मी बांधू शकले. नाही तर हा येथे स्थिर कसा राहिला असता?” असे स्वप्न पाहून दोघेही जागे होऊन एकमेकांना आपापले स्वप्न सांगू लागले. दोघांचेही स्वप्न तंतोतंत एकसारखेच होते. त्याच्या विचार ते करु लागले. वेणीमाधवही त्या दोघांसोबत तिथेच होता. त्यांच्यासमोर स्वप्नाचा अर्थ ते समजावून सांगू लागले. ते ऐकून सकाळीच त्यालाही श्रीस्वामींनी एकांती सांगितलेले बोलणे आठवले व भावार्थ ध्यानी आला. ताराबाईच्या भक्तीबळामुळेच श्रीकृष्ण सरस्वती स्वामींसारखा हनुमंतरुपी लोकोत्तर महापुरुष लोकदृष्टीने ताराबाई एक सामान्य पतीत स्त्री असली तरी तिच्याच सदनी वैराग्यमठी स्थापन करुन आनंदाने सहजलीला करीत असल्याचे त्यातिघांनाही स्पष्ट कळून चुकले. श्रीस्वामींचे निवासस्थान येथून हलविण्याची त्यांची दृष्टीही नाहिशी झाली. ताराबाईचे हे तपोबळ व भक्तीचे सामर्थ्य त्यांना लपवून ठेवता आले नाही. त्यांनी स्वमुखेच सर्व वृत्तांत इतरांना सांगून दिला.

# भक्तांचे गर्वहरण करणारे स्वामी

ताराबाईंच्या कानीही हा सर्व वृत्तांत आल्यावर तिलाही आनंद झाला पण पुढे पुढे याबाबतीत गर्व चढून तिला वाटू लागले की, “माझ्याच घरी रहाणे यांना फार आवडते. माझ्या हातचे स्नान-भोजनाच त्यांना प्रिय आहे. माझ्याशिवाय यांना इतरत्र करमत नाही. माझ्यावरच यांचे सर्वात जास्त प्रेम आहे.” ताराबाईच्या मनातील अहंकार श्रीस्वामींना कळून आला. त्यांना मग तिला सावध करुन वळणावर आणण्यासाठी एक लिला करणे भाग पडले. दक्षिणकाशी म्हणून प्रसिध्द असलेल्या या करवीर नगरीच्या सन्निध्यात ‘प्रयाग’ नावाचे क्षेत्र आहे. तेथील कासारी-भोगावतीच्या संगमस्थळी श्रीदत्तप्रभूंचे स्थान आहे. दर वर्षी माघ मासामध्ये संक्रातीच्या पर्वकाळी येथील स्नानाचे महात्म असून पुढे महिनाभर येथे मेळा भरत असतो. नुकतीच ही वेळ आलेली पाहून भक्तगणांनी श्रीस्वामींना प्रयागस्नानासाठी नेण्याचे ठरविले. ताराबाईनेही तिथे वनभोजनाचा कार्यक्रम आखला. श्रीस्वामींना याविषयी सांगताच त्यांनीही अनुकूलता दर्शविली. समोर उभ्या असलेल्या श्रीकृष्णा स्वार यांचेकडे पाहून श्रीस्वामी म्हणू लागले, “कृष्ण आम्ही तुझ्याच पाठीवर बसून प्रयागाला येऊ पूर्वी बाळकू आमचा फार सुंदर तट्टू होता. त्यानंतर तूच मोठा छान घोडा आम्हास बसण्यासाठी योग्य दिसतोस. पंढरीच्या विठूरायालाही क्षणभर भुलविण्याचे वैभव तुझ्यापाठीमागे दिसते.” श्रीस्वामींच्या बोलण्याचा आर्थ इतरांस तो सांगू लागला “माझ्या आईचे वडील राजदरबारी नोकरी करीत असतानाही दरवर्षी आषाढीची पंढरीवारी पायी करण्याचा नियम मोडत नसत. पंढरीच्या विठूरायावर त्याची पूर्णश्रद्ध होती. वयपरत्वे त्यांना पायी वारी करताना त्रास होत असूनही ते हसतमुखाने नियम चालवित असत. एकदा शरीर थकल्यामुळे पायी वारी प्रसंगी नेहमीच्या वेळेपेक्षा त्यांना जास्त वेळ लागला. वारी पूर्ण करुन राजदरबारी हजर होण्याचा दिवस उलटून गेला. नंतर ते परतले. भीतभीतच कामावर हजर झाले तर त्यांच्या नियमित दिवसांपासून त्यांचे जागेवर त्यांचे काम सुरळीत सुरु असल्याचे सर्वांनी सांगितले. त्यांनी आपण तब्बेतीमुळे इतके दिवस उशीरांनी कामावर येत असल्याचे सांगताच सर्वांनीच त्यांना “असे का म्हणता? तुम्ही तर दररोज हजर असता की” असे सांगितले. परत परत सांगूनही कोणीही ऐकेनात तेव्हा आपल्या गैरहजेरीमध्ये आपल्या अब्रु रक्षणासाठी साक्षात् पंढरीचा विठूरायाच आपल्या रुपामध्ये नोकरी करुन गेल्याचे त्यांना पक्के समजले. त्यामुळे पश्चाताप युक्त अंतःकरणाने नोकरी सोडून देऊन माझे आजोबा फक्त भगवत् भक्तीतच पुढील आयुष्य काढू लागले होते. त्यांची मुलगी माझी आई. श्रीस्वामींनी पंढरीच्या विठूरायाला क्षणभर भुलविण्याचे वैभव तुझ्यापठीमागे दिसते असे त्यामुळेच मला म्हटले.” हे सर्व सांगत असतानाच नकळत आपण इतरांपेक्षा कोणी वेगळे असल्याचा क्षणिक भाव त्यांच्या मनात येताच श्रीस्वामी त्यांचेकडे पहात म्हणाले. “अरेरे, याचे पात्र तर मलीन झाले. आम्हास बसण्यास हे योग्य होणार नाही.” सोबतच असणार्या विनम्र सेवाभावी श्री. कृष्णा लाड यांचेकडे पहात, “हेच आम्हास योग्य होईल” असे म्हणत श्रीस्वामी त्यांच्या खांद्यावर बसून प्रयागक्षेत्री जाण्यास निघाले.

# प्रयाग संगमी क्षेत्राची अपूर्व भेट

सोबत अनेक भक्तगण आनंदाने चालू लागले. थंडी पडून गार बोचरे वारे अंगास झोंबत असतानाही श्रीगुरु स्वामींच्या सहवासात त्यांच्याच नामगजरामध्ये सर्वजन प्रयागक्षेत्री येऊन पोहोचले. येथे येताच श्रीस्वामींनी इतरांस स्नान करुन येण्यास सांगितले पण प्रथम श्रीस्वामींनाच स्नान घालण्याची सर्वांची इच्छा होती. भक्तांच्या इच्छेनुसार श्रीस्वामी संगमावर आले. संगमक्षेत्राच्या स्थानी नदीपासू दोन-तीन पावले दूर असतानाच अचानक पाण्याची लाट इतक्या दूर येऊन श्रीस्वामींच्या चरणी लोळण घेऊन परत मागे फिरली. जणू काही तीर्थजल ही त्यांचे चरणी लागून परमपवित्र होण्यासाठी अधीर झाले होते. साक्षात् संगमतीर्थानेच श्रीस्वामींच्या पायाची पूजा केल्याचे पाहून सर्वच भक्तगण भारावून गेले. श्रीस्वामींनी पण “आमचे स्नान झाले. चला, चला.” असे म्हणत तेथील एका वृक्षाखाली उभारलेल्या सुशोभित मंडपामध्ये येऊन त्यांच्यासाठी अंथरलेल्या आसनावर हसत हसत बैठक मारली. ताराबाई इतरांच्या मदतीने लगबगीने वनभोजनासाठी आणलेल्या साहित्याची जुळवाजुळव करीत भोजन तयार करण्याच्या कामी गुंतून गेल्या. श्रीस्वामींच्या शेजारीच श्री. कृष्णा व श्री. वासुदेव दळवी आपल्या दैनंदिन पूजापाठात निमग्न झाले होते. श्रीस्वामींनी दोघांकडे पाहून त्वरेने तेथून उठून सोबत चलण्याचा त्यांना इशारा केला. चालता चालताच ते म्हणू लागले, “अरे आपणास फार दूर जायचे आहे. दत्तप्रभूंची प्रार्थना करा. विवेक वैराग्य जागृत ठेवून धीर-भक्तीची कांस धरा. त्या ताराबाईला आता थोडे जागे करण्याची हीच संधी आहे. चला चला.” आपल्या हाती मूठभर चिरमुरे घेऊन ते ताराबाईच्या हाती ठेवत श्रीस्वामी म्हणाले, “आई, हे घ्या, खात बसा. तुम्हाला हेच गोड वाटते ना. आता जड वाटू देऊ नका” श्रीस्वामींचे हे बोलणे ताराबाईंना थोडे नेहमीपेक्षा विचित्रच भासले. तो पर्यंत श्रीस्वामींनी श्री. लाड व दळवी यांचा हात धरुन तेथून आडमार्गाने पळण्यास सुरुवात केली. ताराबाईने सोबतच्या भक्तांना त्यांचे मागे जाण्यास सांगितले. हाती दिलेल्या तिथल्या दुकानातील चिरमुरे पाहून त्याचा भावार्थ ‘आता बस चिरमुरे खात निवांत’ असाच श्रीस्वामींचा आशय असणार हे जाणून ताराबाईला वाईट वाटू लागले. ती आपल्याकडून काय चुकले, याचे मनोमन विचार करु लागली. इकडे श्रीस्वामींचा पाठलाग करीत-करीत इतर भक्तगण कासावीस झाले. श्री. लाड, दळवींसह श्रीस्वामी कोठेच सापडेनात. अखेरीस सर्वचजण दमून भागून परत ताराबाईंपाशी आले. श्रीस्वामींचा काहीच पत्ता लागला नसल्याचे ऐकून ती व्यथित झाली. पुढे सायंकाळ होऊन केलेले अन्न गार झाले. सर्वजण उपाशी होते ते पाहून ताराबाईनी सोबतच्या इतर भक्तमंडळीस नाईलाजाने जेवण्यास बसविले. पूर्ण रात्रभर नामस्मरण करीत तिने काढली आणि सकाळी निराश मनानेच ती सोबतच्या भक्तांसह घरी परतली.

# श्रीस्वामींसोबत श्री.लाड व दळवी यांची पदभ्रमंती

प्रयागक्षेत्रीहुन श्री. कृष्णा लाड व वासुदेव दळवी यांचाहात धरुन त्यांना अक्षरशः पळवत पळवत काट्याकुट्यांतून आडरस्ताने डोंगर द-यातून श्रीस्वामींनी पुढे-पुढे चालविले. उपाशीपोटी उन्हातान्हात पायात काही नसल्याने दगडगोटे, काटेकुटे लागत. पूर्ण दिवसभर फिरुन श्री. वासुदेव दळवी थकेल. ते स्वामींना विनवू लागले. सायंकाळ होऊन अंधार पडला. भूक लागून जीव हैराण झाला. जंगली श्वापदांची भीती मनात डेकावू लागील. श्री. दळवींची विनवणी ऐकून श्रीस्वामी म्हणू लागले. "वासू भ्याला रे भ्याला." तशीच रात्र काढली आणि सकाळी थोडे उजाडताच परत श्रीस्वामींनी धावावयास सुरुवात केली. मधून मधून श्री. दळवींची तक्रार ऐकून श्री. कृष्णा लाड त्यास धीर देऊन म्हणे, "अरे इतक्या भक्तांपैकी फक्त आपणाला श्रीस्वामी सहवासात चालवित आहेत हेच भाग्य समज." आता श्रीस्वामींची जी आज्ञा तीच तंतोतंत पाळून पुढे जात रहायचे त्यांनी ठरविले. वाटेतच रस्त्यामध्ये मोठा सर्प दिसताच श्रीस्वामींनी श्री.कृष्णा लाड यांस त्या सापाला उचलून दूर सोडण्यास सांगितले. त्यानेही शब्दाबरहुकूम निर्भयपणे तो साप अलगद उचलून बाजूला नेऊन सोडला. लक्षतीर्थी बुडताना वाचविल्यापासून त्यांची ठाम श्रद्धाच होती की, श्रीस्वामी आपल्यामागे असताना कशासही भिण्याचे कारण नाही. आजही दिवसभर उन्हातान्हातून हिंडणे होऊन पोटी काहीच नव्हते. श्री लाडांनी विचार केला जवळच्या वृक्षाची पानेच श्रीस्वामींना अर्पण करुन खाऊया. त्यानुसार करताच श्रीस्वामींना होकार देताच श्री. दळवींनापण ती देऊन श्री. लाड ती पर्ण प्रसाद म्हणून भक्षू लागले. नाईलाजास्तव श्री. दळवींनापण हाच आहार करणे क्रमप्राप्त झाले. श्रीस्वामींना थकवा नाही. त्यांना ना भूकेची चिंता, ना झोपेची बाधा. दिवसरात्र चालूनही त्यांचे मूखावरील तेज पाहून दोघेही थक्कच होऊन गेले. अशा प्रकारे सहा दिवस त्यांनी त्या दोघांनाही फिरत फिरत पुढेच चालविले. मध्यंतरी एका ठिकाणी स्वतः श्रीस्वामींनी स्वहस्तेच झाडाचा पाला काढून, 'माझी मुले फार भुकेली' म्हणत त्यांना दिला. समोरच एक छोटेसे गांव पाहून श्री.दळवीने श्रीस्वामींना तेथून भिक्षा मागून आणण्ची परवानगी मागितली. तेव्हा श्रीस्वामींनी नकार दिला. भुकेने व्याकुळ झाल्याने परत परत तो विनवू लागताच स्वामी म्हणाले, "अरे, तेथे गेलास तर लोक मारतील. कशाला जातोस?" पण भुकेमुळे काहीच न सुचून, "श्रीस्वामी तुम्ही थोडा आराम करा मी पळत जाऊन भिक्षा घेऊन येता." म्हणत श्री. दळवी त्या गांवाकडे गेले. त्यांची भगवे वस्त्रे पाहून दोन चार दिवसांपूर्वी चोरी केलेला चोरच गोसाव्याचा वेष घेऊन आला असावा म्हणून गावकरी त्यांच्या मागे लागले. ते पाहून श्री.दळवी जीव घेऊन पळत-पळत श्रीस्वामींपाशी पोहोचला. त्याने ते सांगताच श्रीस्वामी म्हणाले, "अरे येथून लवकर दूर चला नाही तर ते गांवकरी सोडणार नाहीत." पुन्हा नाईलाजाने काही दूर अंतरापर्यंत पळत जाऊन श्रीस्वामींसह त्यांनी रात्रीचा तसाच मुक्काम केला. दुसर्या दिवशी आता. "बंदी येणार-बंदी येणार" म्हणत सकाळीच श्रीस्वामींनी त्यांना दूरपर्यंत चालविले. दुपारनंतर तिघांनाही अखेरीस गांवक-यांनी पकडून जवळच्याच श्रीहनुमंत मंदिरामध्ये ठेवून दिले. दुसर्या दिवशी सकाळी विचार करुन म्हणत, दोन माणसांना त्यांचेवर पाळत ठेवण्यास सांगून गांवकरी घरोघरी परतले. सायंकाळनंतर दोघा पाळतीवरच्यांचा डोळा चुकवून श्रीस्वामी गांवातील पाटीलाचे घरी जाऊन पाटलीणीकडून भाकरी मागू लागले. श्रीस्वामींचे तेजस्वी मुख पाहून ती त्यांची चौकशी करु लागून, 'येथेच बसून पोटभर जेवण करा.' म्हणू लागली. तेव्हा माझे दोन भक्त मंदिरी उपाशी आहेत, असे म्हणत तिने दिलेली भाकरी-लोणचे घेऊन ते मंदिरात आले. श्रीकृष्णा लाड यांनी श्रीस्वांमीनी आणलेली भाकर स्वतःचे हाती घेऊन प्रेमाने श्रीस्वामींना चारु लागले. अर्धी भाकर संपताच सोबत असलेल्या श्री. दळवींना वाटले, 'आता आपल्या वाट्याला काय येणार?' त्याचवेळी ती पाटलीण आणखी दोन भाकरी-लोणचे घेऊन तिथे आली. श्रीस्वामींनी हसतच इशारा करताच श्री.लाड व दळवी भाकरी लोणचे खाऊन शांत झोपले.

# सत्वपरिक्षेचा गोड शेवट व राजापूर दौरा

श्रीस्वामी मात्र रात्रभर जागेच होते. सकाळीच गांवकरी कोतवालासह तिथे आले. कोतवालाने श्रीस्वामींना ओळखून गावक-यांना स्पष्ट शब्दांत सांगितले, “अरे बाबांनो, हे तर कोल्हापूरचे थोर सत्पुरुष आहेत. कुंभारगल्लीत रहातात. श्रीकृष्ण सरस्वती स्वामी असे त्यांचे नांव आहे. उगाचच त्यांच्यावर खोटा आळ घेऊन त्यांना व सोबत्यांना छळू नका. नाही तर तुमचेच गांवचे अनहीत होईल.” हे ऐकून सर्वांनी त्यांना सोडून दिले. श्रीस्वामी त्या दोघांसह तेथून पुढे निघाले. श्रीस्वामींनी श्री.कृष्णा लाड यांस “झाडाची पाने काढून जेवणाची तयार कर. आज तुम्हास गोड जेवण मिळणार आहे.” असे सांगितले दुपार झाली तरी काही पत्ता नाही. त्यामुळे सात दिवसांचे भुकेलेले दोघेजण कासावीस होऊन गेले. इतक्यात अचानकच श्रीस्वामींचा एक परिचित भक्त तिथे आला. त्याने श्रीस्वामींना व त्या दोघांना ओळखून आनंदाने “इकडे कसे?” म्हणून विचालरे, श्री. लाडने आठ दिवसांचा समाचार सांगताच तो म्हणाला, “मी या गांवचा इनामदार आहे. समोरच माझा वाडा असून घरात सर्व परिवार नांदतो आहे. तुम्ही आमच्या घरी चला.” त्याने मोठ्या प्रेमाने त्या तिघांनाही आपल्या घरी आणले. श्रीस्वामींना तेल लावून, सुगंधी उटणे चोळून, गरम पाण्याने यथासांग स्नान घातले. त्या दोघांसही तसेच चोळून प्रेमाने अंग रगडून स्नास घातले. सुंदर आसनावर बसवून श्रीस्वामींची मनःपूर्वक थाटात पूजा अर्चा करुन गोडधोड जेवण संमर्पूण त्यांना तृप्त केले. चार दिवस तेथेच राहून मग श्रीस्वामींनी त्याचा आग्रह न जुमानता त्याच्या बैलगाडीने राजापूरला सोडण्यास सांगितले. राजापूरी श्रीस्वामींचा श्री.रामभाऊ वैद्य नावांचा एक भक्त होता. त्याच्याकडे ते गेले. तेथे अनेकांनी त्यांची पूजा करुन दर्शन घेतले. शेकडो रुपये, नारळ-खारकांचा ढीग पडला. तेथील मुक्कामानंतर श्रीस्वामींनी थेट कागल येथे जाणे पसंत केले. रस्त्यात जागोजागी सुंदर व्यवस्था होत गेली. तिघेही कागल गांवी येऊन पोहोचले.

# ताराबाईचा पश्चाताप व करवीरी पुनरागमन

इकडे करवीरनगरमध्ये कुंभारगल्लीत ताराबाई प्रयागश्रेत्रीहून आल्यापासून श्रीस्वामींच्या विरहामुळे वेडी होऊन गेली. तिने शोधासाठी सर्वत्र माणसे पाठविली. निरोप दिले पण थांग लागेना. श्रीस्वामींच्या आसनावर डोके ठेवून रडत रडत ती त्यांची वाट पाहू लागली. तीन दिवस अन्नपाणी वर्ज्य करुन ती तळमळत होती. तेव्हा श्रीस्वामींचा तिला दृष्टांत झाला, “आई, मी बरोबर एकवीस दिवसानंतर तुला सिंहासनावर बसलेला दिसेन, व्यर्थ कष्ट करुन घेऊ नकोस. तुझे उपोषण सोडून अन्नपाणी सेवन कर. अग तू अहंकार धरू नये म्हणूनच मी हे केले.” हा दृष्टांत पाहून मग ताराबाईंने पश्चातापपूर्वक श्रीस्वामींचे नामस्मरण करीत उपोषण सोडले. त्यांना शोधण्यासाठी गेलेल्यांस जेथे समजेल तेथे पुढे जाण्यासाठी ती सांगू लागली. अखेरीस राजापूरपासून कागलपर्यंतचा वृत्तांत समजून ताराबाई प्रेमाने श्रीस्वामींना म्हणताच श्रीस्वामींनी त्याचेकड पाठ वळवून आपले पुच्छ त्यास दखवून श्रीस्वामी समर्थांनी त्यांस दिलेल्या दृष्टांताप्रमाणे आपला हनुमंत अवतार त्यास पटवून दिला. हे दर्शन घडताच तो फारच आनंदीत होऊन स्वतःस धन्य समजू लागला. खरोखरीच असे भाग्य कोणा एखाद्याच्याच नशीबी असू शकते. श्रीस्वामींच्या आज्ञेनुसार त्यांचा आशिर्वाद व प्रेमळ निरोप घेऊन तो परत आपल्या गांवी गेला.

# स्वामींची अवधूत अवस्था व सूक्ष्म अळीला जीवदान

श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराज यांची अत्युच्च अवधूत स्थिती सर्व सामान्यांच्या सहज आकलना पलीकडची होती. त्यांचे कृपेने अनेक सदभक्तांस विविध लोकोत्तर दैवी अनुभव मिळत होते. कर्णोपकर्णी त्यांची किर्ती ऐकून अनेकानेक कामनिक लोक आपला स्वार्थ साधण्याच्या हेतूने कुंभारगल्लीतमध्ये गर्दी करु लागले. त्यावेळी केवळ संसारी कामनेमुळे स्वार्थी-ढोंगी वा कुटिल वर्तन करणार्या अभाविक लोकांपासून दूर राहण्याकरिता श्रीस्वामी मुद्दामच विचित्र वर्तन करुन त्यांच्या मनांत शंकेचे काहून निर्माण करीत. त्यांची शंका-कुशंका मंग अपोआपच त्या अभक्तांना श्रीस्वामींकडे जाण्यापासून दूर करीत असे. श्रीस्वामी कधी बालकवत् आचरण करुन आपल्या सदभक्त मातेचा पदर “आई-आई” म्हणत सज धरत, कधी निष्पाप प्रेमाने तिला जवळ करीत. तेव्हा कुटिल, दुर्जन, पापीजन आपल्या कुबुद्धीनुसार तर्क लढवित. सदभक्त ताराबाईंच्या शुद्ध अंतःकरणांची कल्पना नसलेले कुटाळ लोक तिच्यासारख्या घरी त्यांचा निवास पाहून खोट्या अफवा पसवित. अर्थात् श्रीस्वामींच यथायोग्य सुपात्रजनांनीच आपल्याकडे यावे म्हणूनच- “जगांत पिशाच्च अंतरी शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ।।” या संत तुकारामांच्या वचनानुसार सदा वागत असत. विनम्र शुद्ध भावनेने आलेल्या जिज्ञासू जनांना सहज बोलण्यातूनच ते हितोपदेश करीत असत. दररोज सकाळी प्रथम-प्रथम श्रीस्वामींचे मुखदर्शन, काकडआरती करुनच आपली नित्याची कामे करण्याचा काही जनांचा नियमच होता. एकदा असेच प्रातःकाळी श्री. कृष्णा लाड यांनी श्रीस्वामींना पहाचे जागे होताच उठवून बसविले. हात धरुन तोंड. हात, पाय धुण्यासाठी नेले. श्री. रामजीभाऊ श्रीस्वामींचे तोंड धुवून देऊ लागले. श्रीस्वामींचे स्वच्छ हात-पाय पुसून देऊन त्यांना प्रेमाने आसनावर बसवून काकडआरती केली गेली. नैवेद्याकरिता ठेवलेली खारीक भक्तांनी श्रीस्वामींच्या मुखात घातली. अगदी सहजच ती खारीक खात-खात श्रीस्वामी म्हणाले, “अरेच्या, गरीब बिचारे मुखात आले की, त्याला वाचविले पाहिजे.” श्रीस्वामींनी असे बोलत श्री.लाडांच्या हातावर आपल्या मुखातील खारकेचा चुरा ठेवला. त्यावेळी पहातात तर सर्व खारकेचा बारीक चुरा झाला असून त्यातील आळी मात्र धक्का न लागता जशीच्या तशी जिवंत होती. संत गोरा कुंभाराच्या जळत्या आव्यातील मांजरीची पिल्ले वाचविण्यार्या पंढरीनाथा प्रमाणेच येथेही मरणोन्मुख अळी सारख्या सूक्ष्मजीवास श्रीस्वामीरायांनी वाचविले होते.

# मिरजेचे थोर सत्पुरुष गाडगीळ रामदासींचा प्रेम भाव

श्रीकृष्ण लाड संन्यासी बनून अनेक दिवसांपासून श्रीस्वामींच्या सेवेतच दिवसरात्र रंगून गेला होता. एकदा मात्र कार्तिकी एकदशी निमित्ताने चाललेल्या पंढरीच्या वारकरी जनांचा मेळावा पाहून त्याच्याही मनात आले की, आपणही एक वेळ आळंदी पंढरपूर यात्रा करुन यावे. श्रीस्वामींना विचारताच त्यांनी हे कष्ट करण्याची काही आवश्यकता नसल्याने सांगितले. तरीपण त्याच्या मनांत त्या यात्रेसंबंधी ओढ निर्माण झाल्याने तो परत परत विचारु लागला. श्रीस्वामी म्हणाले, “तुला कष्टच भोगायची हौस आहे तर एकदा जाऊन येच.” पडत्या फळाची आज्ञा त्याप्रमाणे श्री. लाड यात्रेसाठी रवाना झाला. त्यासमयी ‘मिरज’ येथील थोर सत्पुरुष श्री. गाडगीळबुवा जनदृष्टीने दोन्ही डोळ्यांनी अंध असले तरी त्यांना अंतर्ज्ञानदृष्टी प्राप्त झाली होती. त्यामुळेच कोणीही व्यक्ती त्यांचेसमोर दर्शनासाठी येताच ते तात्काळ त्याची परिक्षा करुन अगदी स्पष्ट शब्दांत आपले मनोगत व्यक्त केल्या शिवाय रहात नसत. श्रीकृष्णा लाड यांना त्यांची माहिती झाल्याने प्रथम त्यांची भेट घेऊनच पुढील यात्रेला जावे या उद्देशाने ते मिरजेला आले. श्री. लाड त्यांच्या दर्शनासाठी वाकून पाय धरु लागताच श्री रामदासी गाडगीळ बुवांनी पाठ फिरविली. तरी पण श्री. लाड बळेच त्यांचे पाया पडू जाताच ते रागावून म्हणू लागले, “अमृताचा सागर सोडून हो ओढे-नाले शोधायला निघाला आहे. चिंतामणी रत्न टाकून हा काचगोट्या गोळा करायला चालला आहे.” अशाच प्रकारचे सूचक शब्द योजून त्यांनी शिव्यांचा भडीमार केला. श्री.लाड यामुळे घाबरले पण त्यांचा कृतीच्या भावार्थ ध्यानी न घेता तसेच दर्शन घेऊन ते आळंदीकडे निघाले.

# आळंदीमध्ये श्रीसंतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा दृष्टांत

वाटेत कुठेच त्यांना भिक्षा मिळेना. आपणासारख्या साधुसंन्याशांना लोक भिक्षा घालत नाहीत, म्हणून ते मनोमन चिडू लागले. आळंदीत २-३ दिवसांचे कष्ट करुन पोहोचले तर श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिराचे दार बंद झालेले दिसले. एक तर पोटी काही नाही. चालून-चालून थकलेले व येथे येऊन श्रीमाऊलींचे दर्शन नाही त्यामुळे श्री.लाड फारच त्रासून गेले. जवळच्याच धर्मशाळेत जागा शोधून विश्रांतीसाठी ते तसेच पडून राहिले. तेव्हा अचानक त्यांचा डोळा लागून त्यांना स्वप्नदृष्टांत झाला. स्वप्नामध्ये एक ब्राह्मण येऊन म्हणू लागला. “अहो बुवा, तुम्हाला हा भिकेचा नाद केव्हापासून लागला? चांगले गोडधोड मिळत असतानाही असे कोरडे तुकडे मागून खायची हौस बरी नव्हे.” त्याचे बोलणे ऐकून स्वप्नांतच श्रीलाड. त्याला सांगू लागला, “अहो, असे रागावू नका, मी तर येथे श्री ज्ञानराज माऊलींच्या दर्शनासाठी आलो आहे.” तो ब्राह्मण म्हणाला, “मग अद्यापि दर्शन का केले नाही.?” श्री. लाड म्हणाले, “रात्री देऊळ बंद झाले. मी कष्टाने खूप थकून गेलो. क्षमा करा. सकाळीच मी समाधीदर्शन करीन.” स्वप्न पाहून श्री लाड जागे झाले. आतापर्यंतचा प्रवास ध्यानी घेऊन आपण श्रीस्वामींच्या मर्जीविरुध्द येथे आल्याबद्दल त्यांना खेद झाला. नुकतेच पाहिलेले स्वप्न आठवून ते समजले की, आळंदीची श्रीज्ञानेश्वर माऊलीच ब्राह्मण रुपाने आपल्या स्वप्नात येऊन त्यांनी आपणांस स्पष्ट शब्दात ‘तुकडे मागायला आला’ असे म्हणून नाराजी व्यक्त केली. पहाटे अगदी लवकर उठून इंद्रायणीवर स्नान करुन श्री.लाड त्वरेने श्रीमाऊलीच्या समाधापाशई आले. डोळ्यातून पाणी वाहू लागले. पश्चाताप व्यक्त करीत ते प्रार्थना करु लागले. “हे पतितपावन श्री ज्ञानोबा माऊली तूच सगुण रुपात माझ्याकरिता श्रीकृष्ण सरस्वती रुपात करवीरी प्रगट असताना मी अज्ञान-मूढपणे आपली मर्जी नसताना येथे आलो. त्याबद्दल क्षमा करा. मला आपल्या पदरी घेऊन पावन करा.” श्रीमाऊलींच्या चरणी दंडवत करुन माध्यान्ही भिक्षा मागताच त्यादिनी थोडीफार भिक्षा प्राप्त झाली.

# पंढरपूरी विठूरायाचा दृष्टांत

ब्राह्मण श्री. लाडकडे बोट दाखवून दुस-याला विचारू लागला, “अरे, हा कोण?” दुसरा म्हणाला, “हा मोठा गुरुचा भक्त. तुकडे मागत इकडे आला आहे. तिकडे त्याचे पोट भरेना म्हणून मोठ्या कष्टाने इकडे फिरत आला आहे. श्रीकृष्णगुरुंचा हा मोठा धीट भक्त आहे. पण आम्हाला मात्रा याच्यासारख्या भक्तांचा वीट येता.” हे स्वप्न पाहून स्वप्नातच दुःखी झालेला श्री. लाड जागा झाला. खरोखरच श्रीगुरुंच्या मर्जीविरुध्द वागल्यास पंढरीनाथ विठूरायासारखा प्रेमळ देव व संतश्रेष्ठ श्री ज्ञानोबा माऊलींसारखी दिनदयाळू संत विभूतीही नाराज झाली. असा भावार्थ त्याच्या ध्यानी आला. एवढ्या मोठ्या पंढरपूर सारख्या क्षेत्रातही त्यांला किंचित भिक्षा मिळेना. तसाच त्याने परतीचा प्रवास सुरु केला.

# कृष्णा लाडांना पश्चाताप व स्वामींचे अपूर्व प्रेम

रस्त्यामध्ये दुसरे मोठे गांव लागले पण तेथेही त्याला भिक्षा मिळाली नाही. भुकेने तळमळून श्रीगुरुमर्जीविना केलेल्या यात्रेचा पश्चाताप करीत अगदी थकून भागून क्षीण होऊन तो विश्रांतीसाठी जमीनीवर आडवा झाला. त्यावेळी त्यास ग्लानी येऊन पुनःश्च एक स्वप्न दृष्टांत झाला. त्यामध्ये एक ब्राह्मण येऊन त्याला जागे करीत म्हणू लागाल, “अरे, आता सुर्योदय झाला. खाण्यापिण्याची काय चिंता करतोस. उठ, सावध हो.” स्वप्न पाहून तो जागृत झाला. तोपर्यंत एक साधी-भोळी गरीब बाई शेताकडे आपल्या नव-यासाठी शिदोरी घेऊन जाताना दिसली. श्रीकृष्णा लाड यांचा सुकलेला चेहरा पाहून तिने आस्थेने चौकशी केली. त्यांचेकडून सर्व माहिती ऐकून ती त्याला घेऊन शेताकडे आली. तिच्या मालकाने व आजूबाजूच्या शेतकरी लोकांनी या साधूवेषातील श्री.लाडांची मनोभावे विचारपूस करुन श्रद्धेने त्यांच्या पायी मस्तक टेकविले. त्यांना समाधानाने पोटभर खाऊपिऊ घालून मगच निरोग दिला. पुढील प्रवास सुखाने व लवकर पूर्ण करुन श्री. लाड कुंभारगल्लीत वैराग्यमठीत येऊन श्रीस्वामीच्या चरणी लागला. त्याच्याकडे पहात श्रीस्वामी विचारु लागले, “काय कृष्णा मग आलस तर हिंडून फिरून!” श्री लाड यांनी आपली चूक व्यक्त करीत क्षमायाचना केली. “यापुढे आपल्या मर्जीविरुध्द स्वतःच्या मनाने कोणतीही गोष्ट करणार नाही.” असे श्रीस्वामींना सांगत, त्याच्या पायाला घट्ट मिठी मारली. श्रीस्वामींनी मग त्या काही दिवस एकांतामध्ये राहून नामस्मरण-ध्यान करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे त्याने एकांती साधना सुरु केली. तेव्हा श्रीस्वामींनी त्याला स्वप्नामध्ये तरुणींच्या रुपात स्तनपानकरविले. स्वप्नातून जागे होताच श्री. लाड यांच्या ओठावर दूधाचे थेंब होते. प्रथमतः त्यामुळे त्यांना लाज वाटली पण क्षणातच त्यांना समजले की श्रीस्वामींना मी बालकाप्रमाणेच आहे. त्यामुळे त्यांनी त्या तरुणीच्या रुपात येऊन प्रेमाने मला दूध पाजले. अशा प्रकारे श्रीस्वामींचा आपल्यावरील कृपा लोभ पाहून श्री लाड आनंदून गेले. वैराग्यवृत्तीने ते अखेरपर्यंत श्रीस्वामींची सेवा-उपासना करीत मठीत राहील.

# श्री. कृष्णा स्वारांना पंढरीस पाठविले.

श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराज हे चालते बोलते देवच समजून सदभक्तगण 'यथा देवे तथा गुरौः' याप्रमाणे तिन्ही त्रिकाळी नव्हे पाच वेळा आरती-पूजा करु लागले. तसेच आपल्या लाडक्या श्रीस्वामीदेवांच्या इच्छेनुरुप प्रसाद वाटपही करु लागले. नित्य जागृत श्रीसदगुरुमाऊलीला प्रेमाने भूपाळी म्हणवून उठवणे व शेजारती म्हणून निजवणे सुरु होते. भक्ताचे प्रेम पाहून नित्य मुक्त अवधूत स्थितीतला हा महात्मा हे सर्व सोपस्कार-पूजा विधी मोठ्या कौतुकाने करवून घेत स्वस्थ बसे. नित्याप्रमाणेच श्री.कृष्णा स्वार एकदा दर्शनास आला असताना श्रीमहाराज त्यांस म्हणाले, "अरे, तुझा आजा पंढरीचा मोठा भक्त होता. तू ही एकवेळ पंढरीला जाऊन ये नां." श्री.कृष्णा खार यांची निष्ठा श्रीस्वामी पायीच दृढ असल्याने त्याला पंढरीला जाण्याची तितकी ओढ नव्हती. पण श्रीस्वामींचे शब्द ऐकून इतरही जन म्हणू लागले, "तुमचे घरी पंढरीची वारी होती तर तुम्हीही जाऊन यां." त्याच दरम्यान श्री.कृष्णा स्वार यांना एक दृष्टांत झाला. त्यामध्येही एक वारकीर त्यांच्या स्वप्नामध्ये येऊन सांगू लागला, "अहो, ऐका, पंढरीनाथ तुम्हांस बोलवित आहे." त्याने हे स्वप्न आईला सांगताच तिनेही त्याला जरुर एकवेळ पंढरीस जाऊन येण्यास सुचविले. इतके दिवस अपस्माराचा त्रास व घरची परिस्थितीही तितकीशी ठीक नसल्याने त्यास हे जमले नव्हते. जवळचे थोडेसे पैसे खर्चून एकवेळ जाऊनच यावे म्हणून त्याने आईला तसे सांगितले. तिने "प्रथम मला लुगडे घेऊन दे, मग जा." असे सांगितले. त्यानेही जवळचे पैसे खर्च करुन प्रथम तिला लुगडे घेऊन देऊन घरखर्चाची तजवीज करुन पायीच एक वेळ तरी पंढरीस जाण्याची तयारी केली. श्रीस्वामींकडे येऊन दर्शन घेऊन परवानगी मागताच ते म्हणाले, "अरे कृष्णा, मुळीच चालत जाऊ नकोस. राजेंच्या घोड्याच्या पागेत जा. तिथे व्यवस्था होईल." त्याप्रमाणे श्री. कृष्णा स्वार भेटला. तोही पंढरीला पत्नीसह जाण्याच्या तयारीतच होता. त्याने सोबतच्या घोड्यावरुन श्री.कृष्णा स्वार यालाही पंढरीला येण्यास सांगितले. अशा प्रकारे श्रीस्वामींच्या शब्दाप्रमाणे पायी न चालत जावे लागता त्याची पंढरीला जाण्याची व्यवस्था सहजच होऊन गेली. श्रीस्वामींना वंदन करुन तो पंढरीस जाऊ लागताच ते म्हणाले, "आता तुला अपस्माराचा त्रास बिलकुल होणार नाही. तू खुशाल जा." तो मित्रासोबत आनंदाने पंढरीस येऊन पोहोचला.

# विठुरायांच्या जागी स्वामींचेच दर्शन

पंढरपुरी भक्तगणांची इतकी अलोट गर्दी झाली होती की सहजासहजी लवकर दर्शन मिळणे दुरापास्त होते. श्री. कृष्णा स्वार श्रीस्वामी महाराजांचे नामस्मरण करीत विठूरायांच्या राऊळाभोवती घुटमळू लागला. त्याचे लक्ष तेथील एका पुजा-याकडे गेले. त्याने त्यांना विनवणी करताच इतक्या गर्दीतून त्या पुजा-याने त्याला थेट मंदिराच्या गाभा-यात नेवून सोडले. श्री. कृष्णा स्वार आतुरतेने श्रीविठुरायाच्या दर्शनासाठी पाहू लागला तर कुंभारगल्लीतील वैराग्यमठीतील नित्याच्या सिहांसनावर अंगात पांढरा शुभ्र अंगरखा, टोपी, मस्तकी टिळा, गळ्यात मोत्यांच्या माळा घातलेले आपले परममित्र श्रीस्वामीच हसत मुखाने त्याच्याकडे पहात असलेले दिसले. करकटेवर ठेवू विटेवर उभा असलेला, गळ्यात तुळशीहार घातलेला, बुका मस्तकी लावलेला पंढरीचा विठूराया तिथे दिसेनाच. तो चक्रावून गेला व परत परत डोळे चोळत पाहू लागला तरी तेच ध्यान. आजूबाजूच्या लोकांना तो विचारू लागला तर इतरांनी त्यास समोरच्या विठ्ठलमूर्तीचे वर्णन करुन सांगितले. तो चकित होऊन अखेर श्रीस्वामींच्याच पायी नतमस्तक झाला. दर्शन घेऊन वर पाहू लागताच श्रीस्वामींच्या ऐवजी विठूरायाची सावळीमूर्ती दिसू लागली. त्याने आनंदाने परत दर्शन केले. श्रीस्वामी व विठूराया एकच आहे याचा समक्षच अनुभव घेऊन तो इतरत्र न हिंडता त्वरेने घोड्यावरुन कोल्हापूरात परतला. लगबगीने मठात येऊन श्रीस्वामींच्या चरणी विनम्र दंडवत केले. इतर भक्तमंडळींना भेटून श्रीस्वामींची ही लीला त्याने आनंदाने सांगितली.

# स्वामींचा अंत लागणे कठीण

पंढरीक्षेत्री राऊळामध्ये श्रीस्वामींनी श्री. कृष्णा स्वार यांस समक्ष दर्शन दिल्याचे ऐकून श्री. रामजीभाऊ सांगू लागले, "अहो, नुकतेच मी श्रीस्वामींना विश्रांतीसाठी पलंगावर निजवून पंचगंगेवर त्यांच्या छाट्या धुवावयास आलो होतो. नदीवर छाट्या धुतानाच शेजारी खेळणा-या मुलांकडे माझे लक्ष गेले. पाहतो तर त्या मुलांसोबत एकीकडे आपले स्वामी उभे असलेले दिसले. मी जरा विचारांतच पडलो माझ्यामागून एकटेच हे केव्हा बरे आले असतील? त्या विचारामध्येच मी त्यांचेजवळ जाऊ लागलो तर ते गायब झाले. मी क्षणभर चकितच झालो व झरझर चालत मठी गाठली. पहातो तर श्रीस्वामी पलंगावर शांत निजलेले दिसले." त्यांचे हे बोलणे ऐकून शेजारीच उभ्या असलेल्या श्री. हरिपंत शिदनेर्लीकर यांनी स्वतःचा वेगळाच अनुभव कथन केला. ते म्हणाले, "मी श्रीस्वामींच्या शेजघरातच त्यांच्या पलंगाशेजारी बसून होतो. श्रीस्वामी शांत निजलेले दिसले. ते पाहून माझ्या मनात विचार आले, श्रीस्वामी तर देवरुप असून त्यांनाही सामान्य माणसांप्रमाणेच झोप लागत असेल काय?' हे विचार मनात सुरु असतानाच अचानक त्या शेजघरातील कोप-यातून स्पष्ट शब्द ऐकू आले. 'मुर्खा, असला विचार करुन उगाचच दोषी होऊ नकोस. आमचा अंत तुला काय लागणार?' हे ऐकून मी घाबरलो. कोप-याकडे पाहू लागलो तर तिथे कोणीच दिसेना. पण हे शब्द मात्र मी स्पष्ट ऐकले होते." श्रीस्वामींच्या अशा अतर्क्य लीला ज्यांनी ज्यांनी समक्ष अनुभवल्या त्यांना त्यांनाच त्याची सत्यता पटते. इतरांस या भ्रामक कथा वाटल्यास नवल नाही.

# राजापूरच्या भक्तास समुद्रातून वाचविले.

आपल्या भक्तसमुदायासमवेत श्रीस्वामी महाराज कुंभारगल्लीतील आपल्या वैराग्यमठीतील औदुंबरावृक्षाखाली आपल्या आसनावर मजेत बसले होते. भक्तमंडळींचे दर्शन संभाषन सुरु होते. यादरम्यान अगदी अचानक श्रीस्वामी महाराज म्हणू लागले, "अरेरे, घात झाला. तो बुडतोय त्या वाचविलेच पाहिजे." असे म्हणत काही हांवभांव करीत श्रीस्वामींनी आपल्या मांडी वरील कोरडे वस्त्र पिळले तर त्यातून पाणी ठिपकू लागले. आजूबाजूच्या भक्तांना हे सवर् पाहून-ऐकून काहीच कोडे उलगडले नाही. पुढे काही दिवसांनी राजापूरचा एक भक्त सहकुटुंब श्रीस्वामींच्या दर्शनास आला. तो सांगू लागला, "आज मी केवळ या श्रीसमर्थ गुरुमाऊलीच्या कृपेनेच जीवंत आहे. काही दिवसांपूर्वी समुद्रामध्ये आमची नौका फुटून सर्वजन बुडू लागले. नुकतेच राजापुरी श्रीस्वामींचे दर्शन झाल्यापासून मी त्यांचे नामस्मरण करुनच व्यापार चालविला होता. त्यामुळे मला फायदा होऊन प्रगती घडत गेली. तेव्हापासून मी नित्यच त्यांचे स्मरण करीत असतो. त्यादिवशी नौका फुटून बुडू लागताच मी त्यांचेच मनःपूर्वक स्मरण करुन आळवू लागलो. त्याप्रसंगी बटूरुपामध्ये प्रगटून त्यांनीच माला पाण्यातून ओढून काठांवर पोहोचविले. नौकेतील इतरजन बुडून गेले. श्रीस्वामी महाराजांची शक्ती अगाध आहे. त्या दिवसांपासून घरच्या मंडळीसह येथे येऊन दर्शन घेण्याची फार इच्छा होती. आज ती इच्छा त्यांनीच पूर्ण करुन आम्हास पावन करुन घेतले." हे सर्व हकीगत ऐकून बरेच दिवसांपासून भक्तांना पडलेले एक कोडे असे उलगडले. धन्य श्रीस्वामींच्या अजब लीला.

# गरीबाच्या भाकरीची सोय

श्रीस्वामींच्या दरबारी गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, स्त्री-पुरुष, जात-पात, वेश-भाषा, शहाणा-अडाणी वगैरे कुठलाच भेदभाव तीळमात्रही नव्हता. फक्त श्रद्धा-विनम्रता असणार्यांनाच येथे चांगले अनुभव मिळून त्यांची प्रगती घडत असे, हे ही तितकेच सत्य आहे. कोणी एक मोलमजुरी करुन पोट भरणारा सामान्य सदभक्त दररोज मठीत येऊन श्रीस्वामींचे मनोभावे दर्शन घेऊन कामावर जात असे, नेहमीप्रमाणे एकदा तो असाच दर्शन घेऊन जात असतानाच श्रीस्वामींनी त्याच्या जवळची खुरपे व दोरी काढून घेतली. त्याला कामावर न जाता घरी जण्यास सांगितले. तो म्हणू लागला “अहो स्वामी मी गरीब माणूस आहे. काम केले नाही तर मला आज भाकरी कोण देईल?” त्याचे बोलणे ऐकूण श्रीस्वामी म्हणाले, “तुला काही कमी पडणार नाही. दुसरे जागी आम्ही तुझी नेमणूक केली आहे.  घरी जा.”  नाईलाजाने तो बिचारा ठरलेले काम सोडून घरी आला. थोड्याच वेळात त्याचा  दुसरा एक सोबती घरी येऊन सांगू लागला. “अरे, माझ्यासोबत चल. आपल्या दोघांसाठी एक काम आहे.” ती त्यासोबत गेला व काम केले त्याला आवश्यक ती मजुरी मिळाली. घरी येताच समजले की, सकाळी तो ज्या ठिकाणी कामावर जाणार होता, तेथील अनेकांना राजसेवकांनी चोर म्हणून पकडले. काही चोर राजतृणाची चोरी करुन पळताना तेथील कामावर असणा-या काही मोलमजुरी करणा-याना पणे चोर समजून पकडून नेले गेले. तो ही त्याच ठिकाणी सकाळी कामावर जाणार होता. परंतु श्रीस्वामींनीच त्याला तिकडे जाऊ दिले नाही. घरी पाठवून दिले व दुसरे जागी नेमणूक केली म्हणूनच तो बिचारा निष्कारण होणा-या त्रासातून वाचला व नेहमीची मोलमजूरी मिळवून सुखाने राहिला. श्रीस्वामी महाराजा भूत-भविष्य-वर्तमान तर जाणतातच पण आपल्या भक्तांसाठी संकटी धावून जाऊन त्यांचे रक्षणही करीत असतात.

# 'रुई' गावच्या कृष्णाची संकटातून सुटका

'रुई' या गांवचा एक युवक 'कृष्णा' पूर्वभाग्याने श्रीस्वामी चरणी येऊ लागला. इंग्रजी शिक्षणाकरितां कोल्हापूर असताना दररोज श्रीस्वामींच्या मठीत येऊन सेवेची संधी तो चुकत नसे. श्रीस्वामींच्या दर्शन-आशिर्वादानेच प्रत्येक कामाची सुरवात तो करीत असे. एकदा गांवातून आई-वडिलांच्या निरोपामुळे त्याला घरी जावयाचे होते. त्याने दर्शन घेऊन परवानगी मागताच श्री. स्वामी म्हणाले, "आज जाऊ नकोस," पण आईवडिलांचा निरोप मिळाल्याने लगेच ने गेल्यास त्यांच्या गैरमज होऊन ते रागावतील म्हणून तो तसाच घरी निघाला. वाटेतच पावसाळई वातावरण होऊन गडद अंधार पडला. कसेबसे चालत गांवी येण्यासाठई खूप उशीरा झाला. भर पावसातच रस्त्याचालत तो घर गांठू लागला. तर गांवच्या जवळच्याच ओढ्याला प्रचंड पाणी भरून वाहूल लागल्याचे दिसले. अगदी घावनजिक येऊनही तो ओढा पार करणे शक्य नसल्याने भर पावसांतच पाणी ओसरेपर्यंत त्याला रस्त्यातच थांबून रहावे लागले. श्रीस्वामींची आज्ञा मोडून आल्याचे प्रायश्चित मिळाल्यामुळे त्याला खेद झाला. मग घरी पोहोचून आई-वडिलांना भेटून लगेचच सकाळी तो परत कोल्हापूरात येऊन मठीत दर्शनासाठी आला. श्री. स्वामींना वंदन करुन चुकीची माफी मागितल्यावरच त्याला थोडे बरे वाटले. त्यानंतर काही दिवसांनी दुसर्या गांवा कामाला जाताना तो श्रीस्वामी चरणी वंदन करुन आज्ञा मागू लागला. पण श्रीस्वामी काहीच बोलले नाही. त्यानेही सोयीस्कर अर्थ लावून कामावर गेला. तेथील काम संपताच सायंकाळ झाली. पण काम सफल झाल्याच्या आनंदात पन्हाळ्यासारख्या गांवाहून ताबडतोब निघून कोल्हापूरी पोहचून श्रीस्वामींचे दर्शन घेण्याचे त्याने ठरविले. वेळ झाल्यामुळे मुख्य रस्त्याने जाण्याऐवजी मधल्या पायवाटेने रस्ता धरुन तो येऊ लागला. अंधारात रस्ता चुकून तो भलतीकडेच जाऊ लागला. वाटेतच एक

मोठी खांच लागली ती ओलांडून पलीकडे जाणे त्याला जमेना. तो भांबावून गेला व तेथेच बसला. तेव्हा समोरुन येताना त्याला एक बाई दिसली. प्रथम तो घाबरूनच गेला. पण तिने चौकशी करुन सांगितले, "मी गौळण असून कामामुळे मलाही वेळ झाला. त्यातच रस्ता चुकल्याने रात्री झाली." असे सांगतच त्या बाईने लांबवर हात करुन त्या तरुणास सरजच इतक्या मोठ्या खांचेतून पलीकडे ओढून घेतले. या बाईने यांतून मला कसे ओढले म्हणून विचार करीत तो पाहू लागताच ती बाई दिसेनाशी झाली. तेव्हा ही केवळ आपल्या श्रीस्वामींची लीला असे मजून त्याने पुढील रस्ता धरुन मध्यरात्री कोल्हापूर गांठले. मठीत श्रीस्वामींच्या पायी लोटांगण घालून त्याने कृतज्ञता व्यक्त केली. श्रीस्वामी त्याच्यासाठी साक्षात् देवच होते.

# कांचीपूरम येथील आदेशाने आंध्र दांपत्य मठीत

आंध्र प्रदेशातील एका ब्राह्मणाच्या पत्नीस समंधबाधेने त्रस्त करुन सोडले. त्याने त्याकरिता देवदेवतांचे अनेक उपाय करुन पाहिले. श्रीक्षेत्र कांचीला असताना त्याला तेथील वरदराज स्वामींनी म्हणजेच भगवान् विष्णूंनी स्वप्नामध्ये येऊन गाणगापुरी जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो पत्नीसह गाणगापुरी येऊन श्रीदत्तात्रेय प्रभूंच्या चरणी लागला. एक वर्षभर दिवसरात्र तेथे श्रीदत्तसेवेत घालवल्यावर त्याला स्वप्न दृष्टांतामध्ये एका संन्यासीमूर्तीने सांगितले. "तू पत्नीला घेऊन कोल्हापुरात जा. तेथे तुझ्या हेतू सफल होईल." त्यानुसार तो ब्राम्हाण पत्नीला घेऊन कोल्हापुरात आला. कुंभारगल्लीतल्या साक्षात् दत्तगुरु स्वरुपी श्रीस्वामींच्या पायावर लोळण घेऊन त्याने दुःख निवारण करण्यास प्रार्थना केली. 'गाणगापुरी मिळालेल्या आज्ञेनेच आपणांकडे आलो आहोत.' असे त्याने सांगितले. श्रीस्वामींच्या आरतीसमयी त्याची पत्नी संचारामध्ये शुध्द मराठीत बोलत असे. बरेच दिवस श्रीस्वामींच्या सेवेत त्या दोघांनी श्रीध्देने काढले. अखेरीस श्रीस्वामींच्या आरतीसमयी त्याची पत्नी संचारामध्ये शुध्द मराठीत बोलत असे. बरेच दिवस श्रीस्वामींच्या सेवेत त्या दोघांनी श्रद्धेने काढले. अखेरीस श्रीस्वामींना त्यांची दया आली. आरतीसमयी त्या बाईमध्ये संचार होताच श्रीस्वामींनी त्या समंधास, "तु कोण ? या स्त्रीला का त्रास देतोस? " असे विचारताच तो समंध त्या बाईच्या मुखातून बोलू लागला, "मी पूर्वीचा दरिद्री ब्राह्मण, पत्नी-मुले त्यामुळे नेहमी दुःखी असत. एकदा थंडी-वारा, ऊन-पाऊस सोसून मोठ्या कष्टाने इतरत्र जाऊन सातशे रुपये मिळवले. पैसे घेऊन घरी चाललो. गांव लांब होते. मध्येच भुकेने व्याकुळ होऊन या स्त्रीच्या घरी थांबलो. तिने जेवणासाठी थांबवले. स्नानाकिरतां जाऊन परत

येताच या बाईने सर्व पैसे लपवून ठेवून विचारताच माहिती नसल्याचे सांगितले. त्या पैशाच्या चिंतनामध्येच गरीबीमध्येच मला मृत्यु आला. पैशाच्या आशेने मृत्यूनंतर पिशाच्च बनून राहिलो. श्री स्त्री पण पुढे मृत्यू पावली व आताच्या या देहात आंध्रप्रदेशातील या ब्राहमणाची पत्नी बनली. मी ही सूडभावनेने तिला पछाडले. ती रज सातशे रुपये खर्च करुन ब्राम्हणभोजन करील तरच मी तिला सोडीन." हे ऐकून श्रीस्वामींनी आपल्या आसनावरच बसूनच आपल्याच वस्त्राला एक गांठ मारली त्याबरोबर ते पिशाच्च तळमळू लागून, "अर्धे पैसे जरी खर्च केले तरी मी तिला सोडतो." असे म्हणू लागले. त्यावेळी ते पिशाच्च अगदी जेरीस आले व म्हणाले, "काहीच पैसे नाही दिले तरी चालेल तुमच्या चरणी आणून तिन माझ्यावर उपकारच केले. पण श्रीस्वामी. तुम्ही ती वस्त्राची गांठ सोडा, मला फारच यातना होतात. माझी एकच विनंती आहे. मला एखादा आंबा द्यावा. म्हणजे मी मुक्त होईन." त्याचवेळी दर्शनास आलेल्या एका भक्ताने श्रीस्वामी चरणी आंबा वाहिला. श्रीस्वामी त्याकडे पहात म्हणाले, "हा आंबा घेऊन बोलल्याप्रमाणे त्या बाईला सोड." त्या स्त्रीमुखातून ते पिशाच्च म्हणू लागले. "स्वामी तुम्ही धन्य आहात. आपल्या भक्तांसाठी या कार्तिकमासातसुध्दा तुम्ही आंबा आणवून त्याला सुखी केलेत व मलाही मुक्त केलेत." असे म्हणत धाडकन् ती स्त्री जमिनीवर पडली. तिची बाधा हरण झाली व त्या पिशाच्चास पण मुक्ती लाभली. श्रीस्वामींचा असा थोर अधिकार पाहून मनःपूर्वक स्तुती करीत त्यांची आज्ञा घेऊन ते दोघे ब्राहमण पतीपत्नी आपल्या गांवी सुखाने परतले.

# आकाशातील वीज स्वामी मठीत दर्शन करुन गेली.

'वैराग्यमठीत' अगदी भल्या पहाटेपासून भक्तांची वर्दळ सुरु होई. अगदी लगबगीने झाड-लोट, सडा संमार्जन, रांगोळी काढून पहाटेच्या काकड आरतीची तयारी केली जाई. श्रीस्वामींना प्रेमाने जागे करीत मुखमार्जन केले जाई. काकड ओवाळून श्रीस्वामींना दोन-चार घास फराळ भरविला जाई. भक्त आपापली स्नाने उरकून स्तोत्र पाठ, श्रीगुरुचरित्रवाचनामध्ये मग्न होऊन जात. नेहमीप्रमाणे त्यादिवशीपण सर्व असेच सुरु होते. कोण्या एका भक्ताने पंचामृताने श्रीस्वामींना न्हाऊ घालण्याचा नवस केला होता. आज त्याने यांची पूर्तता करण्यासाठी यथासांग तयारी केली होती. प्रथम उष्णादय मग, पंचामृत घालून सुंदर तेल, सुवासिक उटणे चोळून श्रीस्वामींच्या मंगलस्नानाची गडबड सुरु होती. उपस्थित ब्रह्मवृंद रुद्र-पवमान-वेदमत्रघोष पठन करीत होते. स्वच्छ स्नान घालून श्रीस्वामींना नित्याच्या जागी सिंहासनावर बसविले गेले. श्री. रामजी पुजारी पुजेत मग्न झाले. श्रीस्वामींना शुभ्र अंगरखा, हिरवी मखमली टोपी, कपाळी केशर कस्तुरीयुक्त चंदनी टिळा, त्यावर सुंदर कुंकुम, गळ्यामध्ये मोत्यांच्या माळा, सुवासिक सुंगधी फुलांच्या रंगीबेरंगी गुलाब, जाई-जुई, मोगरा-चंपक, शेवंती, वैजयंती वगैरेंच हार-गजरे समर्पून झाल्यावर श्रीस्वामींच्या अनुपम रुपाची शोभा वर्णन करणे अशक्य झाले होते. मोठ्या थाटात पंचारती झाली. कापूर-अत्तरे व

धूपदीपांचा सुगंधी दरवळ सर्वत्र पसरला गर्दीत सुरु असलेल्या दर्शन-संभाषणातून काही वेळ विश्रांती मिळावी गादीवर येऊन पहुडले. श्री.कृष्णा लाड मठीच्या मागील दारात समारंभाची भांडी घासून-धुवून ठेवती होता. त्यावेळी आभाळ भरुन येऊन वीजांचा कडकडाट होऊन पाऊस सुरु झाला. त्याप्रसंगी एक वीजेचा लोळ डोळे आणि क्षणांतच फिरुन परत येत आकाशमार्गे जाऊन लागताच मोठा आवाज झाला. श्री.कृष्णा लाड याने ही घटना सांगताच सर्वजन श्रीस्वामींच्या अगाध सामर्थ्याबाबत चकित होऊन गौरवाने त्यांची स्तुती करु लागले. वारंवर नमस्कार करीत श्रीस्वामीचरणी तल्लीन होऊन गेले. आकाशातील वीज ही स्वामी मठीत दर्शन करुन गेली.

# कृष्णा लाड़ांना तात्यासाहेबांचे दर्शन

श्रीकृष्ण सरस्वती स्वामी चरणी सदैव सेवेत रत असताना सदभक्त श्री. कृष्णा लाड श्रीस्वामींच्या मुख्यातून सदगुरू श्री अक्कलकोट स्वामी समर्थांचा आदराने नित्य 'तात्यासाहेब' या नांवाचा उल्लेख ऐकत असे, त्यांच्या मनात त्यांच्याविषयी ओढ निर्माण होऊन एकवेळ त्यांचे दर्शन घडावे असे वाटू लागले. त्याने त्याकरितां श्रीस्वामींच्या चरणी प्रार्थना केली असताना ते म्हणाले, "वा, वा, तुला माझ्या तात्यासाहेबांच्या दर्शनाची ओढ आहे काय?मग जरुर दर्शन घडेल. " श्रीस्वामींचा असा आशिर्वाद मिळाल्यावर पुढे काही दिवसांतच श्री.कृष्णा लाड श्रीस्वामी सेवेत वैराग्यमठीत असताना नित्याची सेवा पूर्ण करुन श्रीस्वामी निजल्यावर तो ही विश्रांतीसाठी झोपी गेला. त्यादिवशी अकस्मातून त्याला सुंदर स्वप्न दृष्टांत झाला. त्याचे दृष्टांतामध्ये एक भव्यदिव्य मुक्तिमंडप दिसला. त्यामध्ये मध्यभागी ऊंच सिंहासनावर अक्कलकोट निवासी जगदगुरु - वैराग्याचे मेरुमणी-अजानबाहूरुपी-श्रीनृसिंहभान तथा श्रीस्वामी समर्थ उर्फ 'तात्यासाहेब' बसलेले दिसले. त्यांची तेजस्वी अंगकांती व सुंदर मुखकमल पाहून ते भारावलेलच. श्रीस्वामी समर्थांच्या शेजारीच उजव्या बाजूस त्याचे प्राणप्रिय सदगुरु श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराज पण उभे असून ते श्री. लाड. यांस

आपल्या डोळ्यांच्या खुणांनी श्रीस्वामी समर्थांच्या चरण नमस्कार करण्यासाठी सुचवित होते. असे सुंदर स्वप्न पाहून मोठ्या हर्षभराने श्री. लाड जागे झाले. श्रीस्वामींच्या कृपेने त्यांची बरेच दिवसांची 'तात्यासाहेबांच्या' दर्शनाची ओढ पूर्ण झाली होती.

# 'वडणगे' भ्रमंतीमध्ये चि. रामनाथद्वारा भक्ताला उपदेश

श्रीस्वामींचा एक भक्त श्री. विष्णूपंत याने 'वडणगे' येथे श्रीदेवीच्या मंदिरी पूजा अर्चा करुन महाप्रसाद करण्याचे योजिले होते. त्याचा निर्मळभाव पाहून श्री स्वामी पण आपल्या भक्तांसोबत तिथे जाण्यासाठी तयार झाले. श्री. वासुदेव दळवी पुढे रस्ता सांगत होते. श्रीस्वामींची 'पगी' नांवाची आवडती कुत्रीही पुढे पुढे पळत होती. 'कुसारी' च्यापोटी जन्मलेली 'पगी' पण तिच्याप्रमाणेच भाग्यवान होती. श्रीस्वामींच्या चरणाजवळच ती सदैव बसून असे. श्रीस्वामी सिहांसनी बसताच ती ही त्याखाली निजून राही. श्रीस्वामींसोबतच हिंडे-फिरे, त्यांना प्रदक्षिणा घाली. श्रीस्वामी स्वतः तिला प्रेमाने रोज खाऊ घालत. आताही 'वडणगे' गांवी जाण्यासाठी ती पुढे पुढे पळत होती. ताराबाईचा नातू- श्रीदत्तोबांचा सुपुत्र चि. रामनाथ अवघ्या सहा महिन्यांचा होता. श्रीस्वामींनी स्वतःच त्याला कडेवर

घेतले होते. श्रीस्वामींचा एक भक्त असा होता की, श्रीस्वामी त्याला वारंवार सांगूनही त्याचा अनीतीने वागण्याचा स्वभाग बदलत नव्हता. रस्त्याने चालताना तो श्रीस्वामींच्या बाजूनेच चालत होता. मध्येच चालत असताना श्रीस्वामींच्या खांद्यावरील बालक चि. रामनाथ त्या भक्ताकडे पाहून बोलू लागला की, “स्वामींचे ऐका नाहीतर दुःखी व्हाल. नरकात पडाल बरे.” अवघ्या सहा महिन्याच्या बालकाच्या तोंडून हे ऐकून तो चपापूनच गेला. त्याचे चित्त पूर्णतः पालटले. त्याने त्या क्षणापासून चुकीचा मार्ग सोडण्याचा निश्चयच केला. श्रीस्वामींकडे क्षमा याचना करीत तो, “पुन्हा असे वागणार नाही” म्हणू लागला. इतरांस काहीच प्रकार कळेना. सर्वजन उन्हातान्हातून चालताना पाहून श्रीस्वामींनी सूर्याकडे पहात म्हटले. “अरे बाबा, आमची काही सोय पहा.” त्याचक्षणी रखरखीत ऊन असताना एकदम वातावरण बदलून ढगाळ झाले. सर्वत्र शांत गारवा निर्माण झाला. सगळे ‘वडगणे’ गांवी श्रीदेवीच्या मंदिरी पोहोचले आणि मगच पुन्हाच सुर्यनारायण ढगांआडून तळपू लागले. मंदिरी श्रीस्वामींना सुशोभित आसनावर बसवून त्यांच्या समोरच श्रीदेवीभवानीची यथासांग पूजा संपन्न झाली. आरती करुन नैवेद्य समर्पून श्रीस्वामींना प्रेमाने दोन घास भरविले आणि मगच सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गांवातील अनेकांना श्रीस्वामींच्या दर्शनाचा लाभ घडून आशीर्वाद प्राप्त झाला.

# दादा पंडितांचा अहंकार गेला

कोल्हापूरात श्री. दादा पंडित नांवाचा एक ब्राह्मण नेहमीच श्रीस्वामींची निंदा करीत असे. श्रीस्वामींचे विदेही वागणे त्यांना रुचत नसे. ते ‘वेडा’ म्हणूनच त्यांची टिंगल करीत. एका पुरुषांस लोक साक्षात् ‘देव’ समजून पूजा करतात हे त्याच्या दृष्टीने केवळ मूर्खपणाचे लक्षण होते. तो राजदरबारी सेवा करुन त्याचे बरेच धनही मिळविले होते. पण त्याला मूलबाळ न होताच त्याची बायको मेली. त्याने दुसरा विवाह केला. दुदैवाने त्या दुसर्या बायकोला भूताने झपाटले. पण त्याची श्रीस्वामींवर श्रद्धा नसल्याने तो बायकोला घेऊन वाडी क्षेत्री गेला. तेथे श्रीदत्तप्रभूंची

प्रार्थना करुन सेवा करुन लागला. त्यावेळी त्याच्या बायकोलच्या तोंडून भूत सांगत जाई की, “मला कुंभारगल्लीत न्या, तरच ती सोडेन.” पण श्री. दादा पंडीताची श्रद्धा नसल्याने अहंकरानेच तो वाडीक्षेत्री बायकोसह स्वतःही कष्टातच दिवस काढू लागला. काही दिवसांनी त्याच्या स्वप्नांत दंड कमंडलूधारी श्रीगुरुदेव दत्त येऊन सांगू लागले, “अरे मूर्खा, मीच श्रीकृष्ण सरस्वती स्वामी रुपाने कुंभारगल्लीत नांदत आहे. त्यांची निंद करुन पापामध्ये पडू नकोस. उद्या, सकाळीच येथून निघून त्यांचे पायी पत्नीस घाल. मगच तीची बाधा दूर होईल. शंका धरू नकोस.” हे स्वप्न पाहून तो घाबरून गेला. त्याने बायकोला तिकडे घेऊन जाण्याचा विचार पक्का केला. त्यावेळी त्या बायकोच्या तोंडून ते भूत म्हणे, “कुंभारगल्लीत नेले तरी मी हिला सोडणार नाही.” श्री. दादा पंडीत काळजीत पडला. अखेरीस श्रीदत्तगुरुंच्या आज्ञेने तो कुंभारगल्लीत आला. श्रीस्वामींच्या चरणी श्री. कृष्णा स्वार चरणसेवा करीत बसले होते. त्याचवेळी येऊन श्री. दादा पंडीत श्रीस्वामींच्या पायावर साष्टांग दंडवत करुन मनःपूर्वक माफी मागू लागला. आजपर्यंत केलेल्या निंदा नालस्तीची त्याला मनोमन लाज वाटू लागली. तो गहिवरुन येऊन बायकोला भूतबाधेतून सोडविण्याची विनंती करु लागला. त्यावेळी काहीच न बोलता श्रीस्वामींनी फक्त आपल्या मांडीवरील छाटी मांडीखाली दाबून धरली. त्यासमयी त्याच्या बायकोच्या तोंडून ते भूत म्हणू लागले, “स्वामी, मी या झाडाला सोडून जातो पण, मला मुक्ती द्या.” श्रीस्वामींनी प्रसन्नपणे पहाताच भूत मुक्तीस गेले व त्या बाईची पण बाधेतून सुटका झाली. हा प्रकार पाहून श्री. दादा पंडितांना श्रीस्वामींची कोणत्या भाषेत, कशी-किती स्तुती करावी हेच समजेना. ते आपल्या मनी येईल त्याप्रमाणे निर्मळ चित्ताने त्यांची वेगवेगळी स्तुती करुन आपले समाधान करुन घेऊ लागले.

# स्वामींचे विविध अनुभव

श्रीस्वामींच्या अनेकविध लीला सांगू तितक्या थोड्याच आहेत. रावजी मुदाळकर यांना दुसरा विवाह करवून संतती दिली. श्री. महादेवभट रायबागकर यांचा दुर्धर श्वासविकार नाहीसा करुन त्यांना पूर्ण निरोगी केले. श्री. विशाळगडकर यांच्या आईची सदभक्ती पाहून त्यांच्या गावा सदभक्तांसह जाऊन त्यांना दर्शन आशिर्वाद दिले. श्री.

सोनीकरांना दत्तबीज दाखवून दिले. श्री. बळवंतराव वाशीकरांना आधीच भविष्य सूचित करुन मृत्यूची अटळता सांगितली. भक्ताचा भाव पाहून त्याच्या मातेस आरोग्य दिले. श्री. गंगाधर रायसिंग सहजपणे श्रीस्वामींचे चित्र काढून दाखवेन असे म्हणताच, त्यांचा गर्व नाहीसा केला. नृसिंहवाडीचा एक ब्राहमण पुजारी मध्यरात्री गोढ झोपेत असताना त्याच्या घरी प्रवेश केला. त्यासमयी त्याच्या घराचे दरवाजे बंद असताना, दरवाजाचे कडी कोयंडे आपोआप उघडून श्रीस्वामी आंत आले. द्रविड ब्राहमणांचा विसरलेला वेदपाठ त्यांनी आठवणीत आणून दिला. श्री. शिरोळकर पाटलांच्या विनंतीनुसार त्यांच्या मेहुण्याचे संकट निरसन केले. श्री. दादा पंडितांसारख्या अहंकारी व नित्य निंदा करणा-या व्यक्तिला क्षमा करुन त्याच्या पत्नीची समंधबाधा नाहिशी केली. तेव्हापासून दररोज श्रीस्वामी हेच 'देव' समजून तो पूजा-अर्चा सेवा, भक्ती करु लागला.

# ज्योतिषी महाशय शरण आले.

कोल्हापूरात त्यावेळी एक धनिक व्यक्ती सज्जनतेने व सदभक्तीने राहून प्रपंच कारभार पहात होती. अनेक गांवांची सत्ता-संपत्ती त्याच्याकडे होती. नित्य नियमितपणे देवदर्शन करणे, व्रत-उपवास करणे, गांवात कोणी साधुसंत सत्पुरुष आल्यास त्यांना आपल्या घरी नेऊन सन्मानपूर्वक सत्कार-पूजा करणे हा त्यांचा स्वभावच होता. श्रीस्वामींच्या चरणी पण त्यांची चांगली श्रद्धाभक्ती होती. एकदा गांवात कोणी एक सुप्रसिद्ध ज्योतिषी आले असताना त्यांनी मोठ्या आदराने त्यांस आपल्या घरी नेले. त्यांची सर्व व्यवस्था करुन त्यांचा आदर सत्कार केला. सहजच त्यांच्याशी बोलत बसले असताना कुंभारगल्लीतील श्रीस्वामींचा विषय पुढे आला. त्या धनिक सज्जनाचे त्या ज्योतिष महाशयांस सांगितले, “श्रीकृष्ण सरस्वती स्वामी हे फार महान सत्पुरुष असून मी त्यांचे दर्शनास नेहमी जात असतो. मी त्यांना सदगुरुस्थानीच मानतो. दररोज पाच वेळा त्यांची आरती केली जाते. वेगवेगळ्या प्रांताचे लोक दूर-दुरुन त्यांचे दर्शनास येत असतात अनेकांना त्यांचे दैवी अनुभव मिळाले आहेत. आपणही त्यांच्या दर्शनास मिळून जाऊ या.” त्यांचे हे संभाषण ऐकून ते ज्योतिषी सांगू लागले, “अहो, त्यांची आम्हाला माहिती आहे. पंढरपुरी मी होतो तेव्हाच मला त्यांची माहिती झाली. ते वरवर वेडेपणा धारण करुन स्वतःचे पूज्यत्व लपवितात. जो दृढ भाव ठेवले त्यालाच हाताशी धरतात. मी त्यांना पूर्ण ओळखतो. पण, त्यांची स्थिती रुपयामध्ये एक पैसा इतकीच आहे. तुम्ही त्यांना ‘सदगुरु’ मानता ? बरे असो, तुमची इच्छा आहे तर एकवेळ त्यांच्याकडे जाऊन येऊया.” लगेचच दोघे जण कुंभारगल्लीमध्ये वैराग्यमठीत आले. सिंहासनावर बसलेल्या श्रीस्वामींना ते ज्योतिषीबुवा नमस्कार करु लागले. तेव्हा त्यांचेकडे पहात श्रीस्वामी म्हणाले, “अहो, रुपयामध्ये एक पैशाची काय किमंत ! तरीपण तुम्ही नस्कार करता?” हे खडे बोल ऐकून त्या ज्योतिषीबुवांनी अगदी मनःपूर्वक श्रीस्वामींसमोर दीर्घ दंडवत घालून प्रणाम केला. आपल्या अज्ञानाबद्दल भमायाचना केली. “आपल्या दर्शनाने पावन झालो, आता यापुढेही दास म्हणून अशीच कृपा असू द्यावी.” अशी नम्र प्रार्थना केली. श्रीस्वामींच्या संमतीने मग दोघे मुक्कामी आले. त्यावेळेपासून तर त्या धनिक सज्जन सरदाराव्यक्तीची श्रद्धा अधिकच दृढ होत गेली.

# पुणेकर सरवीरांचे मित्र श्री. खंडेराव सरसुभेदार ही भक्त बनले.

श्रीस्वामींच्या भक्तमंडळीमध्ये लहान थोर सर्वच जन श्रद्धा-भक्तीने एकत्र येत असत. पुणेकर सरवीर हे पण मोठे अधिकारी गृहस्थ भाविकतेने श्रीस्वामींच्या दर्शनास येत असत. त्यांचे एक मित्र श्री. राजाराम खंडेराव हे करवीर राजदरबारी सरसुभेदार म्हणून अधिकारी होते. एकदा नेहमीप्रमाणे ते आपले मित्र श्री. पुणेकर सरवीर यांचे घरी आले. तेव्हा श्री. सरवीर कुंभारगल्लीमध्ये श्रीस्वामींच्या दर्शनासाठी निघाले होते. त्यांनी आपल्या मित्रास त्यांचेविषयी सांगून सोबतच दर्शनास चलण्याचा आग्रह केला तेव्हा श्री. राजाराम खंडेराव यांनी श्रीस्वामींची निंदा करीत आपल्या मित्रासही अशांच्या दर्शनास जाण्याबद्दल नाराजी व्यक्त करीत दोन-चार उपदेशाचे डोस पाजले. पण श्री. सरवीर नाराज न होता उलट अधिकच उत्साहाने आपल्या मित्रास सोबत येण्याचा आग्रह करु लागले. एकवेळ सोबत दर्शनास जाऊन येऊ आणि मग तुम्ही म्हणाल तसे पाहूया, असे म्हणत त्यांनी मित्रास बळजबरीने नेले. दोघेही कुंभारगल्लीतील वैराग्यमठीत पोहोचताच श्रीस्वामींनी धांवतच श्री. राजाराम खंडेराव यांचा हात पकडून मागील दारी असलेल्या शौचकूपाकडे त्यांना नेले. बळजबरीने त्यांना आंत लोटून स्वतःही आंत शिरुन कडी लावून घेतली. सोबतचे श्री.सरवीर हे पाहून घाबरून गेले. आपण उगीचच बळजबरीने त्यांना इकडे आणले असे वाटून ते तळमळू लागले. शंका-कुशंकानी त्यांचे मन चिंताक्रांत झाले. आधीच नास्तिक असलेला आपला मित्र असल्या प्रकाराने रागावून श्रीस्वामींना त्रास तर देणार नाही ना? अशी त्यांना भीती वाटू लागली. तेवढ्यात शौचकूपाचे दार उघडून श्रीस्वामी बाहेर आले व त्यांच्या मागून श्री. राजाराम खंडेराव ही बाहेर पडू लागले. बाहेर येताच श्रीस्वामींच्या चरणी विनम्रतेने नमस्कार करीत. श्री. राजाराम खंडेराव त्यांची क्षमायाचनापूर्वक प्रार्थना करु लागले. हे दृश्य पाहून श्री. सरवीर आश्चर्यचकितच झाले. त्यांचा भाव पाहून श्री. राजाराम खंडेराव म्हणू लागले, “हे स्वामी प्रत्यक्ष देवच आहेत. त्यांनी कोणासही माहीत नसलेली माझी चुकी कबुल करुन घेतली.” श्रीस्वामींच्या चरणावर मस्तक टेकवून ते पश्चाताप व्यक्त करु लागले. श्रीस्वामींची आरती पाहून मगच घरी जाण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखविली. पण आरतीस बराच वेळ असल्याचे श्रीस्वामींची परवानगी घेऊन ते दोघे श्री. सरवीरांकडे परत आले. आपल्या मित्राचे मनःपूर्वक आभार मानीत श्री. राजाराम खंडेराव श्रीस्वामींची स्तुती करु लागले. “आपल्यामुळेच आज मला एक महान सत्पुरुषाचे दर्शन घडले.” असे ते त्यास सांगू लागले. परंतु काही वेळापूर्वी त्यांची निंदा करुन अपशब्द बोलणारी ही व्यक्ती क्षणातच् इतकी पूर्णपणे कशी काय बदलली? याचे श्री. सरवीरांना राहून राहून आश्चर्यच वाटत राहिले. त्यांनी मित्राला परत-परत त्या विषयी विचारतांच त्यांचे उत्तर असे होते की, “मला जो अनुभव आला तो इतरांस सांगणे शक्य होणार नाही. वा-याचा अंगाला स्पर्श होतो पण दाखवता येत नाही. डोळ्याला दिसत नसला तरी वारा असतोच. अनुभव घेणा-यालाच त्याची महती कळते. सत्यता पटते. श्रीस्वामींनी क्षणातच् माझा संशय दूर करुन पूर्ण शांतीचा मार्ग मला दखविला.” त्यानंतर श्री. सरवीर यांच्यासोबत श्री. राजाराम खंडेरावही श्रद्धेने श्रीस्वामींच्या दर्शनास वारंवार येऊ लागले.

# भूतावरही दादाप्रमाणे प्रेम

श्रीस्वामींची शेजारती करुन भक्तगण घरोघरी गेले. वैराग्यमठीत त्यांच्या सेवेत असणारे श्री. लाड दळवी वगैरे सदभक्तही विश्रांती येऊ लागले, अचानक मध्यरात्रीच्या सुमारास श्री स्वामींनी श्री. लाड यांस बोलविले, श्री. लाड तत्परतेने श्रीस्वामीजवळ आले, “ काय आज्ञा आहे?” म्हणून विचारु लागले. श्रीस्वामी म्हणाले, “अरे, त्या चोपदाराच्या घराशेजारील पिंपळावर दादा बसला आहे. त्याला ताबडतोब हाक मारुन ये.” शनिवारी अमावस्येच्या मध्यरात्री काळ्याकुट्ट अंधारामध्ये तिकडे जाण्याची श्री. लाडच्या मनात जरा भीती वाटली. पण प्रथमपासूनच श्रीगुरुंची आज्ञा तंतोतंत पालन करणार्या श्री. लाडने तिथे जाऊन निरोप दिला की, “दादा, तुला श्रीस्वामी हाक मारीत आहेत.” त्या कीSSर्र अंधारातून आवाज आला, “आलो” तो आवाज ऐकून श्री. लाड यांची भीतीने गाळणच उडाली. श्रीस्वामींचे नांव घेत कसा बसा तो परत मठीत येऊन पोहोचला. श्रीस्वामी त्याला विचारु लागले, “अरे भ्यालास काय? तो दादा काही तुझ्याबरोबर दंगा करणार नाही. आता शांत माझ्याजवळ बैस. कोणताही विचार करु नकोस.” त्या दोघांचे चाललेले संभाषण ऐकून शेजारीच निजलेले श्री. दळवी उठून बसले व श्री. लाडना काय झाले? म्हणून विचारु लागले. त्यांचे वृत्त ऐकताच धीर देऊन श्री. दळवी सांगू लागले. “अरे, श्रीस्वामींची सत्ता तुला माहिती नाही काय? कशाला घाबरतोस इतके ” असे बोलत ते स्वतःचे काही अनुभव त्याला ऐकवू लागले.

# भावार्थ रामायणातील तारकमंत्र दाखविला

फक्त डाळ खाऊन तीन वर्षे, त्यानंतर फक्त वृक्षांची पाने खाऊन तीन वर्षे, त्यानंतर भिक्षान्नावर राहून सेवा करण्याची श्री. दळवी यांस श्रीस्वामींनी आज्ञा केली होती. त्यांच्या वचनाप्रमाणेच वागून तो ही नित्यसेवत रंगून गेला होता. एकदा संत एकनाथरचित भावार्थ रामायण वाचन करीत असताना त्यांच्या मनात 'श्रीराम जयराम जय जय राम' असा त्रयोदशाक्षरी मंत्र या ग्रंथात कुठेच दिसत नाही अशी तळमळ वाटू लागली. त्यावेळेस श्रीस्वामींनी त्या ग्रंथाची पाने स्वतः पालटून जटायू मरणाच्या कथेचे पान काढून ठराविक ओव्यांवर बोट ठेवले. त्यामध्ये अंती ते पक्षी "श्रीराम जय राम जय जय राम" असे म्हणत मुक्तीस गेल्याचे वर्णन होते. हा मुक्तीदायक मंत्र त्या ग्रंथात पाहून त्याच्या मनातील भाव शांत झाले. श्रीस्वामींच्या अशा कितीतरी अदभूतलीला आठवून तो सांगू लागला, "अरे, लक्षतीर्थातील बुडून मरतानाही गोष्ट तू विसरलास काय? श्रीस्वामीनीच तुला मरणातुम बाहेर काढले नव्हते काय? मग आज या भुताला काय भीतोस। अरे आजपर्यंत तूच मला धीर देऊन यांच्या भक्तीत रमविलेस तुला, मी काय सांगू? आपण खरोखरच मोठे भाग्यवान म्हणून असे समर्थ सदगुरु आपणास लाभले. आपण कृतार्थ झालो." श्री दळवींचे हे बोलणे ऐकून श्री.लाडांचे मन पण अगदी शांत होऊन गेले.

# चित्रकार विष्णुपंतांचा सांभाळ

श्री. विष्णूपंत नांवाचा एक कोकणस्थ ब्राहमण दररोज श्री स्वामींच्या दर्शनास येई. करवीर छत्रपतींच्याराजदरबारी तो एक कुशल चित्रकार म्हणून काम करीत असे. श्रीस्वामींचे नित्य दर्शन घेऊन स्नानसंध्यादी नित्यकर्म न चुकता करुन तो दरबारी कामावर जात असे. एकदा 'चिंचणी' येथील श्रीदेवीच्या मायाक्का यात्रेचे चित्र काढण्याकरिता राजांनी त्यांना आज्ञा दिली. पण ऐन वेळी त्यांच्या हाताला कंप सुटून मनासारखे चित्र काढले गेले नाही. राजांनी नाराजीने त्यांना कामावरुन कमी केले. तेव्हा दुःखाने श्रीस्वामींच्या पायी प्रार्थना करीत तो रडू लागला. "पत्नी व पांच मुले यांचे रक्षण आता तुम्हीच करावे." अशी करुणा भाकू लागला. श्रीस्वामी प्रसन्नतेने म्हणाले, "चिंता करु नकोस. तुला आम्ही मूठभर तांदूळ दिले आहेत. जुने वस्त्र टाकून दे. आम्ही तुला नविन देऊ." त्याचा भावार्थ जाणून तो शांत झाला. श्रीस्वामीकृपेने त्यास दुसरी नोकरी मिळाली. पोटापुरते अन्न धान्य मिळू लागले. हळू हळू धनसंचयही होत गेली. त्यास पुढे स्वतःचे घर बांधण्याच इच्छा झाली. श्रीस्वामींच्या आज्ञेप्रमाणे मध्यवस्तीपासून थोड्या आडबाजूस जागा घेऊन घर बांधले. काही दिवस आनंदात गेले. काही तो काळाने त्या भागात चोरांचा धूमाकूळ सुरु झाला. घरफोडीचे प्रमाण वाढले. तो घाबरुन स्वामींकडे येताच ते म्हणाले, "आमचे आम्ही पाहून घेऊ, घाबरु नकोस." त्यामुळे निश्चिंतपणे तो राहू लागला. दर्शन समयी एकदा श्रीस्वामी त्यास म्हणाले. "आज आम्ही तुमचे घरी रात्री येऊ," त्याला समाधान वाटले. रात्री वाट बघून तो झोपला आणि चोरांच्या गोंधळामुळे त्याला जाग आली. तो घाबरला असतानाच पुढून चार-पाच पोलीस वर्दीवाले 'चोर-चोर, पकडा, पकडा' असे म्हणत तेथे आले. चोर पळून गेले. तो दरवाजा उघडून बाहेर पाहू लागताच ते वर्दीवाले शिपाई पण दिसेनात. मग त्याला श्रीस्वामींच्या शब्दाचा अर्थ लक्षात आला. अशा प्रकारे श्रीस्वामींनीच येऊन त्या रात्री त्यांचे रक्षण केले होते. सकाळीच उठून तो मठीत जाताच श्रीस्वामी त्यास म्हणाले, "घरी सर्व कुशल आहे नां रे?" त्यांचा आशय ओळखून तो चरणी मनोभावे वंदन करीत कृतज्ञता प्रगट करु लागला. "श्रीस्वामी केवळ आपल्या कृपेनेच आम्ही कुशल आहोत. अशीच कृपा राहू द्यावी."

# भक्ताला जागे ठेवून मूठ परतवली

असाच एक साधासुदा नापित काम करुन पोट भरणारा भक्त श्रीस्वामींच्या दर्शनासाठी नेहमी येई. त्याला वैद्यकशास्त्रही थोडे अवगत होते. तो दर्शनास आल्यावर श्रीस्वामी प्रेमाने त्याला आपल्या हाताची नाडी बघण्यास सांगत. त्याच्याशी दोन-चार गोष्टी बोलून त्याला समाधान देत. एकदा तो दर्शनासाठी आल्यावर परत जाताना श्रीस्वामी त्याला म्हणाले, “आज रात्री तू झोपू नकोस” त्याप्रमाणे श्रीस्वामींचे चिंतन करीत तो जागत बसला होता. मध्यरात्री अचानक ‘घों घों’ असा ध्वनी ऐकून त्याने बाहेर पाहीले. तेव्हा एक सूया टोचलेला लिंबू येऊन पडल्याचे दिसले. त्याने श्रीस्वामींच्या नामस्मरणामध्ये रात्र पूर्ण करुन सकाळी उजाडताच तो मठीत आला. श्रीस्वामींचे दर्शन घेत त्यांच्याजवळ आपली भावना व्यक्त करीत तो इतरांस सांगू लागला, “काल रात्री केवळ श्रीस्वामींच्यामुळेच मी वाचलो. माझ्या वै-याने माझा प्राण घेण्यासाठी मूठ मारील होती. पण श्रीस्वामींनी ती रोकली. त्यामुळेच मी आज जिवंत असून येथे दर्शनासाठी आलो आहे.”

# भक्तीची थोरवी पटविली

श्री. हरिपंत शिदनेर्लीकर हे स्वामींचे जुने भक्त होते. त्यांनी श्रीस्वामींना घरी भोजनासाठी येण्याची विनंती केली. तेव्हा श्रीस्वामी म्हणाले, “निर्मळ दिसतांच अवश्य येऊ” त्याला वाटले जरुर येतील. त्यांने ब-याच लोकांना सांगून मोठा थाटाचा बेत तयार केला. पण वेळ झाली तरी श्रीस्वामींच्या पत्ता नाही. त्याच दरम्यान दररोजच्या नियमाप्रमाणे श्री. वासुदेव दळवी आपली भिक्षा घेऊन मठीत आले. श्रीस्वामी त्यांच्याकडे धांवत जाऊन म्हणू लागले. “मला फार भूक लागली. लवकर खायला दे रे. ” श्री दळवींनी आपल्या भिक्षेतले जेवण श्रीस्वामींना भरवायला सुरुवात केली. घरी वाट पाहून थकलेले. श्री. हरिपंत शिदनेर्लीकर त्यासमयी मठीत येऊन पहातात तर श्रीस्वामी श्री. दळवींची भिक्षा प्रेमाने ग्रहण करीत आहेत. त्यांने श्रीस्वामींना घरी चलण्याची विनंती करताच ते म्हणाले, “आमचे पोट या वासूने भरले. आता तुम्हीच घरी जाऊन जेवा.” इतकी तयारी करुनही श्रीस्वामी येत नसल्याने सर्वच वाया गेले असे विचार त्यांच्या मनांत येताच श्रीस्वामी म्हणाले, “तुम्ही सोवळ्याच्या ब्राह्मणासा बोलवा आम्हाला या शुद्र भक्तांनी भ्रष्ट केले आहे. हे भक्त काही बरे नाहीत” श्रीस्वामींच्या मुखातील हे बोलणे ऐकताच श्री. हरिपंत शिदनेर्लीकर मनोमन ओशाळले. त्यांनी श्री. लाड व श्री. दळवी यांना घरी भोजनास चलावे, म्हणून विनंती केली. दोघानीही ती अमान्य केली. मग मात्र श्री. हरिपंतांचे डोळे चांगलेच उघडले. कारण, श्री. कृष्णा लाड व श्री. वासुदेव दळवी हे शुद्र असून भगवे वस्त्र नेसून ढोंग करीत आहेत, असाच इतके दिवस त्यांच्या संभ्रम होता. आता मात्र त्यांची योग्यता त्यांना समजली. त्या दिवसापासून कोणत्याही भक्ताचा द्वेष-मत्सर न करता ते सर्वांशी प्रेमाने-आदराने वागू लागले. श्रीस्वामी महाराज असे भक्तभिमानी व चुकलेल्यास सन्मार्गावर आणणारे होते.

# वेणीमाधवाचे बोल खरे केले

वैराग्यमठीत एक जन पेढे वाटण्यासाठी श्रीस्वामींकडे आला. दर्शन घेऊन आनंदाने पेढे वाटत तो सांगू लागला. "गेली बारा वर्षे मला मूलबाळ नव्हते. अनेक देवधर्म-उपाय केले. मधून मधून येथेही दर्शनास येऊन जात असे. एकदा श्रीस्वामी म्हणाले, 'दैवभोग भोगून संपविला पाहिजे. व्यर्थ कष्ट करु नये.' पुढे बायकोच्या इच्छेनुसार एकदा कुलस्वामी केदारलिंग श्रीज्योतिबा देवांच्या दर्शनाश गेलो होता. तेथील गुरवाने चौकशी करुन सांगितले की, 'दुःखी होऊ नका. येथे वेणीमाधव आहेत. तिकडे जाऊया.' त्याच्यासोबत श्रीवेणीमाधवांकडे गेलो. त्यांनी सांगितले, 'तुम्हाला जरुर अपत्य होईल. माझे गुरु श्रीकृष्ण सरस्वती स्वामी यांचेकडे कुंभारगल्लीत तुम्ही जा. बिलकुल शंका धरु नसका. तुम्हांस सुंदर सदगुणी मुलगा होईल.' त्यांचे शब्दू ऐकून परत कुंभारगल्लीत येताच दर्शन घेताना श्रीस्वामी म्हणाले, 'त्याने दिले ते आम्ही दिले.' बरे झाले म्हणत त्यांनी प्रसन्नतेने आशिर्वाद दिला. ते ऐकून आम्ही सुखावलो. वर्षभरातच आम्हास सुपुत्रलाभ झाला त्याचेच हे पेढे मी वाटत आहे." श्रीस्वामींनी आपल्या सदशिष्याचे श्रीवेणीमाधवाचे शब्द खरे करुन दैवीभोगही टाळला. असे आहे भक्तजनवत्सल -भक्ताभिमानी श्रीस्वामी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे अदभूत अतर्क्य लीला चरित्र आता ऐकूया परमभक्त येसूबाईची कथा

# आळत्याच्या येसूबाईंना 'ब्रम्हचारी' सदगुरु मिळाला.

कोल्हापूरजवळच्या 'आळते' गांवी येसूबाई रहात होती. लग्नांनतर काही कळातच पतीचे निधन झाल्यामुळे बेचैन झालेल्या येसूबाईला मातापित्यानी परत आपल्या घरीच आणून ठेवले. आता येसूबाई भगवत्चिंतन करीत. कथाकिर्तने ऐकण्यात वेळेचा सदुपयोग करीत. प्रत्येक ठिकाणी श्रीसदगुरुची महती ऐकू येई. आपणांसही सुयोग्य सदगुरु मिळावा, हीच ओढ तिलाही लागली. एखदा एक पांथस्थ त्यांचे घरी आला. त्याची आदाराने येसूबाईने चौकशी केली. तो म्हणाला, "मी पंढरपूरचा. घरी बायको व मुले आहेत. दर पौर्णिमेस मी औदुंबरची वारी करतो." भोजनाची तयारी करुन येसूबाईने त्यांस स्नान करुन येताच पोटभर जेऊ घातले. भोजनानंतर बोलताना त्याने येसूबाईला "कोणाती काळजी आहे?" असे विचारले तिन आपणास सुयोग्य सदगुरु मिळावा, हीच तळमळ सांगितली. विशेषतः तिची इच्छा गृहस्थाश्रमी किंवा संन्याशी गुरु नसावा, 'ब्रह्मचारी गुरुच मिळावा,' अशी तळमळ असल्याचे सांगितले कार्तिकमासामध्ये पत्रिका पाठवू. तेव्हाच सदगुरुही मिळेल.'' येसूबाई आनंदात वेळेची वाट पाहू लागल्या. त्या दरम्यान पित्याचे काही कामासाठी कोल्हापूरला जाणे होते. बरेच दिवस तेथे रहावे लागत होते. म्हणून त्यांनी येसूबाईसही सोबतच नेले. आपल्या बंधुकडे उतरुन ते काम करुन लागले. त्या मुक्कामाच्या ठिकाणचे लोक कुंभारगल्लीतल्या सत्पुरुषाच्या दर्शनासाठी निघालेत म्हणून येसूबाईपण त्यांच्यासोबत तिथे गेल्या त्यांच्या लक्षातही नव्हते तो कार्तिक मासातील सोमवारचाच दिवस होता. मठीत जाऊन सर्वां सोबतच येसूबाई श्रीस्वामींचे दर्शन घेऊ लागल्या. श्रीस्वामी तिला म्हणू लागले, "तुला ब्रह्मचारी गुरु पाहिजे नां, मग घे तर आपली इच्छा पुरवून" हे वाक्य ऐकताच येसूबाई चकितच झाल्या. त्यांनी मनोमन श्रीस्वामींनाच 'सदगुरु' मानले.

# पैलवानाचे गर्वहरण व महामारीला आळा

एकदा सदभक्त ताराबाईंनी श्रीस्वामींना पंढरपुरी नेण्याची इच्छा दर्शविली. श्रीस्वामींनी अनुकूलता दर्शविताच सोबत इतर भक्त येऊन ताराबाई श्रीस्वामींना पंढरपुरी घेऊन निघाल्या. बरोबर घोड्याचा एक टांगा असूनही श्रीस्वामींनी प्रेमाने सदभक्त श्री. कृष्णा लाड यांच्या खांद्यावर बसून जाणेच पसंत केले. त्यावेळी सोबतच्या एका पैलवानाने गर्वाने, मी स्वामींना घेतो म्हटले. परंतु आश्चर्य म्हणजे त्या बलदंड पैलवानास श्रीस्वामींना उचलून नेणे अशक्य झाले. तो चक्क घामाघूम झाला. त्याने नाईलाजाने त्यांना खाली उतरवून त्यांचे पाय धरले व क्षमा मागितली. मग परत आनंदात ते श्री. लाडच्या खांद्यावर बसून पुढे चालले. मधूनच श्रीस्वामी 'गुरदेव दत्त'म्हणत असत. भक्तमंडळी नामघोष करीत अभंग गात सोबत चालली होती. पंढरपूरच्या जवळच एका गांवी पोहोचले तो तिथे महामारीची साथ पसरलेली, अनेक ग्रामस्थ मृत्युमुखी पडलेले. तेथील शोकाकुल वातावरण पाहून ताराबाई घाबरली. तिने प्रार्थना करताच श्रीस्वामी म्हणाले, "भिऊ नकोस. त्या रांडेस मी आधीच आळा घालतो." श्रीस्वामींनी एक लोखंडी मोळा तेथील भुमीत मारला. त्याच क्षणापासून तेथील महामारी बंद झाली. दोन-चार दिवस तिथेच काढून पुढे सर्वजन श्रीक्षेत्र पंढरीस येऊन पोहोचले.

# स्वामीची पंढरपूर, तुळजापूर व अक्कलकोट भेट

चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये एक मंडप घालून भजन किर्तनाचा आनंद लुटीत श्रीस्वामींसह सर्वजन पंढरीक्षेत्री पंधरा दिवस तेथे थांबले. अखेरीस श्रीस्वामीपण भक्तांसोबत पंढरीनाथाच्या राऊळी आले. गाभा-यात येऊन श्रीविठूरायाकडे पहात त्यांच्या मस्तकावरील पगडी काढून स्वतःच्या मस्तकी घातली. मग परत श्रीविठूरायाला घातली व पुनःश्च स्वतःला घातली. असे तीन वेळा केले. मंदिराच्या गाभा-यातील बडवे पुजारी श्रीस्वामींच्या मुखावरील तेज पाहून काहीच न बोलता तसेच सटस्थपणे पहात राहिले. "हा कोणीतरी थोर सत्पुरुष असावा. त्याच्या कृतीमध्ये अडसर करुन उगाचच ईश्वराचा कोप ओढवून घेऊ नये." अशीच तेथील आजूबाजूच्यांची बुध्दी होऊन सर्वजण शांतपणेच श्रीस्वामींची ही लीला पहात उभे राहिले. तेथून श्रीस्वामी जाऊ लागताच काहीनी साक्षात पंढरीनाथ विठूराया व स्वामी एकच समजून श्रद्धेने दर्शन घेतले. तेथून निघून श्रीक्षेत्र तुळजापुरी सर्व आले. श्री तुळजाभवानी मातेस भेटून श्रीस्वामी पुढे अक्कलकोट क्षेत्री आले. तेथे श्रीस्वामींनी आपले सदगुरु 'श्रीस्वामी समर्थ उर्फ तात्यासाहेब' यांच्या समाधीस्थानी सर्वांना नेले. तेथे जाताच श्री. कृष्णा लाड यांच्या मनात, 'हेच आपल्या सदगुरुंचे सदगुरु असावेत का?' अशी शंका निर्माण झाली. त्याच क्षणी त्यांना मूर्च्छा येवून त्यांचे कानी शब्द आले. "अरे पूर्वी दृष्टांतामध्ये दर्शन घेऊनही तुझी शंका मिटली नाही का? अजूनही हो द्वाडपणा सोडून दे. आम्हा गुरुशिष्याची विष्ठा तुझ्या देहाला लागली आहे बघं." शब्द ऐकून थोड्या वेळात शुद्धीवर येऊन श्री. लाड पाहू लागताच त्यांच्या शरीरास खरेच विष्ठेचा घाण दिसून आली. सर्वजन सत्य घटना सांगितली. सर्वांनीच श्रीस्वामीसमर्थांच्या समाधीचे व पूज्य श्री स्वामींच्या चरणांचे मनोभावे दर्शन घेतले. दोन महिन्यांची अशी यात्रा पूर्ण करुन श्रीस्वामींसमवेत भक्तजन कोल्हापूरी कुंभारगल्लीमध्ये वैराग्यमठीत येऊन पोहोचले.

# व्यासशास्त्रींना आळंदीतून आज्ञा.

कोल्हापूरात त्यावेळी श्री. व्यासशास्त्रींची सर्वत्र प्रसिध्दी होती. वेदवेदांत-धर्मशात्र पारंगत श्री. व्यासशास्त्रींचा सुपुत्रही त्यांचेप्रमाणेच बुध्दीमान चतुर पंडित बनला. वेदांताचा सुंदर अभ्यास करुन तो विद्वान बनला. त्याचे पांडित्य, वादविवाद प्रसंगीची प्रखर बुध्दीमत्ता सर्वांच्या कौतुकाचा विषय बनली. या तरुण श्री. व्यासशास्त्रींच्या सुपुत्राचे नांव होते. वेदशास्त्रसंपन्न श्री. गोविंद दत्ता व्यास. पूर्वभाग्यानेच या श्री. गोविंदशास्त्रींना हे पुस्तकी ज्ञान शांती देईना. वेदांत तत्त्वाचा खरा साक्षात्कार व्हावा, अनुभव मिळावा ही त्यांची तळमळ होती. त्यामुळेच एके दिनी त्यांचे वैराग्यमठीत श्री स्वामींच्या चरणी येणे घडले. बरेच दिवस वेदान्त-पुराण सांगूनही स्वतःच्या मनास खरी शांती नसल्याने श्री. गोविंदशास्त्री मनोमन तळमळत असत. एकदा एक निष्ठावंत वारकरी त्यांचे घरी आले. त्यांच्यासोबत बोलताना त्यांनी सांगितले, “आळंदी क्षेत्री श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी गेल्यानेच मला शांती मिळाली. ते अद्यापिही मार्गदर्शन करुन साधकाम सुयोग्य-सुगमपंथाने निश्चितच आत्मसाक्षात्कार करुन देऊ शकतात. मला त्यांची कृपा अनुभवास आली आहे.” हे ऐकून श्री. गोविंद शास्त्रींचा विश्वास बसेना, “श्रीज्ञानेश्वर माऊली समाधिस्त होऊन इतकी वर्षे झाली तर त्यांचे मार्गदर्शन केसे होईल?” हाच त्यांना प्रश्न पडला. त्याकरिता कोणा सत्पुरुषांस विचारावे असे त्यांच्या मनात असताना त्यांना कुंभारगल्लीतल्या श्रीस्वामींची आठवण झाली. त्यांचेविषयी ते बरेच दिवसांपासून ऐकून होते. श्री. गोविंदशास्त्री मोठ्या आतुरतेने वैराग्यमठीत आले. श्रीस्वामींचे चरणी वंदन करु लागताच श्रीस्वामी म्हणाले. “आळंदीला जा. तेथे न्याय-निवाडा होईल” आपल्या मनांतील प्रश्न विचारण्यापूर्वीच उत्तर मिळालेले पाहून श्री. गोविंदशास्त्री आळंदीस गेले, तेथे नित्यनियमाने इंद्रायणीचे स्नान, संध्या, पूजा-अर्चा, अजानवृक्षाखाली बसून श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरीचे वाचन कुन व्रतस्थपणे एकवेळ सायंकाळी माधुकरीचे भिक्षान्न सेवन

करुन राहीले. बरेच दिवस त्यांचा हा नियम चालू होता. नविनच कोणी एक साधक त्यांची दिनचर्या पाहून त्यांना 'श्रीज्ञानेश्वर माऊलीची कृपा कशी होईल' म्हणून विचारु लागला. त्यांनी आपण जे ऐकले ते सांगून त्याचे समाधान केले. त्यांच्या सांगण्याप्रमाणेच त्याही साधकाने मनःपूर्वक श्रीमाऊलींना शरण जाऊन ध्यानचिंतनसुरु केले. थोड्याच अवधीत त्यांस श्रीमाऊलींचा स्वप्न दृष्टांत होऊन दर्शन-आशिर्वाद लाभले. तो साधक आनंदून गेला. श्री. गोविंदशास्त्रींना पुनःपुन्हा नमस्कार करुन तो सांगू लागला, "आपण सांगितल्याप्रमाणेच वागल्यामुळे मला श्रीमाऊलींची कृपा झाली." श्री. गोविंदशास्त्री चकितच होऊन विचार करुन लागले. माझ्या सांगण्यानुसार वागून याच्यावर कृपा झाली पण मला अद्यापि कोणताच अनुभव कसा नाही.? त्यांचे चित्त तळमळू लागले. मनांतील खोटा वेदान्त, निर्गुण, निराकाराचा अहंकारी विचार गळून पडला. सगुण रुपाची ओढ लागून संत श्रेष्ठांची संगती-महती त्यांना आकर्षित करु लागली. त्यांची साधना योग्य होताच त्यांचे आचरण बदलून शत्रू-मित्र, लहान-थोर, भेद गळून पडू लागले. त्यांना असा अनुभव झाला की, पूर्वी त्यांना माऊलींजवळ जाऊ देण्यास प्रतिबंध करणारा सेवक स्वतःच त्यांना प्रेमाने श्रीमाऊलींच्या समाधीपाशी जाण्याचा आग्रह करु लागला. त्यांची प्रेमाने श्रीमाऊलींच्या समाधीपाशी जाण्याचा आग्रह करु लागला. त्यांची वृत्ती एकदमच पालटून गेली. त्याचवेळी रात्री त्यांना सुंदर स्वप्नदृष्टांत झाला. श्रीमाऊली त्यांच्या स्वप्नामध्ये येऊन सांगू लागले, "अरे कुंभारगल्लीतील सत्पुरुषांनाच शरण जा. ते साक्षात् हनुमंताचे अंश आहेत. येथील वात्सव्य आता पुरे झाले. कोल्हापूर जा." श्रीसंतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींकडून अशा प्रकारे समक्ष न्याय-निवाडा ऐकून श्री. गोविंदशास्त्रींचे पूर्ण समाधान झाले. श्रीमाऊलींच्या समाधीस मनोभावे दंडवत करुन ते कोल्हापूरी परतले. कुंभारगल्लीतल्या वैराग्यमठीकडे त्यांची पाऊली फार त्वरेने पडली. समोरच श्रीस्वामी त्यांच्याकडे पहात दर्शन घेण्यापूर्वीच बोलू लागले, "आळंदीहून आत्ताच आलात वाटते. भेटली मग श्रीज्ञानेश्वर माऊली. त्यांनीच इकडे पाठविले होय. बरे तर, मग बसा इथे. तुमचे काम होऊन जाईल." श्री. गोविंदशास्त्रींनी अगदी मनापासून श्रीस्वामींचे पाय पकडले. डोळ्यातील अश्रूंनीच त्या पायावर अभिषेक केला. श्रीस्वामीही प्रसन्न झाले. थाटाने मांडलेल्या पाटावर बसवून श्रीस्वामींनी स्वहस्तेच त्यांना प्रसादाचे घास भरविले. श्रीमाऊलींची कृपा आहे. म्हणूनच हा अनुभव आल्याचे श्री गोविंदशास्त्रींना समजले. श्रीस्वामींनी त्यांना आपल्या मठीतच ठेवून घेतले. श्री.गोविंदशास्त्रींनी पण इतर व्याप सोडून फक्त श्रीसदगुरु श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराजांची एकमेव सेवा हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून जीवनक्रम सुरु ठेवला.

# ध्यानातील रुपाप्रमाणेच कौपिनधारी स्वामी

श्रीस्वामी सेवेत परमभाग्याने रमलेला श्री.कृष्णा लाड यांस श्रीस्वामींच्या सहवासामध्ये नित्यच अनेकानेक प्रचीती येत असे. एकदा मनात कुविचारांचे जाळे पसरले असता त्यांच्याकडून रोज होणारी सेवा श्रीस्वामींनी चार दिवस बंद ठेवावयास सांगितली. त्यामुळे पश्चातापाने शुद्ध होऊन त्यांचे कुविचार नष्ट झाले. संसारीक मोहपाश, आशा, आकांक्षा त्यांनी केव्हाच सोडून दिल्या होत्या. केवळ एक मात्र श्रीस्वामी गुरुरायांची दिवसरात्र सेवा, संगती हेच त्यांचे जीवन बनून गेले होते. दररोज ते ध्यानाला बसत असत, एके दिवशी ध्यानामध्ये त्यांना आपल्या श्रीकृष्णगुरुंचे फक्त एक नूतन कौपिन परिधान करुन बसलेले दर्शन घडले. ध्यानविसर्जन करुन जेव्हा ते समक्षच श्रीस्वामींच्याकडे आले तेव्हाखरोखरीच अगदी ध्यानातील दृश्याप्रमाणेच श्रीस्वामी फक्त नविन लंगोटी नेसूनच हसत बसलेले त्यांनी पाहिले. श्रीस्वामींच्या अशा कितीतरी प्रेमळ लीला त्यांना नेहमीच अनुभवास येत असत.

# यवन फकिरांकडून श्रीफळ प्रसाद मागविला

'बेडग' गांवी एक जोशी नावाचे सदगृहस्थ सुखाने संसार करीत होते. पत्नी व दोन लहान मुलांसह त्यांचे उत्तम चालू होते. गांवामध्ये त्यांची लोकप्रियताही होती. अचानक दैवयोगाने पत्नी मरण पावली. श्री. जोशी आपल्या दोन लहान मुलांकडे पाहून अत्यंत दुःखी झाले. सर्व लोकांचा आग्रह पडला की, त्यांनी दुसरे लग्न करावे. घरात सुबत्ता होती. त्यामुळे श्री. जोशींनी सर्वानुमते निर्णय घेऊन दुसरा विवाह केला. कोल्हापुरातील श्री. विष्णूपंत यांची बहिण लक्ष्मीबाई त्यांची पत्नी होऊन 'बेडग' गांवा आली. परंतु गांवात तिचे मन रमेना, तेन्हा श्री जोशींनी कोल्हापूरातच काम करुन रहाण्याचे ठरविले. ते कोल्हापूरी येताच श्री विष्णुपंतांनी त्यांना कुंभारगल्लीतल्या श्री स्वामींच्या दर्शनासाठी नेले. श्री. विष्णुपंत आणि त्यांचे घरातील कुटुंबीय पूर्वीपासून श्रीस्वामींचे भक्त होते. सौ. लक्ष्मीबाई व त्यांच्या बालविधवा भगिनी अन्नपूर्णाबाई दोघीही श्रध्देने श्रीस्वामींच्या दर्शनासाठी नेहमीच येत असत. एकदा त्या दोघा दर्शनास आल्यावर श्रीस्वामी सौ. लक्ष्मीबाईंस आशिर्वाद देत म्हणाले, "आम्ही तुला एक कन्या देऊ व सांभाळ करु." सौ. लक्ष्मीबाईंना वाटले आधीच पतीची दोन मुले असताना नविन कन्या झाल्यावर सावत्रपणामुळे भांडणे लागतील, तेव्हा ती म्हणाली, "स्वामी, तुम्ही सर्व जाणता, मग मी न मागताच मला मुलगी कशाला देता?"

तेव्हा हसून श्रीस्वामी म्हणाले, “आम्ही दिले ते दिले. काळजी करु नकोस.” दोघा दर्शन करुन घरी परतल्या मध्यरात्री सौ. लक्ष्मीबाईंच्या स्वप्नामध्ये चार तरुण यवन फकीर आले व म्हणू लागले, “बेटी, यहॉ परसाद ले लो । तुझे बेटी होंगी । हमे दो आना देना । हम फिर चलेंगे ।” हाता दिवा घेऊन आलेले पांढर्या शुभ्र वस्त्रातील ते फकीर असे म्हणताना पहातच ती जागी झाली. घाबरून ते स्वप्न तिने बंधु श्री. विष्णूपंताचे कानी घातले. त्यांनी सांगितले, “घाबरु नकोस, श्रीस्वामींना याबाबत विचारु या.” दुसर्या दिवशी सर्वजण कामावर गेले असताना दुपारीच्या वेळी स्वप्नातल्या प्रमाणेच चार फकीर दारी येऊन तसेच म्हणू लागले, तेव्हा तिने भगिनी अन्नपूर्णाबाईस सांगितले, त्यावर त्या दोघींनी विचार करुन त्या फकीरांना सांगितले, “बाबानो, आम्हांस काही नको, तुमचा प्रसादही राहू द्या.” ते फकीर “तुम्हारी मर्जी” असे म्हणत निघून गेले. सायंकाळी श्री. विष्णूपंतास हे सर्व ऐकून वाईट वाटले. अवधूतरुपाने महात्मे फिरत असतात. त्यांनी स्वप्नांत दर्शन दिले व समक्षही आले तरी त्यांचा प्रसाद घेतला नाही. हे बरोबर नाही असे त्यांना वाटले. सर्वजन मिळून श्रीस्वामींच्या मठीत आले. श्री विष्णूपंत सर्व वृत्तांत श्रीस्वामींच्या पायी बसून सांगू लागले. ते ऐकून घेऊन श्रीस्वामी म्हणाले, “दो वक्त खाली गया । फिर भी अभी लायेंगे उनकू इधर । फिकीर मत करना।” तंतोतंत फकीराप्रमाणेच हिंदी भाषेत बोलत ते हसू लागताच खरोखरीच ते स्वप्नातील चार फकीर मठीत स्वामींच्या जवळ येऊन तो प्रसादाचा नाराळ ठेवून नमस्कार करुन निघून गेले. तो नारळ स्वतःच्या हाताने सौ. लक्ष्मीबाईंच्या ओट्यात घालत श्रीस्वामींनी आशिर्वाद दिला. त्यानुसार त्यांना सुंदर कन्यारत्न प्राप्त झाले. तिचे नांव ‘मुक्ता’ ठेवून तिला श्रीस्वामी चरणी आणताच, त्यांनी तिचे मुके घेत, प्रेमाने खेळविले.

# अन्नपूर्णाबाईंकडून मेघडंबरी व विष्णुपंताचे मागे अवधूत रुपे

श्रीस्वामी कृपेने सौ. लक्ष्मीबाईंचा संसार सुरळीत पार पडला. त्यांची भगिनी बालपणीच वैधव्य पत्करुन घरी परत आली. श्री. विष्णूपंतांनी तिचा सांभाळ केला. तिनेही प्रभूभजनात व श्री. स्वामी सेवेतच आयुष्य वेचले. त्या भगीनी अन्नपूर्णाबाईंच्या स्वप्नात येवून श्रीस्वामींनी सांगितले, “सुंदर मेघडंबरी बांधून दे” त्यानुसार तिने सुंदर मेघडंबरीसह पाषाणाचे सिंहासन बांधून दिले. श्रीस्वामी नेहमी त्यावर मजेने बसून पूजा आरती स्विकारत असत. श्री. विष्णूपंत राजदरबारी कामास होते. त्यांना एकदा आदेशानुसार दुस-या गांवी जाऊन राहणे क्रमप्राप्त झाले. ते नाराजीने दर्शनास येताच श्रीस्वामी म्हणाले, “परत आणू, चिंता नको.” मनास धीर देवून ते कामाच्या गांवी रूजू झाले. तिथेही नित्य श्रीस्वामींची पूजा आरती करुनच ते कामकाज पाहून. संसार तिथेही नित्य श्रीस्वामींची पूजा-आरती चालू असताना एक रुद्राक्ष भस्मधारी अवधूत येऊन त्यांचे मागे उभा असलेला शेजारच्या व्यक्तीने पाहिले.

आरतीनंतर तो अवधूत निघून जाताना त्या व्यक्तीने त्यांची चौकशी करताच तो अवधूत म्हणाला, “याची प्रेम-भक्तीपूर्ण पूजाआरती मला आवडते. त्याकरिताच मी येत असतो, मी कोल्हापुरी असतो.” असे बोलत तो अवधूत निघून गेला. श्री विष्णूपंताना त्या शेजारच्या व्यक्तीने विचारताच त्यांना आश्चर्य वाटले. कारण, त्यांना तो अवधूत दिसला नव्हता. तरीपण तो अवधूत म्हणजे आपले प्राणप्रिय स्वामीच होते. हे जाणून ते आनंदून गेले. पुढे श्रीस्वामींची त्यांना फारच तीव्र ओढ लागू लागली. त्याचवेळी राजदराबारातून त्यांना कोल्हापूरी कामावर येण्याचा आदेश मिळाला. ते मोठ्या हर्षाने परत कोल्हापूर येऊन प्रथम श्रीस्वामींच्या दर्शनासाठी गेले. त्यांना पहाताच श्रीस्वामी बोलले. “आता कायम केले. बदली नाही.” ते ऐकत श्री. विष्णुपंत प्रेमाने रडत रडत श्रीस्वामींचे चरण वंदू लागले.

# जलदेवता साती आसरा स्वामींना भितात

श्री. गोविंदराव करजकर नांवाचा एक कोल्हापुरातील सदभक्त श्रीस्वामींच्या दर्शनास नित्य येत असे. दर पोर्णिमेस श्रीश्रेक्ष नृसिंहवाडीस जाण्याचाही त्यांचा नियम होता. एके प्रसंगी श्रीस्वामींची सायंकाळी होणारी आरती पहावी म्हणून तो दर्शनासाठी आला. त्यावेळी श्रीस्वामी म्हणाले, “वाडीक्षेत्री व वैराग्यमठीत फरक आहे का रे? शंका असेल तर फेडून देऊ.” श्रीस्वामींचे उदगार ऐकूनच त्यांचे मन पूर्ण निवांत होऊन गेले. त्यांच्या मनात द्वैतभावना राहीली नाही. ‘श्रीस्वामी हे साक्षात् दत्तगुरु’ याच भावनेने तो दररोज न चुकता येथे दर्शनास येऊ लागला. दर पोर्णिमेस वाडीक्षेत्री दूर जाण्याचे कष्ट नष्ट झाले. एकदा कार्तिकस्नानाचा त्याने नियम केला. दररोज भल्या पहाटे उठून पंचगंगेवर स्नानकरुन तो वैराग्यमठीत दर्शनासाठी येई तेथून मग श्रीअंबाबाईचे दर्शन घेऊन घरी जाई. कार्तिकस्नानाचे काही दिवस उरले असताना नदीतील आसरा देवतांनी जलामध्येच त्याला झडपले. श्रीगुरुस्वामींचे

स्मरण करीतच कसे तरी तो वैराग्यमठीत आला. त्याला भयभीत पाहून श्रीस्वामी म्हणाले. “अरे भिऊ नकोस. त्या जलदेवात तुला छळतात काय? मी त्यांना पळवून लावतो. पण जरासां भोग भोगून टाक ” श्री करजकर ज्वर तापाने थरथर कापत घरी आले. भयाने अंगातील ताप वाढून त्यांना भोवळ येऊ लागे. त्यांच्या नजरेसमोर दोन स्त्रिया दिसत. श्री.स्वामींचे नामस्मरण करताच श्रीस्वामी त्या दोघींना हातातील काठीने मारताना दिसून येत. धड स्वप्न नव्हे व धड प्रत्यक्ष नव्हे असा विचित्र खेळ चालू होता. डोळे झाकताच त्या स्त्रिया मारावयास येताना दिसत पण क्षणातच् श्रीस्वामी त्यांना दूर करुन भक्ताचे रक्षण करीत. अशाप्रकारे एक आठवडाभर हे दुःखभोग भोगून होताच त्या जलदेवता अदृश्य झाल्या. श्री. करंजकरांना बरे वाटू लागले. ते श्री. स्वामींच्याकडे मठात दर्शनासाठी आले. श्री.स्वामींनी त्यांना आज्ञा केली की, “अरे, तू स्नान करित होतास त्या जागी नदीत लिंबू, नारळ, दहीभाताची परडी आणि पातळ, चोळी नेवून सोडून दे. त्या सुवासिनींना संतुष्ट करुन ये.” त्याआज्ञेनुसार श्री. करजकरांनी जलदेवात साती आसरांना संतुष्ट केले.

# गोविंदराव करजकरांना भेटला वाडीचा दत्त

पुढे कारी दिवसांनी श्री. करजकर यांच्या अंगावर चकंदळया उटू लागल्या. सर्व अंगभर गांधी उठल्याप्रमाणे चकंदळ्यानी शरीर भरुन गले. अंगाची अगदी लाही-लाही होत असे. श्रीस्वामीचे दर्शन न चुकविता यथायोग्य औषधोपचारही सुरुच होते. पण काहीच गुण येईना. शरीरकांती पाहून लोक कुष्ठरोग म्हणू लागले. बरेच दिवस दुःख सहन करीत ते मठीत येत असत. पण पुढे असह्य झाल्याने ते घरीच राहू लागले. घरच्यांनी त्यांनी वाडीक्षेत्राची पोर्णिमावारी चुकविल्याचाच हा परिणाम असावा अशी भिती घालून तेथे नेले. वाडीक्षेत्री जाताच त्यांचा त्रास फार वाढला. तरीही ते चार-दिवस तसेच सहन करीत तेथे राहीले. वेदना वाढून मरण दिसू लागले. मग मात्र श्रीस्वामींच्या ओढीने पश्चातापाने घरच्या लोकांचे बिलकुल न ऐकता थेट कोल्हापूरी येऊन मठीत श्रीस्वामी पायी लोळू लागले.

विकल्प धरुन वाडीक्षेत्री गेल्याबद्दल क्षमायाचना करु लागून प्रार्थना करताच श्रीस्वामींनी रागाने म्हटले, “आत्ता आठवण झाली काय?” त्यांची ही वाणी ऐकून घाबरुन जाऊन ते अधिकच दीनपणे श्रीस्वामी पायी विनवणी करु लागले की, “स्वामी, मला क्षमा करा. हा रोग बरा होत नसेल तर मरण द्या. आपल्या कृपेने माझी काही संसारवासना उरली नाही.” त्याक्षणी श्रीस्वामी म्हणाले, “अरे, जाईल-जाई. निघून जाईल.” त्यावेळेपासूनच अंगाची लाही लाही करणारा दाह-आग शांत होत गेली. दुस-या दिवशी ते दर्शनास येताच श्रीस्वामींनी त्यांस स्वतःबरोबर बाहेर फिरावयास नेले. फक्त श्रीस्वामी व ते एकटे असे दोघे मिळून खूप दूरपर्यंत चालून गेले. तरी श्री. करजकरना कोणताही त्रास वा थकवा जाणवला नाही. श्रीस्वामींनी त्यांना चक्क पंधरा दिवस पर्यंत खाण्यापिण्यावाचून सोबत फिरवले. श्रीस्वामींना स्पर्श न करता बाजूला-बाजूला राहूनच चालण्याचा प्रयत्न करीत तेव्हा श्रीस्वामी बळेच त्यांना हाताला धरुन सोबत चालवीत असत. त्या पंधरा दिवसात शरीर वाळू शुष्क बनले. सर्व गांधी, चकंदळ्या नाहीशा झाल्या. श्रीस्वामींनी त्यांना परत मठीत आणले. पुढे आठवडाभरात त्यांचे शरीर पूर्ववत् निरोगी बनले. श्रीस्वामींनी सदभक्त श्री. रहिपंतांना श्री. करजकर यांच्या नांवाने एक पाण्याची घागर भरुन ओतून टाकण्यास सांगितली. तसे करताच त्यांना शेषभोगही नाहीसा झाला. श्रीस्वामींसारखे समर्थ सदगुरुच आपल्या भक्ताला यथायोग्य बोध देऊन संकटसमयी स्वतः त्रास सोसून त्याला सुखा करण्याची पराकाष्ठ करीत असतात.

# रामजी पुजारी यांच्या वृद्धमातेस उपरती व विठ्ठल भेट

श्रीस्वामींचे सदभक्त श्री. रामजी पुजारी अगदी एकनिष्ठपणे सेवारत होते. श्रीस्वामीं सारखा ‘सदगुरु’ लाभून आपण धन्य झालो असलो तरीही आपल्या वृद्ध मातेस अद्यापही आपल्या स्वामीचरणांचा महिला कळला नाही याचे त्यांना फार वाईट वाटे. त्याकरिंता त्यांचे चित्त सदैव तळमळत असे. श्रीस्वामी चरणी त्याबाबत प्रार्थना करताच श्रीस्वामी बोलले, “अरे बाबा, बहकलेले आपोआप सुधारेल. चिंता नको.” आपली आई स्वतः तर सेवा-भक्ती करीत नाहीच. पण आपल्यासही त्याबाबत नांवे ठेवते याची त्यांना खंत होती. तिचा उद्धार कसा होईल, याची चिंता त्यांना

सतावत असे. एके समयी माघ मासी त्यांच्या वृद्ध मातेस पंढरपुरी जाण्याची तळमळ लागली. तिने श्री. रामजीस बोलून दाखविले, “अरे आत मझे वय झाले आहे. एवढी माझी इच्छा पूर्ण कर.” श्री. रामजींनी श्रीस्वामींना विचारतास ते म्हणाले, “अरे, वेळ करु नकोस. जरुर तिला घेऊन जा.” त्यानुसार श्री. रामजींनी बैलगाडी करुन मातेस पंढरपुरी नेले. माघ वारीच्या निमित्ताने असंख्य वारक-यांची तेथे गर्दी उडून गेली होती. इतक्या गर्दीत आपल्या आईस दर्शन कसे घडेल? या विवंचनेत श्री. रामजीभाऊ विचार करु लागले. त्यांनी तसेच आईला हाती धरु मंदिराच्या जवळ एका ठिकाणी बसवून कोठे कशी सोय होते ते पाहून लागले. श्रीस्वामींचे चिंतन करीत ते आईला तेथेच बसण्यास सांगून आजूबाजूला फिरुन दर्शनाची व्यवस्था पाहाण्यासाठी ते निघून गेले. बराच उशीर झाला तरीही श्रीरामजींचा पत्ता नाही. त्यामुळे आई काळजी करु लागली. त्यावेळी एक व्यक्ती तिच्याजवळ येऊन म्हणू लागली, “अहो, आई, श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा मी सेवक आहे. श्रीमहाराज आज सकाळीच भक्तांसह येथे आले आहेत. त्यांनी तुम्हाला बोलविले आहे. ते आंत मंदिरातच आहेत. चला मी तुम्हाला खांद्यावरुन आंत नेतो व श्रीविठ्ठलाचे पण दर्शन घडवितो.” श्री विठ्ठलाच्या दर्शनाकरिता तळमळत बसलेल्या त्या मातेस हे ऐकून अत्यंत बरे वाटले. लगेचच ती त्या व्यक्तीच्या खांद्यावर बसून मंदिरात गेली. इतक्या प्रचंड गर्दीच्या धक्काबुक्कीत त्या व्यक्तीने तिला अगदी अलगदपणे थेट विठ्ठलाच्या पायी नेले. मनसोक्त दर्शन करवून परत पाहिल्या ठिकाणी आणून सोडले. त्या व्यक्तीने तिला खांद्यावरुन खाली उतरवून बसविले व क्षणातच गर्दीत तो दिसेनासा झाला. त्याचवेळी थकून-भागून श्री. रामभाऊ काहीच सोय न झाल्याने निराशेनेच तिथे आले. ते आईला सांगू लागले, “आई, सध्या येथे फारच गर्दी आहे. मंदिरात दर्शनासाठी तुला घेऊन जाणे शक्य नाही.” ते ऐकताच तिने सांगितले, “अरे, तू जाऊन बराच वेळ झाला तरी पत्ता नाही त्यामुळे मी काळजीत बसले होते. त्यावेळी तुमच्या महाराजांचा कोणी सेवक येऊन माला आंत नेवून दर्शन करवून घेऊनसुध्दा आला. गोरापान-लांब पांढरीशुभ्र दाढी वाढलेला असा तो कोणीतरी होता, बाबा.” हे ऐकताच श्री. रामजींच्या डोळ्यात आसवे तरळली. त्यांनी मातेलासर्व वृत्तांत सविस्तर विचारून घेतला, त्यांनी लक्षपूर्वक ऐकून घेऊन मातेला समाजावून दिले की, “ती व्यक्ती म्हणजे दुसरे-तिसरे कोणी नसून साक्षात् श्रीस्वामीच होते. त्यांची अगाधलीला समजणे सहजशक्य नाही. तुझे भाग्य थोर म्हणून स्वतः श्रीस्वामींनीच तुला खांद्यावर बसवून नेऊन पांडुरंगाचे दर्शन घडविले.” आपल्या मुलाचे बोलणे ऐकून प्रत्यक्ष घेतलेला अजब अनुभव आठवून त्यामातेला पण धन्यता वाटू लागली. आजपर्यंत च्यांची उपेक्षा केली त्यांनीच कृपाळूपणे एवढे थोर उपकार केले असे वाटून तिलाही पश्चाताप झाला. ती म्हणू लागली, “अरे, दर्शन घडव.” श्री. रामजीभाऊ पंढरीहून परत कोल्हापूरी येताच मातेसह प्रथम कुंभारगल्लीत गेले. वैराग्यमठीमध्ये श्रीस्वामींच्या पायावर डोके ठेवून माता क्षमा मागू लागली. त्यावेळी श्रीरामजीभाऊंना श्रीस्वामींचे पूर्वीचे शब्द, “बहकलेले आपोआप सुधारेल, चिंता नको.” आठवून त्यांचेही मन सदगदित झाले. त्यांच्या तळमळीनुसार वृद्ध मातेचा उद्धार झाला. ती श्रीस्वामी भक्ती सेवेत रंगून गेली.

# आरळेकरांसाठी स्वामी बनले गाड़ीवान

श्री. आरळेकर हा श्रीस्वामींचा असाच एक साधाभोळा सदभक्त होता. त्यांस दोन बायका होत्या. घरी सर्व सुखसोयी होत्या. पण, त्या भक्ताचा भोळा स्वभाव व देवधर्मासाठी नेहमीच पैसा खर्च करण्याची त्याची वृत्ती घरच्यांना पटत नव्हती. त्याच्या मेहुण्यानेच त्याचा सर्व कारभार हाती घेऊन त्याला वेळेस जेऊन-खाऊन दर महिन्याला ठराविक पैसेच त्याच्या हाती देणे सुरु केले. त्यातूनच दानधर्म करुन तो राहू लागला. पण, त्याचे मन

दुःखी झाले. एकदा पंढरीस जाणा-या भक्तांचा मेळा पाहून त्यालाही तिकडे जाण्याची तीव्र ओढ लागली. जवळ फारसे पैसेही नव्हते. श्रीस्वामींनीही त्याला म्हटले, "कशाला जातोस बाबा पंढरीला," पण त्याने न ऐकताच जाण्याची तयारी केली. मिरजेपर्यंत गेल्यावर त्याचे पाय दुखू लागले. त्याचवेळी एका गाडीवान त्याला म्हणू लागला, "अरे, बाबा, मी पण पंढरीलाच चाललो आहे. तू पण माझ्यासोबत गाडीत बसून चल. मला पैसे नको आहेत. परंतु तुला जर फुकट जाणे बरे वाटत नसेल तर तुला जे शक्य असेल तितकेच पैसे दे." त्याच्यासोबत गाडीत बसून पंढरीस जाऊन एकादशीस श्रीविठ्ठलाचे दर्शन घेऊन सुखरुपपणे तो भक्त माघारी कोल्हापूरला आला. मध्यंतरी खाण्यापिण्याचा खर्चही त्या गाडीवानानेच केला होता. त्या भक्ताजवळ फारच थोडे पैसे असल्याने कोल्हापूरी जाताच त्याचे खर्चाचे सर्व पैसे देऊ असे त्याने ठरविले होते. कोल्हापुरात आल्यावर त्या भक्ताच्या घराजवळ बैलगाडी उभी करुन तो गाडीवान तिथेच थांबला. त्या भक्ताने कितीही आग्रह केला तरी तो न जुमानता तो गाडीतच बसून राहीला. त्यावेळी घरातून पैसे आणून देण्यासाठी तो भक्त घरी येवून पैसे घेऊन परत बाहेर आला. समोर त्या गाडीवानाचा पत्ता नाही. इतक्या दिवसाच्या सहवासात त्याने आपले नांव-गांवही सांगितलेले नव्हते. त्या भक्तास अत्यंत वाईट वाटले. तो त्याजागीच विचार करीत घरी न जाता, दुःखाने तळमळत तेथे झोपी गेला. त्याच्या स्वप्नांमध्ये श्रीस्वामी येवून म्हणू लागले. "तू अगदी हट्टी आहेस. कशाला जातोस म्हटले तरी तू पंढरीस गेलास. तो गाडीवान आता घरी गेला. तू उद्या सकाळी मठीत दर्शनाला ये. त्याच्या पैशाची काही काळजी करु नकोस. शहाणा हो." ते स्वप्ना पाहून तो भक्त समजून गेला की ही सर्व श्रीस्वामींचीच किमया आहे. दुसर्या दिवशी सकाळीच तो मठीत येऊन श्रीस्वामींच्या पायावर मस्तक ठेवून त्यांची स्तुती करु लागला. कधीकधी भोळ्या भक्तांसाठी त्यांनी आपले ऐकले नाही तरी श्रीस्वामी त्यांची अशा काळजी वहात असत.

# चि. बाळकृष्ण रशिवडेकरांचा पुनर्जन्म व पादुका महात्म्य

श्रीस्वामींचा जुना परमभक्त कै. बाळकृष्ण राशिवडेकर उर्फ 'बाळकू' श्रीस्वामींना फारच प्रिय होता. त्याच्या खांद्यावर मौजेने बसून, 'हा आमचा उत्तम घोडा आहे.' असे ते प्रेमाने म्हणत असत. त्यांच्या देहावसानसमयी त्यांच्या नेहमीच फे-या होत असत. "बाळकू परत येईल." असे ते पूर्वीच म्हणत असते. त्या सदभक्त 'बाळकू' ची

बहीणही श्रीस्वामींची मनोभावे भक्ती करीत असे. लग्नांनतर ती गरोदर असताना तिच्या स्वप्नांत जाऊन श्रीस्वामींनी सांगितले की, “तुझ्या पोटी तुझा परम पवित्र बंधु बाळकृष्णच परत जन्मास येत आहे. आमच्या भेटीसाठीच तो तुझ्या पोटी परत जन्म घेत आहे. तो जन्मताच आम्हीच त्याच्या भेटीला येऊ हे विसरु नकोस तुमच्या घरी आमच्या पादुका आहेत त्यांची पूजा करीत जा. दर्शन घेत जा. सर्व ठिक होईल.” कै. बाळकृष्ण राशिवडेकर हयात असतानाच श्रीस्वामींनी आपल्या पादुका त्यांना दिल्या होत्या. फार पूर्वी श्रीस्वामींचे परमभक्त श्री. कृष्णा लाड, वासुदेव दळवी, रामभाऊ मुरगुडकर यांच्या सोबत कै. बाळकृष्ण राशिवडेकर हे पण जेव्हा श्रीस्वामींना षोडशोपचार पूजा करवून घेण्यासाठी विनवू लागले, तेव्हा श्री. स्वामींनी ‘पाषाण पादुका’ करवून आणण्यासाठी आज्ञा केली. त्यानुसार बाळकृष्ण राशिवडेकर यांनी त्वरीतच त्या पादुका तयार करवून घेतल्या. श्रीस्वामी म्हणाले, “या पादुकांवर येथेच्छ षोडशोपचार पूजा करा. ती मला पावेल यात शंका धरु नका.” श्रीस्वामींच्या बोलण्यानुसारच मग बाळकृष्ण राशिवडेकरांनी सदभक्तांसह आपल्याघरीच त्या पाषाण पादुकांवर मनोभावे षोडशोपचारे पूजा समर्पण केली. त्यानंतर दररोज त्या पादुकांची पूजा त्यांचे घरी होऊ लागली होती. कै. बाळकृष्णांच्या भगीनीने श्रीस्वामींच्या संदेशानुसार मनोभावे त्या पादुकांची पूजा करीत श्रीस्वामींच्याच चिंतनामध्ये तो काळ काढला. त्या दरम्यान तिला फक्त श्रीस्वामींचीच ओढ लागून ती नित्य दर्शनास जाई. योग्य वेळी सुखरुप प्रसूती होऊन तिला पूत्ररत्न झाले. श्रीस्वामी आपल्या परम भक्त कै. बाळकृष्ण राशिवडेकरनां ‘ना’ या नावने संबोधित असत. बाळकृष्ण भगिनीच्या घरी स्वतःच श्रीस्वीमी गेले आणि त्या नूतन बालकाकडे पाहून, “हा माझा ‘ना’ परत माझ्या भेटीला आला आहे.” असे सर्वांना सांगू लागले. वेळोवेळी स्वतःच तेल लावून न्हावूही घालू लागत. अवघ्या वीस दिवसांच्या त्या लेकरांस ते प्रेमाने कडेवर घेत. त्याला खेळवित. पुढे पुढे मठीतील नित्य आरतीसाठी येणारे भक्तगण व नवीन नवीन दर्शनार्थी त्यांचा वाट बघत मठीमध्ये फार उशीर थांबून रहात. पण श्रीस्वामींचे सारे ध्यान त्या ‘ना’ कडेच लागून राही.

# पगडी देऊन पागोटे बांधले

एकदा एका व्यक्तीने मस्कतशूळाच्या बारा वर्षाच्या असह्य त्रासाने कंटाळून जाऊन श्रीस्वामींच्या पायी श्रद्धेने येऊन नवस केला. थोड्याच कालावधीत श्रीस्वामींच्या त्याची दया येऊन मस्तकशुळाचे त्याचे दुखणे कायमचे बरे झाले. तेव्हा त्याने बोलल्या नवसाप्रमाणे एक सुंदर पगडी तयार करवून श्रीस्वामींना अर्पण करण्यासाठी आणली. परंतु बरेच वेळा येवूनही त्याला श्रीस्वामींची भेट घडेना. दरवेळीच ते त्यांच्या लाडक्या 'ना' ला भेटण्यासाठी गेले असल्याचे समजे. शेवटी ताराबाईने एके दिवशी भक्तांना सांगून त्यांना घरातून बाहेर जाऊ दिले नाही. त्यामुळे त्यादिवशी त्या  बरेच दिवसांपासून तळमळणा-या भक्ताची श्रीस्वामींना भेट घडली. त्याने मनोभावे पूजा करुन श्रद्धेने आणलेली पगडी श्रीस्वामींच्या मस्तकी अर्पण केली. श्रीस्वामींचे रुप त्यावेळी फारच नयन मनोहर दिसू लागले. थोड्या वेळाने ताराबाईने पगडी काढून ठेवावी म्हणून सांगताच, सर्व भक्तांनी 'हे रुप फारच सुंदर दिसते.' असे म्हणून ती पगडी तशीच राहू दिली. ताराबाई इतर कामांत गुंतून गेल्या काही वेळाने दुसरा एक साधा भोळा श्रीस्वामींनी इतर भक्तांची नजर चुकवित आपली पगडी काढून त्याला दिली व त्याचे पोगोटे स्वतः आपल्या डोक्याला गुंडाळून घेतले. हळूच त्या भक्ताला ती पगडी घेऊन गुपचुप निघून जाण्यास सांगून स्वतः त्याचे पागोटे गुंडाळून हसत बसून राहिले. तो भक्त निघून गेल्यावर इतर भक्त व ताराबाईंनी श्रीस्वामींचे हे ध्यान पाहून आश्चर्यच केले. 'पूर्वीच ती पगडी काढून ठेवली असती तर बरे झाले असते.' असे विचार प्रगट करतांच श्रीस्वामींनी कशाचाही लोभ करु नका सर्वांना सुचविले.

# चि. 'बाळकू' तथा 'ना' ला जीवनमुक्ती दिली.

पूर्वीप्रमाणेच 'ना' कडे वेळी-अवेळी जाऊन त्याच्याशी खेळण्यात श्रीस्वामींना फार आवडे. त्याला नविन नविन अंगरखे-टोपी ते घालीत असत. ते चिमुकले बाळ पण त्याच्या आईपेक्षा श्रीस्वामींकडे अगदी न रडता खेळता राही. श्रीस्वामी मोठ्या कौतुकाने त्याला कडेवर घेऊन श्री. रामजीभाऊच्या दुकानी येत असत. त्याच्या मुखामध्ये साखर भरवीत असत, सायंकाळी त्यास घरी सोडून येताना, "उद्या मी सकाळी लवकर येतो हं." असे त्यास सांगत असत. अशा प्रकारे तीन वर्षे निघून गेली. पुढे एके दिवशी श्रीस्वामींनी पुढील भाकीत जाणून त्यांच्या लाडक्या 'ना' ला मांडीवर घेतले. त्यांच्या तोंडात तोंड घालून प्रेमाने त्याच्याशी बोलू लागले. थोड्याच वेळात त्यांचा प्रिय 'ना' देह सोडून अनंतात विलीन झाला. आई शोकाने आक्रोश करु लागली. श्रीस्वामींनी तिचे सांत्वन केले. 'येणारे योग्य वेळी जाणारचं' हे त्यांनी पटवून दिले. तिच्या स्वप्नामध्ये जाऊन तिला यथार्थ बोध देऊन तिचा शोक नाहिसा केला. ती पण श्रीस्वामींच्या पदावर निष्ठा ठेवून शांततेने काल क्रमू लागली. श्रीस्वामी म्हणाले, "आता हा परत जन्मणार नाही." खरोखरीच श्रीस्वामींनी आपल्या 'ना' ला जीवनमुक्त केले. असा थोर सदभक्त विरळाच असू शकतो. म्हणूनच तर श्रीस्वामीसारखा विरक्त महात्मा त्यांचा प्रिय 'ना' देह सोडून गेल्यावरही भक्तांना म्हणे, "अरे, माझा 'ना' अंधारात एखटाच बसला आहे. चला त्याच्याजवळ तुपाचा दिपक लावू या." 'ना' च्या देहावसानानंतर सुमारे महिनाभर श्रीस्वामींचा असा प्रेमभक्तीचा विचित्र खेळ सुरुच होता श्री.स्वामी आणि त्यांचे असे भक्त दोघेही महानच. त्यांचे वर्णन कसे करावे? मूकपणे दोघांच्याही पायी मस्तक ठेवून विनम्र व्हावे आणि आपणही धन्य होऊन जावे.

# ‘मायनस जागी प्लस करा’ गणिताचे उत्तर इंग्रजीत दिले

श्रीकृष्ण सरस्वती स्वामींचे बाह्य बोलणे-चालणे पाहून कोणीही सामान्यच काय ज्ञानी मनुष्यही क्षणभर बुचकळ्यात पडत असे. प्रापंचिक कामनिक लोकांची होणारी भाऊगर्दी टाळण्यासाठीच ते असे वडेपण पांघरुन सर्वदा विचरण करीत असत. भल्यामोठ्यांना न कळणारे स्वामी लहान मुलांना तसी कसे कळणार? बरेचजण ‘एक वेडा’ म्हणूनच त्यांचेकडे पहात. श्रीस्वामी एकदा असेच मजेमध्ये आपल्या सदभक्तामंडळींसह फिरावयास निघाले होते. त्याचवेळी समोरुन काही शाळेतील विद्यार्थी मित्र मंडळीसह चालले होते. त्यापैकी एका धीट विद्यार्थ्याने इंग्रजीमध्ये गणिताचा प्रश्न श्रीस्वामींना विचारला. ते ऐकून श्रीस्वामींनी पण इंग्रजीमध्येच त्याला तत्काळ उत्तर देत सांगितले, “अरे मायनसच्या जागी प्लस करा.” सर्वजण परफेक्ट उत्तर ऐकून आश्चर्यामध्ये पडले. त्यावेळेपासून अनेकामेक मुले त्यांचे श्रद्धेने दर्शन घेऊ लागली.

# ‘रामायण’ ऐकण्यास मठीत हनुमंत आले

एकदा कुंभारगल्लीच्या वैराग्यमठीत श्रीस्वामींच्यासमोर कोणी एक ब्राह्मण ‘रामायण’ पाठ करीत होता. त्याप्रसंगी त्या वाचकाच्या पोथीसमोर एक बलाढ्य वानर शांतपणे बसलेले सदभक्त श्री. रामजी मुरगुडकर यांना दिसला. त्याला पाहून ते एकदम घाबरले. त्यांनी श्रीस्वामींकडे पहात मनांतच हा प्रश्न ठेवला तरी त्याचा तो प्रश्न ओळखून श्रीस्वामी बोलू लागले, “रामकथा ऐकण्यासाठी” आलेला तो हनुमंत होता. जेथे जेथे श्रीरामकथा चालते तिथे तिथे तो वायुनंदन हनुमान ऐकण्यासाठी हजर असतोच. भाग्यवान म्हणून दर्शन घडले.’’ श्रीस्वामींचे बोल ऐकून श्री. रामभाऊ आनंदीतही झाले व समोर प्रत्यक्ष हनुमंतराय येवून आपण त्यांना ओळखून दर्शन घेतले नाही याबद्दल दुःखीही झाले. एक सामान्य माकड समजून आपण त्यास घाबरलो यांची त्यांना हूरहूर लागली. केवळ स्वामीकृपेने आपणास न समजताही त्यांचे दर्शन घडले हेच थोर भाग्य मानून ते निश्चिंतपणे श्रीस्वामीपदी वंदन करु लागले.

# स्वामींना जातीपातीचा विटाळ नाही, शुद्धभक्तीची आवड

श्रीस्वामींच्या अनेक भक्तांमध्येच 'रामा मांग' हा एक चांगला भक्त होता. श्रीस्वामींना खांद्यावर घेऊन अनेक भक्त पावन झाले पण आपण लोकदृष्टीने अस्पृश्य त्यामुळे ही सेवा आपल्या वाट्याला येणार नाही. याचे त्याला फार वाईट वाटे. त्याची तळमळ जाणून एकदा श्रीस्वामींनी त्याला एक घोडा आणावयास लावला. त्याने आनंदाने एक उत्तम घोडा पैसे खर्चून आणून दिला. त्यावर बसून श्रीस्वामी नेहमीच बाहेर फिरावयास जात. एके वेळी इतर अनेक भक्तांसह त्या रामाला पण सोबत घेऊन श्रीस्वामी वाडीक्षेत्री निघाले. रस्त्याने जाताना भक्तगण भजन करु लागले. श्रीस्वामी हळूच त्या रामाला म्हणाले, "अरे, मला तुझ्या खांद्यावर बसू दे." त्याने आनंदाने श्रीस्वामींना आपल्या खांद्यावर बसवून घेतले. सर्वजन वाडीक्षेत्री येऊन संगमी स्नान, दत्तदर्शन करुन बसले. आपली बरेच दिवसांची इच्छा श्रीस्वामींनी जाणून अचानक वाडीक्षेत्री जाताना पूर्ण केल्यामुळे रामा स्वतःस धन्य समजू लागला.

# निपुत्रिकास पुत्र व जलोदरव्यथा दूर

श्रीस्वामी भक्तांना घेऊन शिरोळ मुक्कामी आले. तेथे पाणी भरुन घरी नेणार्या भाग्यवान यमाताईस स्वतःच श्रीस्वामींची बोलवून तिच्या ओटीत श्रीफळ घातले. पुढे वर्षभरातच यमाताईस सुंदर मुलगा झाला. शिरोळहून श्रीस्वामींना सर्वांना मिरज मुक्कामी नेले. तेथे त्यांचे बांधव श्री. मल्लंभट व वासुदेव राहत होते. श्री. मल्लंभटांची पत्नी त्यावेळेस जलोदर व्यथेमुळे अगदी अस्वस्थ झाली होती. अचानकच श्रीस्वामींच्या शुभ आगमनामुळे श्री. मल्लभटांना फार समाधान झाले. त्यांनी प्रार्थना करताच श्रीस्वामी त्यांचे घरी गेले. आजपर्यंत नामंकित वैद्यांचे औषधोपचार करुनही कोणताच गुण न येता रोग वाढतच चालला होता. त्यामुळे ते फारच चिंतेत होते. श्रीस्वामींनी त्यांच्या घराशेजारच्या सीताफळ वृक्षाची पाने तोडून आली आणली आणि त्यास रस काढून श्री. मल्लंभटच्या पत्नीस पाजण्यास सांगितला.  "आता तिला आराम होईल." असे म्हणत आशिर्वाद दिला. "मला फार भूक लागली लौकर जेवायला दे." म्हणून गडबड करुन स्वयंपाक करायला लावला. सर्व भक्तांना प्रथम जेवायला वाढायला सांगून सर्वांनी जेवणे होताच स्वतः काही न खाताच निघाले. श्री. मल्लंभट विनवून म्हणाले, "अहो स्वामी, तुम्ही भूक लागली म्हणून गडबडीने जेवण करायला सांगून इतरांस जेवू घातले. पण स्वतः काहीच खाल्ले नाही." त्यांना काहीच उत्तर न देता श्रीस्वामींनी कृष्णेच्याघाटावर जाण्याची भक्तांना घाई केली.

# मिरजेस दत्तदिंगबर अण्णाबुवांच्या समाधीस भेट

मिरजेच्या कृष्णा घाटावर श्रीस्वामी समर्थ (अक्कलकोट) यांच्या परंपरेतीलच एक महान दिगंबर विदेही सत्पुरुष श्री अण्णाबुवा महाराज यांची परमपावन समाधी आहे. श्रीस्वामींना त्या समाधीस्थळी जाण्याचीच ओढ लागली होती. वाटेत अनेक भाविक भक्त त्यांच्या दर्शनासाठी गर्दी करु लागले. एका स्त्रीने प्रार्थना करुन संताप्राप्तीची अपेक्षा केली. तेव्हा श्री स्वामी म्हणाले, “दुसर्या घरचा दिवा आपल्या घरी नेवून लावा.” त्यांच्या भावार्थ समजून त्या कुटुंबाने पुढए ‘दत्तकपूत्र’ घेऊन सुखाने संसार चालविला. अशा अनेक लीला करीतच श्रीस्वामी परमपूज्य श्री.अण्णांबुवांच्या पावन समाधीस्थानी येऊन पोहोचले. श्रीस्वामी तेथे येताच त्या जागृत समाधीस्थानातून आवाज आला, “कृष्णा, इथले काम संपले काय? परत चाललाल वाटते. तुला भेटून अक्कलकोट श्रीस्वामीसमर्थांचे स्मरण झाले. ” अचानकहा आवाज ऐकून सर्व भक्तगण भारावले. श्रीस्वामी म्हणाले, “अण्णा, तु, मी आणि स्वामी समर्थ एकच नव्हे का? बरे येतो मी.” एका महान समाधिस्थ सत्पुरुषाचा आणि श्रीस्वामींचा प्रेम संवाद ऐकून सारेच भाविक नतमस्तक झाले. तेथे त्याप्रसंगी बरीच गर्दी झाली. एवढ्या गर्दीतून श्रीस्वामी अचानक गायब झाले.

# साधक 'भास्कर' ला तरुण सन्यांशी रुपात दर्शन

मिरजेच्या कृष्णाघाटावर कोणी एक सधन ब्राह्मण भोजन घालीत होता. त्यांच्या बाजूलाच 'भास्कर' नावाचा एक साधक आपले अनुष्ठान मांडून बसला होता. त्याला त्यावेळी रात्रीच एक स्वप्नदृष्टांत झाला होता. त्यामध्ये एख तेजस्वी तरुण सन्यांसी भगवी वस्त्रे, दंड कमंडलू घेऊन त्यांच्या स्वप्नांत म्हणाला, "मी करवीरातून आलो आहे. उद्या तुला भेट होईल." तो .'भास्क' साधक त्यादृष्टीनेच सकाळपासून वाट पहात होता. शेजारीच चाललेल्या ब्राह्मण भोजनाच्या पंक्तीमध्ये अचानक एक तरुण संन्यासी येऊन उभा राहिलेला त्याने पाहिला. तेथील ब्राह्मण त्याला हाकलू लागले. त्यावेळी पूजेमध्ये बसलेल्या त्या भास्कराने खुणेने त्या संन्याशास थांबविले. आपली पूजा संपवून त्याने त्यांचे चरण धरले. शेजारी ब्राह्मणभोजन देणार्या धनिकाला तो म्हणू लागला. "मी पैसे देतो तुम्ही यांना जेऊ घाला." तो धनिक लाजला व त्याने क्षमायाचना करीत त्यांना जेऊ घातले. त्यानंतर त्या संन्याशी महाराजांना भास्कराने काही प्रश्न विचारले. त्यांची सर्व समाधानकारक उत्तरे देत तो संन्याशी म्हणाला, "अरे, कोणाचेही आयुष्य कोण सांगू शकेल? परमार्थबुद्धीच्या माणसाने तरुणपणीच संसारात न फसता संन्यास घेणेच श्रेयस्कर असते. मी त्यामुळेच संन्यस्त बनलो. असो. अजूनही तुला काही विचारावयाचे असल्यास कोल्हापुरी कुंभारगल्लीत ये." असे म्हणत तो तरुण संन्याशी बघता बघता दिसेनासा झाला. इकडे श्रीस्वामी गायब झालेले पाहून सर्व भक्त हवालदिल झाले होते. आता श्री. स्वामींशिवाय कोल्हापूरत कसे जायचे ? तेथे ताराबाईंना काय सांगायचे? अशा विचारामुळे अगदी चिंताक्रांत बनलेल्या त्या सर्व भक्तांसमोर अचानकपणे श्रीस्वामी प्रगट झाले. सर्वांनाच फार आनंद झाला. सर्वजन श्रीस्वामींना 'इतक' वेळ कुठे गायब झाला होता ? या प्रश्नार्थक दृष्टीनेच पहात होते. त्यांचेकडे पहात हसत हसत श्रीस्वामी सांगू लागले, "भास्करला भेटून आलो." परंतु कोणालाही त्याचा अर्थ समजला नाही. सर्वजन श्रीस्वामींसह कोल्हापूरी परतले. पुढे लवकरच मिरजेच्या घाटावरील तो साधव 'भास्कर' कुंभारगल्लीत त्या तरुण संन्याशाला शोधत आला. वैराग्यमठीत त्याला श्रीस्वामींचे दर्शन घडले. मग भक्तगणांशी बोलताना सर्वांना 'भास्कर' केण हे कळले आणि भास्करला पण तो तरुण संन्याशी म्हणजे हेच 'श्रीस्वामी' होत हे कळले. श्रीस्वामींच्या अजब लीलांना सर्वजण अधिकधिक श्रद्धाभक्तीने त्यांची सेवा करण्याचा प्रयत्न करु लागले.

# ।। श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज समाधी-मठी।।

## दैनंदिन कार्यक्रम

दररोज पहाटे ५.४५ वा च्या सुमारास श्रींना जागे करुन
नंतर पहाटे ६.०० वा. श्रीं.चे पादुकांवर अभिषेक व पुजा होते.
नंतर सुर्योदयाच्यावेळी काकड आरती सुरु होते.
काकड आरती होवून श्रींना दहीभाताचा नैवेद्य होतो.

रोज दुपारी १२.१५ वा. महानैवेद्य व विडा समाधीस
दाखवून ठिक १२.३० वा. आरती सुरु होते. आरती
नंतर श्रींना शेजघरात झोपविले जाते व
दुपारी १.०० ते ४.१५ पर्यंत समाधीचे दर्शन बंद राहते.

दुपारी २.०० च्या सुमारास श्रींच्या समाधीची सुवासिक
फुलांनी पुजा बांधली जाते तसेच ४.१५ वा श्रींना उठविले जाते.

सुर्यास्ताप्रमाणे श्री ज्योर्तिलिंग अष्टक सुरु होते व ठिक
सुर्यास्तसमयी सायंकाळची आरती सुरु होते.

दररोज रात्रौ ठिक ८.०० वा भजन सुरु होते. व ठिक
८.३० वा . धूप होऊन धूप आरती सुरु होते.

धूप आरती नंतर रात्रौ ठिक ९.०० वा. नैवेद्य व विडा
दाखवून महाराजांची शेज आरती (विडा/अष्टक) सुरु
होते

शेजआरती संपल्यानंतर रात्रौ ठिक ९.३० वा समाधीवरील
पूजा उतरविली जाते व रात्रौ १०.०० वा श्रींना शेजघरात झोपविले जाते.
अशाप्रकारे सर्व दिवसभर कार्यक्रम पूर्ण होतो.

# श्री कृष्णसरस्वती महाराज यांचे त्रोटक चरित्र

श्री क्षेत्र करवीर प्रांती शिरोळ पेट्यात 'नांदणी ' नामक खेडेगावी प्रख्यात जोशी कुलामध्ये श्रीस्वामींचा अवतार शके १७५७ च्या सुमारास झाला. श्रींचे जननी जनक हे देशस्थ ऋुग्वेदी शाखेचे ब्राह्मण असून त्यांची नावे सौ. अन्नपूर्णाबाई व वे. मु. अप्पाभट जोशी अशी होती. दोघेही पतिपत्नी अत्यंत सात्त्विक भाविक, सद्धर्मी व परम ईश्वरभक्त होते. मग अशा "शुद्ध बीजा पोटी. फळे रसाळ गोमटी" निर्माण झाल्या नवल ते काय ? सती अन्नपूर्णाबाई गरोदर असताना त्यांचे डोहाळे फार सूचक होते.

"होती सती गरोदर । डोहाळे अती मनोहरी । दिसे परमसुंदर ।। ब्रह्माकार जाहली, आवडे एकांत सदन । करुन वाट स्वचिंतन । परिसावे हरिगुण । भजन करावे."

श्रींचे नामाभिधान 'श्रीकृष्ण' असे ठेविले. बालपणापासून श्रींना एकांत प्रिय होता. श्रींचे शिक्षण त्या कालास अनुसुरुन म्हणजे फक्त लिहिण्यावाचनापुरतेच झाले होते.

कोणाशीही न बोलता श्री प्रभू भजनात अत्यंत गुंग होत असत फक्त उचित एवढे भाषण करीत. "बैसले तेथेची बैसती । लागली स्वचिंतनी वृत्ती।।" अशा प्रकारे श्री वावरत असत.

घरी मातेने आलेल्या अतिथीस अन्न दिले नसता श्री फारच खिन्नवदन होत व स्वतःच दिलेले अन्नसुध्दा श्री जातीने त्यास वाढीत. इतकेच नव्हे तर अंगावरील वस्त्रदेखील दुस-यास देऊन आपण थंडीत कुडकुडत बसत. श्री. भूतद्या अशी एकरुप होती.

या वागण्यामुळे श्री म्हणजे कोणी वेडा, भ्रमिष्ट आहे अशी लोकांची दृढ समजूत होती. घरच्या मंडळीसही हा त्रासच वाटे आणि लोकनिंदा ऐकून ते फार उदासीन व कष्टी होत. दुर्जन कित्येक वेळा श्रींना 'वेड्या कृष्ण्या' म्हणून हाक मारीत. श्रीस्वामी नेहमी प्रसन्न व हसतमुख असत. श्री वेड्यासारखे पुष्कळ भ्रमण करीत. दुर्जनांपासून फार उपद्रव होऊ लागला म्हणजे श्री आपले कुलदैवत मंगसुळी येथील श्री खंडोबास जाऊन कांही दिवस तेथेच राहत व प्रभुपदी लीन होत.

अक्कलकोटचेश्री नरसिंहभान महाराज यांना श्रींनी गुरुस्थानी मानिले होते.

श्रींनी जितकी पूर्ण बालवृत्ती बाहे धारण केली होती, तितक्याच पूर्ण तदाकारतेने श्री स्वामी सच्चिदानंदरुप होते. श्रींना भगवदगीता अत्यंत प्रिय होती.

श्री अंगाने व कांतीने भव्य, ठेंगणे, सदा हसतमुख होते. मर्जीस आले तर खात, तेही दुस-याने भरवावे तेव्हा, नाहीतर नाही.

जेव्हा एखादा भक्त संकटात पडे तेंव्हा श्रींच्या चर्येत एकदम विलक्षण फरक पडे व त्या वेळी स्वामींच्या चर्येवर जे तेज विलसे त्याचे वर्णन अशक्य. इतर वेळी श्रींची मुद्रा नेहमी शांत व प्रसन्न असे

श्रींचे वास्तव्य करवीर नगरीत कुंभार गल्लीत परम भक्तिपरायण ताराबाईचे घीर ४५-५० वर्षे होते. तेथेच श्रींनी शके १८२२ श्रावण वद्य १० सोमवार पहाटे ३.४५ चे सुमारास श्री अंबाबाईच्या घंटानादाच्या वेळी समाधि घेतली.

ताराबाईंच्या पश्चात त्यांचे नातू कै. रामनाथ द. शिर्के हे श्रींची सेवा भक्तिभावाने करीत असत. त्यांच्या पश्चात ताराबाईंची नातसून भक्तिपरायण कै. माईसाहेब रा. शिर्के, त्यांचे चिरंजीव कै. बाळ रामनाथ शिर्के व कै. विजयादेवी बाळासाहेब शिर्के आणि त्यांची तीनही मुले श्रींच्या समाधीची तत्परतेने सेवा करीत असून भक्तिभावाने समाधिस्थानी नित्य पूजा-अर्चा, भजन पूजन वगैरे नैमित्तिक कार्यक्रम श्रींच्या कृपेने आजतागायत चालू आहेत. भक्तिपरायण शिर्के श्रद्धायुक्तपणे, पारंपारिक पद्धतीने घडत आहे व श्रींच्या अगणित भक्तांना सेवादर्शनाचे हे द्वार खुले राहिले आहे.

श्रींचा भक्तगण अफाट, श्रींचा साक्षात्कार, अनुभव, चमत्कार असंख्यात आहे. तो भक्तजनांस विदित आहेच. श्री. भाविकांना अत्यंत प्रेम व भक्तिरसाचा सागर होते.